# फ्रान्सची झांशीवाली

## जोन ऑफ आर्क

### चरित्र

नरसिंह चिंतामण केळकर

दि इंटरनॅशनल बुक सर्व्हिस
पुणें ४

प्रकाशकः—वि. ना. दीक्षित,
दि इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणें ४

## अनुक्रमणिका

| | पानें |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... | १– ६ |
| चरित्र ... ... ... ... | ८–६३ |
| जोन ऑफ आर्कची पुरवणी ... ... | ६४–६७ |
| चरित्र-चिकित्सा ... ... ... | ६८–९६ |

( या प्रकरणांत ज्या ज्या ठिकाणीं "श्री. कृ. कोल्हटकर" या नांवाचा उल्लेख आलेला आहे त्या त्या ठिकाणीं "गो. ब. देवल" असें वाचावें. )

चित्रकारः—विख्यात चित्रकार श्री. ज. द. गोंधळेकर

मुद्रकः—स. रा. सरदेसाई, बी. ए., एल्एल्.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'
छापखाना, ४१ बुधवार, पुणें २

# प्रस्तावना

एखाद्या संकल्पित विषयावरील ग्रंथ वाचीत असावें आणि त्यांतूनच दुसरा एखादा विषय अकल्पित सुचावा, असा अनुभव मला ग्रंथ-लेखनासंबंधानें आलेला आहे. प्रस्तुत चरित्रग्रंथाविषयीं तसेंच घडलें. कसें तें सांगतों.

चालू युद्धांत फ्रेंच सरकारच्या साहाय्याला फ्रान्समध्यें आलेलें इंग्रज सैन्य 'जर्मन सैन्याच्या वेढ्यांत आपण सांपडूं' या भीतीनें ता. १ जून १९४० रोजीं डंकर्क बंदरांतून इंग्लंडला परत गेलें. ता. १४ जून रोजीं जर्मन सैन्यानें पॅरिस शहरांत प्रवेश केला. ता. २३ जून रोजीं फ्रेंच सेनापतीनें जर्मन सेनापतीशीं युद्धतहकुबीचा तह केला. लगेच इंग्लंडनें त्याचा उघड निषेध केला. ता. ४ जुलै रोजीं इंग्रज आरमारानें हल्ला करून कांहीं फ्रेंच आरमार बुडविलें, कांहीं हस्तगत केलें. शेवटीं ता. ७ जुलै रोजीं फ्रान्सनें इंग्लंडशीं सर्व प्रकारचें दोस्तीचें नातें तोडून टाकलें. अशा रीतीनें हीं दोन राष्ट्रें एका दिवसांत मित्रांच्या ऐवजीं शत्रु बनलीं ! यानंतर उभयपक्षीं दोषारोप होऊं लागले. वर्में निघूं लागलीं. तो विषय आणखी एकदोन वर्षें चालू राहील ! आणि फिरून इंग्लंड व फ्रान्स यांची दोस्ती केव्हां होते पाहावें !

हा सर्व प्रकार पाहून अनेक लोक आश्चर्यचकित झाले. सैन्याची रचना, युद्धक्षेत्राची निवड, सेनापतिपद इत्यादि कार्यांत या दोन राष्ट्रांत पंचवीस वर्षांपूर्वीच्या युद्धांतहि कुरबुरी झाल्या होत्या. उणीं-दुणीं वर्में निघालीं होतीं. पण शेवटीं संयुक्त स्थितींत विजय मिळाल्यानें हें सर्व विसरलें जाऊन, एकमेकांना गुन्हे माफ होऊन, या दोघांची मैत्री दृढ झाली. आणि 'दुसरें युद्ध होणार' या भीतीनें

या मैत्रीला चांगलीच गांठ बसली. पण चालू युद्धांत जर्मनीच्या तरवारीनें ती गांठ कापली गेल्यानें तीं दोन राष्ट्रं दोहोंकडे झालीं. हें पाहून भोळ्या अजाणत्या लोकांच्या तोंडून असे हळहळीचे उद्गार निघाले कीं, 'अरेरे, अशाहि मित्रांचे शत्रू बनावे ना!' पण त्यांना हें माहीत नसावें कीं, फ्रान्स व इंग्लंड यांची ही मैत्री अगदीं अलीकडची म्हणजे अवघ्या तीस वर्षांची होती, आणि तीहि मित्रप्रेमापेक्षां शत्रुद्वेषानें जडली होती, म्हणून प्रासंगिक व कृत्रिम होती. त्यापूर्वीं शतकानुशतकें फ्रान्स व इंग्लंड हीं सतत शत्रुराष्ट्रें होतीं, हें इतिहास आपला नगारा वाजवून वाचकांना सांगत होता! पण नव्या ताज्या अनुभवांत जुनें विसरून जातें. म्हणून जुनी परंपरा काय आहे, म्हणजे नित्यप्राय काय व अनित्यप्राय काय समजावें, हें सांगणें हेंच इतिहासाचें कार्य आहे.

इंग्लंड व फ्रान्स यांचा स्नेह तुटला हें ऐकतांच प्रथम मलाहि क्षणभर आश्चर्य वाटलें. मात्र मीं या दोन राष्ट्रांचा जुना इतिहास वाचलेला होता. यामुळें तें आश्चर्य फार वेळ टिकलें नाहीं. आणि मराठी वाचकांना तो इतिहास थोडक्यांत सांगावा म्हणून १९४० सप्टेंबर महिन्याच्या 'सह्याद्रि' मासिकाच्या अंकांत 'फ्रान्स व इंग्लंड' या मथळ्याखालीं मीं एक लेख लिहिला. तो लिहीत असतां इंग्लंड व फ्रान्समधील त्रिशत-सांवत्सरिक (किंवा दुसरेंहि एक नांव आहे त्याप्रमाणें शतसांवत्सरिक) युद्धाचा उल्लेख करावा लागला. याच युद्धांत सन १४२९-३० सालीं जोन ऑफ आर्क नांवाच्या फ्रेंच कुमारिकेनें केलेले अलौकिक युद्धपराक्रम घडलेले आहेत.

सह्याद्रींतील माझ्या लेखांत या प्राचीन युद्धाचा फक्त ओझरता उल्लेख आहे. कारण इंग्लंड व फ्रान्स यांचा पूर्व वैराचा शतकावधीचा

विषय मला अवघ्या पांच-चार पानांत मांडावयाचा होता. पण हा विषय सविस्तरपणें ध्यानांत आणण्याकरितां मी ' हिस्टोरिअन्स हिस्टरी ऑफ दी वर्ल्ड ' या ग्रंथाचा अकरावा (म्हणजे फ्रान्स विषयक पहिला) खंड वाचीत असतां त्यांत मला जोन ऑफ आर्कचें चरित्र वाचावयास मिळालें. त्यानें माझ्या मनाची पुरी पकड घेतली. पूर्वी इंग्रजी हायस्कुलांत इतिहास विषय शिकलों तेव्हां जोनचें नांव वाचलें होतें. पण तिच्या चरित्राची माहिती तेव्हां इतकी संक्षिप्त मिळाली होती कीं, ती लिहिली तर अवघ्या दहा वाक्यांहून अधिक भरली नसती. पण आतां वरील इतिहासखंडाशिवाय जोनच्या चरित्राविषयीं आणखी दोन ग्रंथ वाचले. आणि मग मनाशीं ठरविलें कीं, आमच्या मराठ्यांच्या इतिहासांतील शूरवीर स्त्री झांशीवाली राणी लक्ष्मीबाई इच्या चरित्राहूनहि अधिक मनोरंजक व अद्‌भुत असें हें जें जोन ऑफ आर्कचें चरित्र, त्याची माहिती माझ्या बाल-वाचकांना, विशेषेंकरून तरुण मुलींना, ग्रंथरूपानें करून द्यावी.

अशा रीतीनें माझ्या वाचनाच्या व ग्रंथलेखनाच्या व्यवसायांत एका विषयांतून निघालेला दुसरा असा हा विषय आहे. आणि त्याला अनुसरून हें लहानसें पुस्तक छापून प्रसिद्ध करीत आहें.

या पुस्तकाला ' जोन ऑफ आर्क ' हें इंग्रजी नांव न देतां ' फ्रान्सची झांशीवाली ' हें नांव पसंत केलें. याचें कारण असें. तें इंग्रजी नांवच नुसतें दिलें असतें तर तें तितकेसें चित्ताकर्षक किंवा अर्थबोधक झालें नसतें. उलट ' झांशीवाली ' हा शब्द उच्चारला असतां तो महाराष्ट्रांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुषांच्या पूर्ण परिचयाचा ठरतो. झांशी या शब्दाची जोड नसलेला लक्ष्मीबाई हा शब्द निरर्थक ठरतो.

कारण लक्ष्मीबाई म्हणजे कोण? या लक्ष्मीबाईचें आडनांव सुशिक्षितांपैकींहि दहा हजारांत एकालाहि माहीत नसतें. म्हणून झांशीवाली हा शब्द अपरिहार्य ठरला. पण प्रस्तुत ग्रंथामध्यें महाराष्ट्रीय झांशीवाल्या वीरस्त्रीचा मुळींच संबंध नसून, तें चरित्र तिच्याचसारख्या एका फ्रेंच वीरस्त्रीचें आहे हें चटदिशी लक्षांत यावें म्हणून 'फ्रान्सची झांशीवाली' असें नांव देण्याचें ठरविलें.

पण झांशीवाली या नांवाचा उपयोग केला म्हणून त्याबरोबर दुसराहि एक खुलासा करणें प्राप्त आहे याकरितां तोहि करितों. तो असा. फ्रेंच जोन ऑफ आर्कची तुलना करण्याला एकाच महाराष्ट्रीय वीर स्त्रीची व्यक्ति डोळ्यांपुढें येते म्हणूनच या चरित्राला 'फ्रान्सची झांशीवाली' हें नांव दिलें खरें. तथापि प्रांजलपणें बोलावयाचें तर मला जोनचें चरित्र लक्ष्मीबाईच्या चरित्रापेक्षां अधिक उदात्त वाटतें. याचें कारण असें. या दोघी स्त्रिया वीरश्रीगुणानें परिपूर्ण. दोघी इंग्रजांविरुद्ध रणांगणावर लढल्या. दोहोंना इंग्रजांच्या हातून मरण आलें. तथापि व्यक्ति-चरित्रांतील नैतिक हेतु लक्षांत घेतां त्यांच्यामध्यें मोठाच फरक दिसून येतो. जोननें इंग्रजांचा द्वेष केला तसाच लक्ष्मीबाईनें केला. तथापि या द्वेषाचें जोनचें कारण इंग्रज हे स्वदेशाचे शत्रू हें होय. लक्ष्मीबाईलाहि इंग्रज हे महाराष्ट्राचे शत्रु असें वाटत होतें यांत शंका नाहीं. कारण इंग्रजांनीं बुडविलेली पेशवाई तिच्या डोळ्यांपुढें होती. तथापि इंग्रजांनीं आपल्या दत्तकाला परवानगी दिली नाहीं, व झांशीचें खासगी राज्य बुडविण्याचा घाट घातला होता, ही सहज पण स्वार्थी भावना तिच्या मनांत डांचत होती हेंहि विसरतां येत नाहीं. किंबहुना असा सरळ प्रश्नच विचारतां येईल

कीं, राणी लक्ष्मीबाईला जर दत्तकाची परवानगी कंपनी सरकारनें दिली असती, आणि अशा रीतीनें झांशीचें राज्य टिकण्याचें पक्कें आश्वासन मिळालें असतें, तर ती बंडांत सामील झाली असती काय ? असला अवांतर प्रश्न उपस्थित करून त्याचें उत्तर देण्याचा उद्योग एरवीं अस्थानीं वाटेल. परंतु जोन ऑफ आर्कशीं तुलना प्राप्त झाली असतां हा प्रश्न अप्रयोजकपणाचा ठरत नाहीं. झांशीवाली लक्ष्मीबाई वीर स्त्री यांत शंकाच नाहीं. पण जोन ही तिच्याइतकीच शूर निर्भय व धाडशी असून वरती पूर्णपणें निःस्वार्थी होती. इंग्रजांचा द्वेष करून त्यांच्या विरुद्ध लढण्याला तिला देशभक्तीशिवाय दुसरें कांहींच कारण नव्हतें. जोननें फ्रेंच राजपुत्राला गादीवर बसविल्या-नंतर तिला स्वतःकरितां कांहीं मिळवावयाचें असतें तर तें सहज मिळालें असतें. पण स्वार्थ हा तिच्या मनांतच नसल्यामुळें तिनें तसें कांहींच मागितलें नाहीं.

वरील प्रकारची तुलना करण्यांत राणी लक्ष्मीबाईला कमीपणा आणण्याचा उद्देश नाहीं. तर जगांत चांगल्या चांगल्यांतहि एकापेक्षां दुसरें कसें अधिक चांगलें असूं शकतें, म्हणजे विभूतिमत्वाच्याहि पायऱ्या कशा असूं शकतात, हें दर्शविण्याचाच माझा उद्देश आहे. स्वार्थाची किंचित् भेसळ असलेलेंहि पण झांशीवाली लक्ष्मीबाई-सारखें वीर स्त्रीचरित्र आढळलें तर तें स्पृहणीय व आदरणीयच. परंतु ती भेसळ नसलेलें, आणि क्षात्र गुणाच्या दृष्टीनें तर तितकेंच उज्ज्वल, असें जोन ऑफ आर्कसारखें चरित्र आढळलें तर तें अधिक स्पृहणीय व आदरणीय होय अशी कबुली देणें हेंच प्रामाणिकपणाचें ठरणार नाहीं काय ?

असो. चालू महायुद्धामुळें इंग्लंड व फ्रान्स यांचे जुने संबंध समजून घेण्याची कल्पना सुचली. तें वाचीत असतां जोन ऑफ आर्कचें चरित्र डोळ्यांत भरलें. पण हें लहानसें पुस्तक लिहिण्या-छापण्याचा खरा हेतु हा कीं, नव्या पिढींतील मुलींच्या हातीं हल्लीं नेहमीं जें वाङ्मय पडतें त्याहून वेगळ्या वळणाचें एखादें तरी पुस्तक पडावें. अगदीं प्राथमिक शाळेंतील मुलींना जोनच्या चरित्राचें मर्म कदाचित् समजणार नाहीं. पण हायस्कुलांतील वरच्या वर्गांमधील मुलींनीं, व विशेषतः कॉलेजांतील मुलींनीं, तें वाचलें तर त्यांना हा विषय आवडेल असें मला वाटतें. तरुण मुलींना चिकित्सा प्रिय असते. त्या मराठींतील काव्यें कादंबऱ्या यांची चिकित्सा करतात. त्याप्रमाणें जोनच्या चरित्राचीहि चिकित्सा त्या करितील अशी आशा मीं कां न बाळगावी ?

पुणें, ता. १० नोव्हेंबर १९४०. न. चिं. केळकर.

# फ्रान्सची झांशीवाली

## जोन ऑफ आर्क

फ्रान्सच्या उत्तरभागीं म्यूज नांवाची नदी वाहते. तिच्या कांठीं पूर्वीं डूमरेमी नांवाचें गांव होतें. तेथें आर्क या आडनांवाचा एक गरीब शेतकरी राहत असे. त्याला सन १४१२ सालीं एक मुलगी झाली. तिचें नांव जोन असें ठेवण्यांत आलें.

डूमरेमी गांवच्या आसपासची सृष्टिरचनाच अशी होती कीं, ती पाहून प्रौढांच्याहि मनांत अद्‌भुत कल्पना याव्या. मग मुलांविषयीं तर बोलावयासच नको. घरीं बसल्या ठिकाणाहून दोहीं अंगांला डोंगर दिसावयाचे. त्यांवर मोठमोठ्या वृक्षांच्या रांगा लागलेल्या. वसंत-ऋतूंत हे डोंगर फुलांनीं भरून गेले म्हणजे मनाला उल्हास वाटावा. पण हिंवाळ्यांत त्यांचा रूक्षपणा पाहून मन उदास व्हावें. तसेंच या ऋतूंत या दगडी डोंगरावर धुक्याचे डोंगर चढून बसत. त्यांमुळें आभाळ अंधारलेलें वाटे, आणि डोंगरमाथ्यावर चढणाराला पृथ्वी अदृश्य होऊन आपण स्वर्गांत आलों असें भासे. या डोंगरांत रान-डुकरें व लांडगे यांची वस्ती फार. यामुळें एकटादुकटा कोणी या भयाण रानांत फिरकत नसे. मारून आणलेल्या दर डुकरा-लांडग्या-मागें गांवचा पाटील बक्षीस देई इतकी या रानटी जनावरांची दहशत या गांवाला होती. मात्र खालीं उतरून नदीच्या पात्राकडे आलें म्हणजे ही भीति व हा उदासपणा कमी होई. नदी पावसा-ळ्यांत दुथडी वाहावयाची. इतर दिवसांत तिच्या पात्रांत पाणी

केवळ झुळुझुळू वाहण्यापुरतेंच असे. तरीपण नदीच्या ओलाव्यामुळें दोनहि तीरांवर गवती कुरणें आणि रानटी फुलझाडें नेहमीं पोसलीं जात. नदीच्या खोऱ्यांतली ही जागा डूमरेमी गांवच्या सगळ्या मुलांची मोठी आवडती क्रीडाभूमि असे. चांगल्या हवेच्या दिवसांत चुकलेंसवरलें मूल नेमकें या जागीं सांपडावयाचें.

गांवचीं प्रेतें पुरण्याची एक ठराविक स्मशानभूमि असे. गांवच्या देवळाला जावयाचें तें यांतूनच जावें लागे. आणि आर्क कुटुंबाचें घर तर या स्मशानभूमीला चिकटून असल्यासारखें होतें. गांवचे सगळे धार्मिक विधी याच देवळांत व्हावयाचे.

देवळापलीकडे गर्द झाडांची एक राई असे. देवळांतली प्रार्थना वगैरे संपली म्हणजे, शाळेंतून बाहेर पडलेल्या खेळाडू मुलांप्रमाणें, प्रार्थनेच्या वेळीं डांबून बसविलेलीं मुलें मोकाट सुटून या राईकडे धांवत व तेथें सर्व प्रकारचे खेळ खेळत. जवळच एक पाण्याचा झरा बांधून काढलेला होता. देवळाच्या संगतीमुळें त्या झऱ्याला दैवी नांव मिळालें होतें. आणि या झऱ्यावर रात्रीच्या वेळीं येऊन भूत-पिशाचें देवदूत—तात्पर्य सर्व प्रकारचे अद्‌भुत प्राणी पाणी पिऊन दिवसाची तहान भागवितात असें मुलांना वाटे. मोठमोठ्या वृक्षांनाहि अशींच चमत्कारिक नांवें देण्यांत आलीं होतीं. आणि त्यांची अगदीं धार्मिक विधीनें पूजाच होत नसली तरी त्यांच्यावर पुष्पमाळांचा शृंगार मुलांमुलींच्या आवडीप्रमाणें चढे.

आर्क कुटुंबाचें घर म्हणजे विटामातीचें एक घरटेंच होतें. कुटुंबांतील माणसांचा पुष्कळसा व्यवहार घराबाहेर होई, आणि तोहि गुरांढोरांच्या संगतींत. कारण, गुरेंढोरें हीच शेतकऱ्याची मुख्य संपत्ति. यामुळें घराला लागून कचऱ्याचे ढीग, खताचे खड्डे, जळणफाटीचे

भारे, गवताच्या गंज्या इत्यादि सरंजाम सदा सिद्ध असे. आणि जोन व तिचीं भावंडें हीं पुष्कळशीं यांतच वावरावयाचीं.

जोनचा बाप जॅकवीस व आई इझाबेला हीं घरचीं कामें आपापसांत वांटून घेऊन करीत. शेतकामांत जोनचे दोघे भाऊ जेम्स व पीटर हे बापाला साहाय्य करीत. जोन मोठी झाल्यावर घरच्या घरीं आईबरोबर लहानसान घरकामें करून शिवाय किरकोळ शिलाई व सूत कांतणें हीं इतर कामें करी. तिला लिहितां-वाचतां येत नव्हतें, पण आईच्या तोंडून पोथीपुराणांतील कथा तिला ऐकावयाला मिळत. त्यांवरून ख्रिस्ती धर्माची ढोबळ माहिती तिला मिळे. गरीब शेतकऱ्यांच्या घरीं धार्मिक कृत्यांवर खर्चण्याला दिवसां वेळ कोठून मिळणार ? म्हणून रात्रीं कामधाम संपवून, थंडीच्या वेळीं, आई मुलांना जवळ घेऊन निजे तेव्हां झोंप लागेपर्यंत देवा-धर्माच्या, साधूंच्या, सैतानाच्या, चेटकिणींच्या अशा गोष्टी ती हलक्या आवाजानें त्यांना सांगे. त्यांतून बालमनांना कांहीं मनोरंजन, कांहीं बोध, कांहीं अद्‌भुत वर्णन मिळे.

जोन ही शरीरानें उंच आणि धडधाकट असे. तिची बुद्धि वयाच्या मानानें तीक्ष्ण असून तिचा उपयोग सूत कांतणें, शिवणें, कशिदा भरणें इत्यादि कामीं चांगला होई. ती घरचीं मेंढरें राखी. आणि एखादे वेळीं जमीन नांगरण्याच्या कामींहि बापा-भावांना मदत करी.

जोनचें गांव नदीच्या खोऱ्यांत असून दोहों अंगांला डोंगर, टेकड्या व त्यांवर गर्द झाडी अशी सृष्टीची शोभा तेथें सिद्ध होती. या अतिरम्य जागेंत जोन आपलीं भावंडें व गांवचीं मुलें घेऊन खेळ व करमणूक करी. त्यांनीं नाचावें, गावें, फुलांच्या माळा घालून झाडें सुशोभित करावीं, एकमेकांच्या शर्यती लावून धावावें, पळावें.

पण इतक्या लहानपणींहि जोन ही इतर मुलांहून कांहीं वेगळीच वाटे. ती सालस सज्जन आहे अशी सर्वांची खात्री होतीच. आणि सगळ्या गांवांत उत्तम मुलगी म्हणजे जोन असें ठरून गेलें होतें.

तथापि याहून विशेष अशी एक गोष्ट होती. ती ही कीं, कोणी-तरी कोठूनतरी येऊन तिच्या कानांत एखादा दिव्य संदेश सांगतो अशी समजूत हळूहळू पसरत चालली होती. तिला दुरून कोणींतरी हांक मारलीसें वाटावें. आणि तिनें तेथें जाऊन पाहिलें म्हणजे हांक मारणारें माणूस कोणी उभें नसावें, पण कोणी गुप्त रूपानें बोलल्याचे शब्द स्पष्ट ऐकूं यावे. याला ती प्रथम भिई, दचके. पण हळूहळू या गोष्टी तिच्या अंगवळणीं पडूं लागल्या. आणि लोकांतहि तिच्याविषयीं पूज्यबुद्धि वाढूं लागली. लोकांना विशेष आश्चर्य हें वाटे कीं, तिला योग्य वेळीं रजोदर्शन प्राप्त झालें नाहीं. तसेंच गांवच्या तरुण मुलग्यांशीं वागतांना तिची वृत्ति तिच्या बरोबरीच्या इतर मुलींहून अगदीं वेगळी दिसून येई.

अशा रीतीनें वाढत जाऊन जोन सुमारें १७ वर्षांची झाली. त्या काळच्या चालीरीतींप्रमाणें तिचें लग्नाचें वय होऊन गेलें. तरी तिनें कोणाहि तरुणाविषयीं आवड प्रकट केली नाहीं आणि तिच्या आई-बापांनींहि, प्रथम तिच्या मनाची परीक्षा पाहिल्यावर, तिच्यावर आपल्या हौसेखातर लग्नाचा जुलूम केला नाहीं.

तो काळ फ्रान्स देशांत फार धामधुमीचा होता. राज्य एकतंत्री नव्हतें. राजाच्या गादीवर हक्क सांगणारे अनेक लोक निघावे, त्यांना स्वार्थी साथीदार मिळावे, त्यांनीं लहानसान सैन्यें जमवावीं, युद्धें करावीं, असा क्रम सुरू होता. यामुळें अंदाधुंदी माजली. चोर, दरोडे-खोर, गांवांतील गुंड लोक यांचें चांगलेंच फावलें. या दंगलींत सरकारी

बिनसरकारी सैन्यांतील लोक मोहिमेवर जातांना, किंवा पराभव होऊन पळून जातांना, जोनच्या गांवीं मुक्कामाला किंवा आश्रयाला येत. अशांपैकीं ज्या कांहीं लोकांची स्थिति करुणास्पद असे त्यांना जोन ही दयाबुद्धीनें अन्नपाणी पुरवी, अंथरूणपांघरूण देई, निवाऱ्याची जागा दाखवी. उलट कित्येक लोक गांवाला उपद्रव देत, तेव्हां गांवांतील लहानमोठे लोक मिळून त्यांचा प्रतिकार करीत त्यांत जोनहि आपला भाग घेई. एखादे वेळीं पेंढारांचा उपद्रव अनिवार दुस्सह झाला म्हणजे गांवच्या लोकांना गांव सोडून कांहीं वेळ पळूनहि जावें लागे. आणि उपद्रव टळला म्हणजे ते परत येत व नासधूस झालेलीं आपलीं घरेंदारें पुन्हां ठाकठीक करीत. या सुखदुःखांच्या अनुभवांचा परिणाम जोनच्या मनावर बराच झाला. तिच्या अंगीं धिटाई आधींची होती ती या कारणांनीं वाढलीच, पण देशांत ही अस्वस्थता कशानें माजली हें आणखी जाणून घेण्याची तिची इच्छा बळावूं लागली.

तिला कांहीं दिव्य संदेश ऐकूं येत हें वर सांगितलेंच आहे. ते संदेश धार्मिक स्वरूपाचे असत. उदाहरणार्थ, कोणी देवदूत येऊन तिच्या कानीं सांगे, "मुली, तूं थोर भाग्याची होणार. तूं सद्गुणी आहेस. तशीच राहा. नित्य प्रार्थनामंदिरांत जात जा." या आदेशाचा अर्थ तिला कळे. पुढें दुसरे कोणी देवदूत येऊन तिच्या कानांत बोलून म्हणूं लागले, "मुली, तुझा देश संकटांत आहे. तुझा राजा संकटांत आहे. तो राज्याला मुकला तर तो अन्याय होईल. म्हणून तूं त्याच्या मदतीला धांवून जा." पण असली न समजणारी भाषा ऐकली म्हणजे जोन भिऊन जाई. तिच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागे. ती त्या शब्दांचा अर्थ वडील माणसांना विचारी. पण त्यांना तरी तो अर्थ कोठून सांगतां येणार?

एक दिवस कानांत बोलणाऱ्या देवदूताशीं उलट बोलून ती म्हणाली, "पण, देवा, मी गरीब शेतकरी मुलगी. मला धड घोड्यावरहि बसतां येत नाहीं, धड हत्यार उचलतां येत नाहीं. आणि आपल्या देशाला व राजाला संकटांतून सोडीव हें तुम्ही मला काय सांगतां?" त्याला देवदूतानें उत्तर दिलें, "मुली, भिऊं नकोस. घाबरूं नकोस. तूं इच्छा धर म्हणजे तुला कळेल, समजेल आणि हातून घडेल. अद्भुत गोष्टी अशाच न कळत घडतात." जोननें ख्रिस्ती संतसंतिणींचीं नांवें, देवदूतांतील स्त्रीपुरुषांचीं नांवें कांहीं कांहीं ऐकलीं होतीं. तेव्हां तिनें मनानेंच ठरवलें कीं, हा आत्तां बोलला हा साधु मायकेल असावा. आतां बोलली ही साध्वी सेंट कॅथरीन असावी. सेंट मार्गारेट असावी. तिला समजून सांगणारें दुसरें कोणी नसल्यानें ती आपल्या मनालाच प्रश्न विचारी आणि तिचें मनच तिला उत्तर देई.

हे खरे चमत्कार नसून आभास असोत! पण त्यांचा तिच्या मनावर इतका खोल ठसा उमटून राही कीं, तो काढून पुसून टाकणें हें तिच्या प्रेमळ आईबापांना शक्य होईना.

तिला नुसते असले आवाजच ऐकूं येत नसत, तर कांहीं अद्भुत देखावेहि दिसत. "हें पहा! आतां स्त्रीजातीचे ते देवदूत आले आहेत. त्यांचें शरीर अगदीं गोरें-गोरेंपान आहे. त्यांच्या डोक्यांवर फुलांचे मुकुट आहेत. त्यांच्या भोंवतीं कोणींतरी दिवट्या पाजळून धरल्या आहेत." कांहीं देवदूतांचे आवाज इतके मऊ व कर्णमधुर भासत कीं, जसे कांहीं पाण्याचे प्रवाह. कांहींचे स्वर इतके करुण वाटत कीं, बोलतांना त्यांच्या डोळ्यांतून अश्रू येत आहेत असा भास तिला होई. आणि तिचा हात आपल्या डोळ्यांशीं जाई तेव्हां तो तर खऱ्याखुऱ्या अश्रूंनींच भिजे.

या सर्वांचा अर्थ नीटसा न कळण्यामुळें जोनचें मन अतिशय गोंधळून गेलें. तिला काय करावें हें सुचेना. तिला भोंदू, कपटी, मायावी म्हणण्याची कोणाचीहि छाती नसे. पण तिनें काय करावें याविषयीं जाणत्या अनुभवी लोकांनाहि तिला कांहीं सल्ला सांगतां येईना.

आपण पाहिलेले देखावे, ऐकलेले शब्द, हे जोन आपल्या घरांतील माणसांना व बाहेरच्या आपल्या मित्रांमैत्रिणींना तपशीलवार सांगे. पण त्यावर कोणाचा विश्वास कसा बसावा? आणि जोनला खरी अडचण ही झाली कीं, बाहेरचे लोक एक वेळ तिचें म्हणणें खरें घेऊन चालत, पण घरच्या मंडळींनाच अविश्वास वाटे!

तिचें कोणीकडून तरी लग्न करून टाकलें तर तिची ही विकृति नाहींशी होईल असें वाटल्यामुळें, त्यांनीं त्या दिशेनें प्रयत्न केला. एक तरुण मनुष्य पुढें येऊन त्यांना खोटेंच म्हणूं लागला कीं, "लहानपणीं तुम्हीं मला ही मुलगी देण्याचें वचन दिलें नव्हतें काय?" कदाचित् जोनच्या आईबापांनींच हा दावेदार उभा केला असेल! किंवा तसा कोणी उभा राहिला हें आपल्या पथ्यावर पडलें असें पाहून ते म्हणूं लागले, "होय, बाबा, आम्हीं तुला तसें वचन दिलें होतें खरें. पण आतां ही मुलगी 'नाहीं' म्हणते त्याला काय करावें!" तेव्हां हें भांडण जवळच्या धर्माधिकाऱ्याकडे गेलें. जोनच्या आई-बापांना वाटे कीं, तिची वृत्ति जर धर्माकडे वळलेली आहे तर अनायासानें या धर्माधिकाऱ्याचा तरी निर्णय ती मानील. पण तेंहि घडलें नाहीं. ती आईबापांना म्हणाली, "तसें वचन तुम्हीं दिलेलें मला माहीत नाहीं आणि तुम्हीं दिलें असलें तरी मीं तें काय म्हणून मानावें? माझी मी स्वतंत्र आहें." तेव्हां तिकडूनहि नाइलाज झाला.

ही गरीब मुलगी एवढ्या मोठ्या धर्माधिकाऱ्यापुढें इतक्या धिटाईनें कशी बोलली याचें मात्र सर्वांना आश्चर्य वाटलें.

दुसरीहि एक चमत्कारिक गोष्ट यापूर्वी दोन वर्षें घडली होती. ती अशी. तिच्या बापाला एक दिवस असें स्वप्न पडलें म्हणे, कीं ‘ गांवांत शिपाई लोक जमले आहेत. त्यांनीं हत्यारें घेतलीं आहेत. ते कोठें तरी मोहिमेवर निघाले आहेत. आणि आपली मुलगी जोन ही देखील त्या लोकांत मिसळून चालली आहे. ’ हें पाहून तो बिचारा भीतीनें खडबडून जागा झाला. त्याला वाटलें कीं, मुलीचें हें लक्षण कांहीं चांगलें नाहीं. ती उनाड निघणार काय ? कारण ज्यांच्या मेळांत ती दिसली ते आपले असे तसेच होते ! मग तो आपल्या मुलांना म्हणाला, “ माझें स्वप्न खरें असो वा खोटें असो. पण जर कां जोननें खरोखरीच असें कांहीं केलें तर मी तिला नदींत बुडवून मारीन. आणि ती माझ्या हातून निसटली तर तुम्ही तें काम पुरें करा.” आपल्या बापाच्या या स्वप्नाची आठवण आतां जोनला होऊन ती अधिकच घाबरली.

शेवटीं तिला एक उपाय सुचला. ती मनांत म्हणाली, “ आतां यापुढें घरीं राहण्याची सोय नाहीं. कोठेंतरी बाहेर निघून जावें हें बरें.” मग तिनें एक युक्ति केली. जवळच्या गांवीं तिचा एक चुलता राहत असे. त्याची बायको बाळंत व्हायला घातली आहे, असें पाहून जोन चुलत्याला म्हणाली, “ तुम्ही नका काळजी करूं, काका ! मी येतें तुमच्याबरोबर काकूचें बाळंतपण करायला.” तिकडे गेल्यावर एक दिवस ती चुलत्याला घेऊन शेजारच्या एका लष्करी ठाण्यावर गेली. आणि तेथील लष्करी अधिकाऱ्याकडून कांहीं एका कामांत आपल्याला कांहीं साहाय्य मिळेल कां असा तिनें आपल्या चुलत्याकडून शोध

केला. तेव्हां तो अधिकारी रागावून म्हणाला, "उगाच काय या तरण्या पोरीचें कौतुक सांगतां! तिला काय शिपाईगिरीचीं स्वप्नें पडतात? ठीक आहे. तिला चांगली झोडपून काढा म्हणजे तिच्या अंगांतलें हें वेड जाईल. आणि मग तिला घरीं बापाकडे पोहोंचवा!"

पण जोनचा चुलता ममताळू होता. त्यानें तसें कांहींच केलें नाहीं. उलट आईबापांच्या घरांतून कायमची निघून जाण्याला त्यानें जोनला मदतच केली. तो म्हणाला, "तिचें काय व्हायचें असेल तें बाहेर होवो. घरचा तरी त्रास तिला नको." घरून निघण्यापूर्वी जोननें मोठ्या दुःखी मनानें आपल्या आवडत्या बालमित्रांचो व मैत्रिणींची अखेरची म्हणून भेट घेतली. आणि "उरलें सगळें आयुष्य अविवाहित राहून तें एखाद्या महत्कार्याकडे लावीन" अशी विधिपूर्वक शपथ तिनें वाहिली. कल्पनेनें डोळ्यांना दिसणाऱ्या देवदूतांना ती म्हणे, "देवा! तुम्ही मला नुसतें दर्शन कां देतां? मला तुमच्याबरोबर घेऊनच कां जात नाहीं?" पण तिला त्यांनीं बरोबर नेलें नाहीं. तेव्हां ती मनांत म्हणाली, "येथें या जगांतच कांहींतरी महत्कार्य माझ्या हातून व्हावें अशी त्यांची इच्छा नसेल कशावरून?" असें म्हणून तिनें मनाचें समाधान केलें.

आणि या महत्कार्याची सूचना दैवयोगानें तिला परभारें मिळण्याची सोय केली असेंच म्हणावें लागतें. कारण या सुमारास अशी एक भुमका उठली होती कीं, एका भविष्यवाद्यानें एक अद्भुत भविष्य वर्तविलें आहे त्याचे शब्द असे, "एका स्त्रीनें फ्रान्स देशाचा नाश केला, पण शेवटीं दुसरी एक स्त्रीच त्याचा उद्धार करील!" ज्याच्या त्याच्या तोंडीं हेच शब्द. पैकीं फ्रान्सचा नाश करण्याला, त्याच्या जिवावर उठण्याला, तयार झालेली ही स्त्री कोण हें तेव्हां

प्रसिद्धच होतें. ती घातक स्त्री म्हणजे प्रत्यक्ष फ्रान्सची राणी! पण देशाचा उद्धार करणारी स्त्री कोण हें मात्र कोणास सांगतां येईना. आणि मौज ही कीं, पुष्कळ लोकांकडून "ही दुसरी स्त्री कोण?" असे प्रश्न वारंवार कानांवर येऊं लागल्यामुळें जोनला अशी स्फूर्ति एकदम झाली कीं, " देशोद्धार करणारी ती स्त्री मीच नसेन कशावरून?"

असो, या भविष्यांतील देशावर संकट आणणारी पहिली स्त्री कोण व्यक्ति होती, व देशावरील तें संकट कोणतें होतें, याची थोडी माहिती प्रथम सांगतों. आणि देशाचा उद्धार करणाऱ्या त्या दुसऱ्या स्त्रीचा वृत्तांत म्हणजेच पुढें घडलेलें जोनचें चरित्र होय.

यापूर्वी बरींच वर्षे फ्रान्स व इंग्लंड यांच्यामध्यें युद्ध माजून राहिलें होतें. सन १४१५ सालीं इंग्लंडचा राजा ५ वा हेन्री यानें फ्रेंच लोकांवर अगिन्कोर्ट येथील लढाईंत मोठा विजय मिळविला. इंग्लंडच्या इतिहासांत ही लढाई फार प्रसिद्ध आहे. आणि या तरुण हेन्री राजाच्या शौर्याचें वर्णन महाकवि शेक्सपिअर यानें मोठें सुंदर केलें आहे. युद्धाचें कारण फारां दिवसांचें. तें असें कीं, इंग्लंडचे राजे म्हणत, "फ्रान्सच्या गादीवर आमचा हक्क आहे." उलट फ्रान्सचे राजे म्हणत, "या देशांत कांहीं परगणे तुमच्या मालकीचे असले तरी या देशाचे राजे आम्ही. तुम्ही मोठे जमीनदार, फार फार तर आमचे मांडलिक." या लढाईनंतरहि आणखी पांच वर्षे युद्ध चालून शेवटीं १४२० सालीं ट्रॉय येथें उभयपक्षीं तह झाला. त्यांत असें ठरलें कीं, 'फ्रेंच राजाची मुलगी इंग्रज राजा हेन्री याला आज लग्नांत द्यावी, आणि हल्लींच्या फ्रेंच राजाच्या मृत्यूनंतर फ्रान्सची गादी इंग्लंडच्या राजवंशाकडे जावी.' या वेळीं फ्रान्सच्या गादीवर ६ वा चार्लस नांवाचा राजा होता.

हा तह अमलांत येतांच फ्रेंच राजकन्या कॅथरीन हिचें लग्न हेनरीशीं लागलें. आणि फ्रान्सचा भावी राजा म्हणून, व आजचा दिवाण या नात्यानें, हेनरीनें फ्रान्सच्या राज्यकारभारांत हात घालण्यास सुरुवात केली. पण या प्रकरणांत एक अन्तस्थ वाईट व लज्जास्पद गोष्ट होती. या फ्रेंच राजाची राणी इझाबेल वाईट चालीची होती. ती एका बलाढ्य फ्रेंच सरदाराशीं त्याच्या स्त्रीप्रमाणें नांदे. आणि त्या दोघांच्या मैत्रीच्या या काळांत तिला एक मुलगा झाला होता! चार्लस राजाला हें गृह-छिद्र माहीत होतें. प्रत्यक्ष आपली बायको आपणाला हीनपणें वागविते, आणि आपल्यादेखत परपुरुषाशीं नांदते, ही गोष्ट त्याला कशी बरें बरी वाटेल? पण तो सर्वच बाजूंनीं दुबळा होता. म्हणून 'राणीच्या पोटीं जन्मलेला मुलगा हा खरा राजपुत्र नव्हे' असा प्रवाद सर्वत्र असतां, राजाला वर मान करून त्याचा प्रतिकार करतां येत नव्हता. आणि राणी पडली निर्लज्ज! तीहि उघडपणें कबूल करी कीं, माझ्या मुलाला राजपुत्र म्हणतात पण तो राजाचा खरा पुत्र नाहीं.

इंग्रज हेनरी राजानें फ्रेंच चार्लस राजाचा पराभव केला आणि वर सांगितल्याप्रमाणें तहाच्या अटी पुढें आल्या, तेव्हां राणीनें त्या अटींना उत्साहानें संमति दिली! ती मनांत म्हणाली, "माझ्या मुलाला राज्य न मिळेना का? पण इंग्लंडच्या विजयी हेनरी राजाला जावई करून त्याला फ्रान्सचें राज्य दिलें तर माझी मुलगी कॅथरीन ही तरी राणी होईल कीं नाहीं!" इझाबेल राणीची ही कामगिरी लक्षांत घेऊन तिला इंग्रज राजाकडून दरमहा दोन हजार रुपयांची तैनात ठरवून देण्यांत आली. यावरून फ्रान्सचा नाश करण्यास निघालेली वरील भविष्यांतील स्त्री कोण हें आतां वाचकांच्या लक्षांत येईल!

पण पुढें लौकरच पारडें फिरलें. कारण हा तह फ्रेंच लोकांना व सरदारांना–म्हणजे त्यांपैकीं पुष्कळांना–मान्य नव्हता. शिवाय इंग्लंड-मधून फ्रान्सचें राज्य करणें हें उंटावरून शेळ्या हांकण्यासारखें होतें. पारीस म्हणजे कांहीं सगळा देश नव्हे. याचा अर्थ देशामध्यें ठिक-ठिकाणीं असणारे देशाभिमानी सरदार आपापलीं ठाणीं बन्दोबस्तानें आवळून बसले होते. आणि तह हवा तसा झाला तरी तो पदरांत पाडून घेण्याला हेनरीला सैन्यानिशीं हालचाली व लढाया कराव्या लागणार हें उघड होतें.

पण लवकरच एक अकल्पित योग घडून आला. सन १४२२ सालीं, दोन महिन्यांच्या अंतरानें, इंग्लंडचा राजा पांचवा हेनरी व फ्रान्सचा राजा सहावा चार्लस दोघेहि मृत्यु पावले ! चार्लस हा आपल्या प्रजेला फार प्रिय होता, पण स्वतः त्याच्याच राणीनें त्याची दुर्दशा केली होती. यामुळें त्याचा दफनविधि एका बाजूस अगदींच गरिबी थाटानें झाला. चार्लसच्या मृत्यूनंतर लगेच पूर्वींच्या तहाला अनुसरून ५व्या हेनरीचा मुलगा ६वा हेनरी याच्या नांवाची द्वाही फ्रान्सचा राजा म्हणून फिरविण्यांत आली. पण तो अवघा दहा महिन्यांचा होता. यामुळें त्याचे दोन चुलते बेडफर्ड व ग्लोस्टरचे ड्यूक यांनीं त्याच्यातर्फें राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. बेडफर्ड फ्रान्समध्यें राहिला व ग्लोस्टर इंग्लंडमधून त्याला मदत करी.

फ्रान्समधल्या कांहीं कांहीं प्रमुख लोकांनीं व संस्थांनीं या ६व्या हेनरीला फ्रान्सचा राजा म्हणून मान्यता दिली. परन्तु बोरी या नांवाच्या प्रान्तांतील एका गांवीं कांहीं देशभक्त फ्रेंच सरदार एकत्र जमले आणि त्यांनीं ६व्या चार्लस राजाच्या मुलाची द्वाही फ्रान्सचा ७वा चार्लस या नांवानें फिरविली. हा मुलगा १९ वर्षांचा होता. तो

विद्याव्यासंगी होता, पण त्याबरोबर चैनीहि होता. राज्यकारभाराकडे त्याचें लक्ष मुळींच नव्हतें. अवघ्या सात परगण्यांनीं त्याला मान्यता दिली होती. शिवाय त्याला प्रत्यक्ष राज्याभिषेक झाला नव्हता. यामुळें तो आपले दरबारी लोक बरोबर घेऊन पॉइटियर्स या गांवीं तात्पुरती राजधानी करून राहिला. त्याचा पक्ष उचलून धरणारे आरमग्नॅक किंवा गॅस्कन हे लोक शूर होते, परंतु ते फ्रेंच लोकांना आवडत नव्हते. कारण ते केवळ पुंड पेंढाऱ्यांसारखे लुटारू व धामधूम करणारे होते. म्हणून या तरुण फ्रेंच राजाच्या सचिवांनीं, इंग्रजांचे त्या वेळचे शत्रु जे स्कॉच लोक यांना आपल्या पक्षाला मिळविण्याचा प्रयत्न चालविला. त्यांचा मुख्य आधारस्तंभ ड्यूक ऑफ बर्गंडी हा होता. तसेंच अंजु व लोरेन या परगण्यांचे सरदार त्याच्या बाजूला होते. एका अर्थीं हे दोन पक्ष (म्हणजे इंग्रज राजा ६ वा हेनरी व फ्रेंच राजा ७ वा चार्लस) तुल्यबल होते. कारण फ्रेंच राजाच्या बाजूला लोक थोडे असले तरी उलट पक्षीं इंग्रज सेनापतीला सैन्याची कुमक दूर इंग्लंडहून आणावी लागे. निरनिराळ्या गांवांतील लोक कमीअधिक देशभक्तीनें प्रेरित झालेले असत, यामुळें इंग्रज सेनापतीला फ्रेंचांकडून विरोध होई. पण तो सुसंगत किंवा सम प्रमाणांत होत नसे.

१४२८ च्या जूनमध्यें इंग्लंडहून बरीच कुमक आल्यामुळें फिरून युद्ध जोरानें सुरू झालें. फ्रेंच राजाच्या हातीं असलेल्या परगण्यांच्या तोंडावर ऑर्लिन्स या नांवाचें एक बळकट ठाणें होतें. त्याला त्यापुढील ऑक्टोबर महिन्यांत इंग्रजांनीं वेढा दिला. आंत शहराचें रक्षण करणारे अवघे पांचशेंच फ्रेंच शिपाई होते. तथापि नागरिकांच्या साहाय्यानें या शहराच्या ३४ बुरुजांवरून इंग्रजांवर मारा करण्यांत

येई. आंतल्या लोकांजवळ तोफा व दारुगोळा चांगल्या प्रकारचा होता. उलट वेढा घालणारें सैन्य संख्येनें मोठें व प्रबळ होतें. १४२९ च्या मे महिन्यांत असें दिसूं लागलें कीं, ऑर्लिन्सचें ठाणें आतां इंग्रज हस्तगत करणार! पण याच सुमारास जोन ऑफ आर्कचा उदय झाला व तिनेंच शेवटीं तो वेढा उठविला. म्हणून तिचा जीवनवृत्तान्त पूर्वी सांगितला तो आतां त्यापुढें सांगतों.

मागें सांगितल्याप्रमाणें जोनला आईबापांच्या घरीं राहणें अशक्य होऊन तिनें आपलें घर व गांव कायमचें सोडलें. कारण ईश्वराचा आदेश तिच्या डोक्यांत घुमतच होता. प्रथम ती व्हॉकोलूर या गांवीं गेली व तेथील ठाणेदाराला म्हणूं लागली, "ठाणेदारसाहेब, तुम्ही तरी माझा निरोप म्हणून फ्रेंच राजपुत्राला सांगा. म्हणावें, टिकाव धरून राहा. लढाई देण्याची घाई करूं नका. ईश्वर लौकरच तुमच्या साहाय्याला धांवून येणार आहे. तो राजपुत्राला राजा केल्याशिवाय राहणार नाहीं." ठाणेदाराला वाटलें, ही वेडी पोर उगाच कांहींतरी बडबड करते. पण ती एकसारखें देवाचें नांव घेई म्हणून ठाणेदारानें गांवच्या धर्माधिकाऱ्याचा सल्ला घेतला. दोघांनीं ठरविलें कीं, ही कोणीतरी सैतानाची अवलाद असावी, चेटकी असावी. म्हणून तिला त्यांनीं गांव सोडून जाण्याचा हुकूम केला!

पण सुदैवानें गांवच्या लोकांच्या मनावर तिला पाहून कांहीं वेगळाच ग्रह झाला होता. त्यांना तिचें फारच कौतुक वाटलें. केवळ तिचें दर्शन घ्यावें म्हणून लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. कारण ती जें जें बोले तें तें त्यांना अद्‌भुत वाटे. तिच्या अंगावर गरिबी चालीचे फाटके मळके कपडे होते. पण त्यांनींच तिला उठाव दिला. बद्रीकूर नांवाचा एक मातबर गृहस्थ होता. त्यानें देखील तिला साहाय्य

करण्याचें ठरविलें. त्यानें फ्रेंच राजपुत्राकडे निरोप पाठवून "जोन भेटीला आली तर तिची भेट घडावी" अशी विनंति केली. राजपुत्रानें ती परवानगी दिली. कारण तिच्या तोंडून जे उद्गार व भविष्य निघत तीं सर्व त्याला अनुकूल अशीं असत. यामुळें तीं ऐकून त्याला वाटलें कीं, आपणाला दिवस वाईट आले आहेत, तेव्हां मिळेल त्याची मदत घ्यावी. मग ती वेडी जोन का असेना! कुणाला ठाऊक कशांतून काय निघेल तें! गांवच्या लोकांचा तर तिच्यावर पक्काच विश्वास बसला. कारण चालू लढाईसंबंधानें तिनें कांहीं तरी बोलावें आणि तेंच नक्की खरें झाल्याची वार्ता त्यांच्या कानांवर यावी. असें अनेकदां घडलें. राजपुत्र तिची भेट घेणार हें ऐकून त्यांना आनंद झाला. त्यांनीं वर्गणी करून जोनला एक घोडा नजर केला आणि ठाणेदारानें तिला एक तलवार दिली.

अशा रीतीनें जोन ही राजपुत्राच्या भेटीला निघाली. वाटेंतला मुलूख उद्ध्वस्त झालेला. दोन्ही सैन्यांतील उंडगे शिपाई धामधूम घालीत. चालण्याला सडक नाहीं. नद्यांवर पूल नाहींत. उलट त्यांना पूर आलेले. अशा स्थितींत तिनें अनेक कोस मजल-दरमजल करीत राजाची छावणी गांठली. दरबारच्या लोकांत दुमत होतें. प्रतिकूल होते त्यांनीं वाटेंतच तिला एके ठिकाणीं अडवून तिजवर छापा घालण्याचाहि बेत केला होता. पण तो फसला. ती येऊन पोंचली तरी दोन दिवस तिची दाद दरबारांत लागेचना. कांहीं दरबारी म्हणत, "या चेट-किणीला घरांत घेऊं नये. आधीं तिच्या मूळच्या गांवीं तिची चौकशी करावी." शेवटीं दरबारच्या कांहीं बाया व अलेंककॉनचा ड्यूक यांनीं तिची बाजू घेतली. शिवाय वेढ्यांत सांपडलेल्या ऑर्लीन्सच्या नाग-रिकांतर्फेहि तिच्या बाजूनें रदबदली करण्यांत आली.

तेव्हां अखेर तिला राजपुत्राच्या भेटीला बोलावण्यांत आलें. पण त्यांतहि थोडी कुचेष्टेनें योजना झाली. राजानें एकटयानें तिची गांठ घ्यावी, पण तशी न घेतां मुद्दाम थाटाचा दरबार भरविण्यांत आला. हेतु हा कीं, तिचे डोळे दिपून ती मांबावून जावी. तिची परीक्षा पाहण्याकरितां आणखी एक हिकमत करण्यांत आली. इतर कांहीं दरबारी लोकांत मिसळून राजा साधे कपडे घालून उभा राहिला. हेतु हा कीं, तिला कोणी न सांगतां तिनें आपण होऊन राजाला ओळखलें तर तिला ईश्वरी साहाय्य खरें ! उलट तिनें राजा ओळखला नाहीं तर ती लबाड समजावी. पय या हिकमतखोरांचीच पुरी फजिती झाली. कारण त्या दरबारी लोकांच्या घोळक्यांत शिरून नक्की राजाला ओळखून काढून जोननें त्याचे पाय धरले. तरी राजानें तिला म्हणून पाहिलें, “ मुली, मी राजा नव्हें.” तेव्हां ती म्हणाली, “ भलतेंच काहीं तरी ! तुम्ही राजे नव्हे तर कोण ? ” पण लगेच तिनें थोडी दुरुस्ती केली. ती म्हणाली, “ होय, तुम्हांला मीं इतक्यांतच राजेसाहेब म्हटलें ही एका अर्थी माझी चूकच खरी. कारण कोणत्याहि फ्रेंच राजाला ऱ्हीम्स येथील प्रार्थनामंदिरांत विधिपूर्वक अभिषेक झाल्याशिवाय तो राजपद पावत नाहीं, हें मला माहित आहे. म्हणून तुम्हीं अजून राजपुत्रच आहां. खरे राजे नव्हत. पण तुम्हांला ऱ्हीम्सला नेऊन राज्याभिषेक करावा असा मला ईश्वरी आदेशच झाला आहे. आणि ती गोष्ट लवकरच घडून येईल. मी एक केवळ गरीब शेतकऱ्याची मुलगी आहें. माझें नांव जोन.”

हा प्रकार पाहून सगळे लोक थक्क झाले. त्यांनीं ठरविलें कीं, हा कांहींतरी दैवी चमत्कार किंवा निदान भुताटकीचा प्रकार असावा. तेव्हां राजमंडळाच्या दरबारी अध्यक्षानें डॉक्टर, वैद्य, धर्माधिकारी, मठवासी, महंत इत्यादि लोकांची एक सभा भरविली, व “ या मुलीची

परीक्षा–तपासणी करा" असा हुकूम दिला. त्यांच्यासमोर एका बाकावर बसून तिनें त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें समर्पक दिलीं. तिनें त्यांना आपले अनुभव सांगितले. ते इतक्या साध्या शब्दांनीं व तपशीलवार सांगितले कीं, त्या सभेला त्याचा मोठा अचंबा वाटला. एका मठवासी महंतानें तिला गोंधळवून सोडण्याकरितां एक तेढा प्रश्न टाकला. तो म्हणाला, "मुली, आमचा देश परक्या इंग्रजांच्या हातून मुक्त व्हावा ही जर ईश्वराचीच इच्छा व आज्ञा आहे, तर राजेसाहेबांनीं पदरीं सैन्य कशाला ठेवावें ? सैन्य ठेवून लढल्याशिवायहि ती गोष्ट घडेलच!" पण त्याचा हा कावा ओळखून जोन म्हणाली, "वाहवा, असें कसें होईल ? सैन्यानें लढलेंच पाहिजे. तेंच त्याचें काम. व तें लढेल तर न्यायाचा पक्ष म्हणून त्याला विजय मिळवून देणें हें देवाचें काम ! " विद्यापीठांतला एक पंडित होता. तो म्हणाला, "मुली, देव-देवदूत तुझ्याशीं बोलतात ती भाषा कशी काय असते ग ? " तेव्हा तिनें हंसून उत्तर केलें, "तुम्ही बोलतां त्यापेक्षां ती भाषा पुष्कळच चांगली असते ! " मग आणखी एकजण म्हणाला, "तूं आम्हांला कांहीं चमत्काराची खूण दाखविल्याशिवाय आम्ही तुझ्यावर विश्वास कसा ठेवावा ? " तें ऐकून ती किंचित् रागावून म्हणाली, "मी तुम्हांला चमत्कार दाखवून पैसे उकळण्याला, किंवा तुम्हांपैकीं कोणाला माझ्या नादीं लावायला आलें नाहीं. तुम्हांला मजकडून होणारा चमत्कारच पाहायचा असेल तर तो ऑर्लिन्स शहराजवळ दिसेल. त्या शहराला पडलेला इंग्रजांचा वेढा मी उठविणार आहें. कृपा करा. मला थोडेंबहुत सैन्य द्या म्हणजे मी निघालें. "

तरीहि अखेर खात्री पटण्याकरितां दरबारी बायकांनीं तिला एकीकडे नेऊन बायकांच्या दृष्टीनें तिची परीक्षा केली. तींत त्यांची खात्री

झाली कीं, जोन ही अजून कुमारीच आहे. तिच्या शीलाला मुळींच कलंक लागलेला नाहीं. दैवयोगानें असें घडलें कीं, जोनचा पत्ता-मुद्दा काढण्याकरितां तिच्या मूळच्या गांवाकडे कांहीं दूत राजदरबारनें पाठविले होते, तेहि याच वेळीं परत आले आणि जोनच्या भलेपणा-विषयीं त्यांनीं खात्री केली. ऑर्लिन्समध्यें वेढ्यांत सांपडलेल्या लोकां-कडूनहि याच वेळीं तगाद्याचे निरोप येऊं लागले. "लवकर कुमक पाठवा, लवकर कुमक पाठवा, नाहींतर आम्ही मरतों !"

पण येथून पुढें सर्वच गाडें बदललें. जो कोणी येई तो जोनला अनुकूल असेंच बोले किंवा सांगे. तिनें चार ठळक भविष्यें वर्तविलीं, तीं ऐकून लोकांना फार उत्साह वाटला. तीं भविष्यें अशीं:—

( १ ) ऑर्लिन्स शहराला इंग्रजांचा वेढा पडला आहे तो मी उठवीन. (२) चार्लस् राजपुत्राला ऱ्हीम्स येथें नेऊन त्याला राज्या-भिषेक करवीन. ( ३ ) पॅरिस शहर फिरून फ्रेंच राजाच्या स्वाधीन होईल. ( ४ ) ड्यूक ऑफ ऑर्लिन्स हल्लीं लंडनच्या किल्ल्यांत कैदी आहे तो सुटून फ्रान्सला परत येईल.

यापूर्वींचे सहा आठवडे असेतसेच फुकट गेले होते. पण आतां जोनच्या सरंजामाची तयारी जोरांत सुरू झाली. तुवर या शहरीं चिलखतें चांगलीं तयार करीत. म्हणून त्या गांवीं तिच्याकरितां एक शुभ्र रंगाचें चिलखत करविलें. तें थोडें जड झालें. कारण जाड होतें म्हणून स्त्रीला पेलण्याला कठीण. पण तिनें तें स्वीकारलें. तिला राजानें एक व दुसऱ्या एका सरदारानें एक असे घोडे बक्षीस दिले. लढाऊ सरदार या नात्यानें तिला स्वतःचें म्हणून निशाण हवें होतें. तें तिनें आपल्या आवडीप्रमाणें तयार केलें. हें निशाण पांढऱ्या वस्त्राचें असून, त्यावर फ्रान्सची खूण म्हणून लीली नांवाचीं फुलें, आणि ख्रिस्त

व देवदूत यांचीं चित्रें, काढलीं होतीं. हें निशाण एका भाल्यावर बसविलें होतें. ती घोड्यावर बसून तो भाला आपल्या हातांत धरी. चिलखताच्या तोंडावरील झांकण खालीं ओढलें म्हणजे आंत मनुष्य कोण आहे हें दिसत नाहीं. यामुळें लोकांनीं ही जोन असें ओळखण्याकरितां हें निशाण अवश्य होतें. तिनें आपल्या ढालीवर पांढऱ्या कपोताचें चित्र रंगविलें. आणि त्याच्या तोंडावर एक कागदाची वाटोळी घडी ठेवून देऊन त्यावर, ' हा ईश्वराचा आदेश ' अशीं अक्षरें लिहिलीं.

राजानें तिला एक तरवारहि देऊं केली. पण ती म्हणाली, " मी लढाईवर निघालें आहें, तरी आपल्या हातानें कोणाहि मनुष्याला मारणार किंवा जखमी करणार नाहीं. लढाऊ शिपाई लोक यांनींच वाटेल तें करावें. ईश्वरी आदेशाची तरवार माझ्या हातीं आहे तेवढी पुरे." असेंहि सांगतात कीं, तिच्या सूचनेवरून जवळच्या एका मृत साधूच्या थडग्याजवळ लोकांनीं जमीन खणली तेव्हां त्यांतून एक जुनी तरवार निघाली. तिच्यावर क्रूसाच्या पांच खुणा होत्या. लोकांनीं ती घेऊन साफ चकचकीत केली व तेल लावून ती जोनकडे पाठविली. तिचा मात्र तिनें स्वीकार केला. गांवच्या लोकांनीं त्या तरवारीकरितां एक किनखापी व एक मखमली अशीं दोन म्यानें तयार करून दिलीं. ही तरवार ती आपल्याबरोबर बाळगी. परन्तु केव्हांहि तिचा उपयोग करण्याचा तिचा विचार नव्हता. राजानें तिच्या सहायाला दोन बारगीर दिले. कांहीं पेंढारी व लढाऊ लोकहि आपण होऊन तिच्याभोंवतीं गोळा झाले. तिनें एकदोन खिदमतगारहि भले पाहून पसंत केले. इतक्यांत तिचे भाऊ जॉन व पीटर, व त्यांची आई हीं एका डोंगरी क्षेत्राच्या यात्रेला गेलीं होतीं तीं येऊन तिला भेटलीं. त्यांच्याबरोबर पास्करेल नांवाचा एक धर्मशील भटजी होता. त्यानें आतां जोनच्या परिवारांतच

राहण्याचें ठरविलें. जॉन ड्यूनोई नांवाचा एक शूर तरुण शिपाई होता तो तिच्या हाताखालीं दुय्यम शिलेदार म्हणून देण्यांत आला.

कुमारी जोन ऑर्लिन्सकडे निघाली हें पाहून इतर अनेक शिलेदार व स्वार त्याच कामावर निघाले. राजानें तिला सरदार हें पद दिलें नव्हतें. तथापि तिच्या धर्मनिष्ठेच्या क्षात्र तेजानें ती या छोटेखानी सैन्याची सरदारच बनली. त्याचें प्रत्यंतर हें कीं, हा सर्व लष्करी परिवार "आम्हांला हुकूम करा" असें तिला म्हणे व ती जे हुकूम करी ते हुकूम ते मानीत.

पण लष्करी शिस्तीपेक्षां एक वेगळीच शिस्त जोननें आपल्या छावणींत सुरू केली. त्यामुळें जे लोक पूर्वी क्रूर व दुर्वर्तनी होते त्यांचा स्वभाव बदलला. पुंडपेंढाऱ्यांनीं लूटमार करण्याची आपली रीत सोडून दिली. तें पाहून लोकांना आश्चर्यच वाटलें. कोणच्याहि लष्कराबरोबर बाजारी बायका हिंडत असतात. पण जोननें त्या सर्वांना निवडून काढून घरोघर पाठवून दिलें. छावणींत देवाच्या नांवें जाहीर प्रार्थना होऊं लागल्या. मुक्कामा-मुक्कामाला ती देवाच्या नांवानें कट्टे बांधून त्यांवर फुलें वाही. ती उघड्या मैदानांत भर पुरुषांच्या मेळ्यांत अंगावर चिलखत घालून खुशाल झोंपीं जाई. तिला भय म्हणून कुणाचेंच वाटत नसे.

अशा रीतीनें ता. २९ एप्रिल १४२९ रोजीं ती ऑर्लिन्स शहराला पोंचली. तिनें प्रथम देवळांत जाऊन प्रार्थना केली. तिची कीर्ति यापूर्वींच ऑर्लिन्सला पोंचलेली असल्यामुळें झुंडीच्या झुंडी तिच्या दर्शनाला येऊं लागल्या. त्या सर्वांशीं भलेपणानें बोलून, ऑर्लिन्सच्या सरदाराचा मुख्य खजिनदार होता त्याच्या घरीं जाऊन तिनें मुक्काम केला. हा खजिनदार, त्याची बायको व मुलगी, हीं सर्व

भलीं माणसें होतीं. त्यांना जोन आपल्या घरीं उतरल्यानें फार आनंद झाला.

यानंतर जोननें स्वतः लष्करी सरदार असल्याप्रमाणें या सैन्याचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. ऑर्लिन्सला वेढा घालणारा इंग्रज सरदार बेडफर्डचा ड्यूक, व त्याच्या हाताखालचे अंमलदार, यांना उद्देशून तिनें एक खलिता लिहिला. त्याचें तात्पर्य असें:—

"मी जोन ईश्वराची प्रेषित तुम्हा सर्वांना, व तुमच्या विद्यमानें इंग्लंडच्या राजाला, असा आदेश देतें कीं, तुम्हीं सर्वांनीं येथून निघून जावें. फ्रान्सचा राजपुत्र हाच या देशाचा खरा राजा आहे. आणि त्याला राज्यावर बसविण्याकरितां त्याच्या साहाय्याला ईश्वरानें मला पाठविलें आहे. तुम्ही आजपर्यंत जिंकलेल्या सर्व शहरांच्या वेशींच्या किल्ल्या माझ्या स्वाधीन करा. जी चीजवस्त तुम्हीं लुटून नेली असेल ती परत द्या. असें कराल तर मी तुमच्याशीं तह करीन आणि तुम्हां लढाऊ लोकांना स्वदेशीं परत जाऊं देईन. माझी आज्ञा ऐकतील त्यांच्या केसाला धक्का लागणार नाहीं. पण तसें न करतील त्यांची गांठ मृत्यूशीं घातली जाईल. या फ्रान्सच्या भूमीवर एकहि इंग्रज माणूस यापुढें राहतां कामा नये! तुम्ही म्हणाल, हा हुकूम करणारी मी एक यःकश्चित् स्त्री आहें. पण तसें नव्हे. प्रत्यक्ष ईश्वरानेंच मला पाठविलें आहे."

तिचा हा खलिता दोन शिपाई घेऊन इंग्रज सैन्याच्या अधिपतींकडे गेले. पैकीं एकाला त्यांनीं पत्रदेखत परत पाठवून दिलें. दुसऱ्याला ठेवून घेतलें व म्हणाले, "थांब, गुलामा! हा तुझा खलिता, तूं आणि तुला धाडणारी ती पोरगी या सर्वांनाच जाळून टाकूं म्हणजे झालें."

कर्णोपकर्णीं ही गोष्ट जोनला कळली. तेव्हां ती म्हणाली, "आधीं विजय मिळवीन. आणि मग ईश्वरी इच्छा असेल तर जळूनहि जाईन." आणि दुर्दैवानें स्वतःसंबंधानें उच्चारलेली ही तिची वाणी पुढें खरीच झाली.

असो. ऑर्लिन्सला वेढा घालणाऱ्या इंग्रज सैन्यावर हल्ला करण्यापूर्वीं एक गोष्ट करणें जोनला अवश्य होतें. शहरांत धान्याचा पुरवठा हवा तितका नव्हता. म्हणून तिनें तें बाहेरून आणण्याची तजवीज केली. ऑर्लिन्स शहर लॉयर नदीच्या कांठीं आहे. याच नदीच्या खालच्या प्रवाहावर, सुमारें तीन दिवसांच्या वाटेवर, ब्लॉईस नांवाचें एक गांव आहे. तेथें धान्याची पुरेशी जमवाजमव तिनें केली. आणि मोठमोठ्या नावांतून हें धान्य भरून तेथून नदीच्या मार्गानें त्या ऑर्लिन्सपर्यंत न्याव्या असा तिचा विचार ठरला. ऑर्लिन्सच्या सुमारास पोहोंचल्यावर, वेढ्यांतून चुकून मोकळ्या राहिलेल्या जागा व फटी पाहून, त्यांतून हें धान्य शहरांत पोंचवावयाचें होतें. ही सर्व सिद्धता झाल्यावर या नावा नदीच्या प्रवाहांतन वर निघाल्या. आणि जोन ही घोड्यावर स्वार होऊन त्यांना समांतर अशा जमिनीच्या मार्गानें चालली.

ती सांगे त्याप्रमाणें त्या छोट्या सैन्याचे अधिकारी वागण्याला अजून शिकले नव्हते. त्यांना वाटे, "ही कोण आपणाला हुकूम करणार ! आम्ही वाटेल तसें कूच करूं." हें पाहून जोन त्यांच्यावर रागावे. ती म्हणे, "तुम्हांला यांत काय कळतें ? मला मार्ग दाखविणारा ईश्वर आहे. तो सांगतो त्या वाटेनें मी जातें, तुम्हीहि चला. उगीच घोटाळा माजवूं नका." प्रथम त्यांना हें खरें वाटेना. पण लवकरच त्यांना खूण पटली. नदींतून वरच्या अंगाला पाणी तोंडीत तोंडीत या

नावांना जावें लागे. आणि वाराहि उलटा म्हणजे पूर्व अंगाचा होता. पण जोननें प्रार्थना करितांच पूर्वेचा वारा थांबून पश्चिमेकडून वाहूं लागला! आणि तो इतका जोराचा सुटला कीं, एकेक मोठी नाव लहान दोन दोन नावांना बरोबर घेऊन निघाली. प्रथम वाटेंत चेसी या गांवचा मुक्काम आला. तेव्हां गांवांत जाऊन सैन्यानें तळ दिला, व दोनशें भालेदार शिपायांच्या गराड्यांत एक खाट टाकून जोन ही झोंपी गेली. दुसरे दिवशीं या लोकांसह व नावांसह जोन ऑर्लिन्स शहरच्या पूर्व अंगच्या वेशी-जवळ पोहोंचली. शहरच्या या बाजूस सक्त वेढा नव्हता. ती मोकळी होती. जोन आलेली पाहतांच लोक आनंदानें हातांत दिवट्या घेऊन सैन्याला वाट दाखविण्याकरितां धांवत गेले.

नागरिकांना व त्यांच्याबरोबर शहरचें रक्षण करणाऱ्या सैन्याला मोठा धीर आला. जोनला पाहतांच बाया व मुलें तिच्या घोड्या-भोंवतीं जमलीं. तिचा चेहरा स्पष्ट दिसावा म्हणून त्यांनीं हातांतल्या दिवट्या इतक्या पुढें केल्या कीं, एका दिवटीच्या ज्योतीनें तिच्या निशाणाला झळ लागली. तेव्हां तिनें निशाणाची काठी उलटी करून जमिनीला टेकली. आणि घोडा दोन पावलें चालवून त्याच्या टापेखालीं निशाणाचा तो जळता भाग तिनें विझविला. कांहींना हा अशुभ शकून वाटला. पण तिचें प्रसंगावधान पाहून त्यांची ती भीति जिरून गेली. मग हा सर्व जमाव शहरच्या दुसऱ्या टोंकाला एक प्रार्थनामंदिर होतें तेथें गेला. जोननें रीतसर प्रार्थना केली व बोशर नांवाच्या नागरिकाच्या घरीं तिनें मुक्काम केला. नंतर दोनतीन दिवस तिनें फारशी हालचाल केली नाहीं. कारण धान्यानें भरलेल्या नावांपैकीं कांहीं अजून

यावयाच्या राहिल्या होत्या. त्या आल्याची वर्दी येतांच तिनें नदीपर्यंत जाऊन त्यांचें स्वागत केलें, व सर्व मंडळी परत येऊन झोंपीं गेली.

पण जोनच्या झोपेला विघात झाला. तिला स्वप्न पडून असें दिसलें कीं, शहरच्या तटबंदीवरील फ्रेंच सैन्याची व वेढा घालणाऱ्या इंग्रज सैन्याची मारामारी जुंपली आहे. ती खडबडून जागी झाली. आपल्या बारगिरावर रागावली व म्हणाली, " तूं मला झोंप कशी लागूं दिलीस ? " पण तो बिचारा काय करणार ! जोननें घाईघाईनें अंगावर चिलखत घातलें. मोठमोठ्यानें मोतद्दाराला हांका मारून आपला घोडा आणविला. त्यावर बसून रस्त्यावर आल्यानंतर तिनें आपला भाला उभा करून निशाण फडकाविलें. आणि घोडा चौंफेर काढून ती निघाली. इतक्या जोरानें कीं, घोड्याचे नाल रस्त्याच्या फरशीवर आपटून ठिणग्या उडूं लागल्या. दूर अंतरावर तिच्या हाताखालचा दुय्यम अधिकारी एका बुरुजाजवळ लढत होता. जोन तेथें जाऊन पोहोंचल्यावर फ्रेंच सैन्यानें ती जागा सर केली, व त्या जागच्या इंग्रज सैन्याचा पाडाव होऊन कांहीं लोक मेले व कांहीं हस्तगत झाले.

दुसरे दिवशीं फिरून एकवेळ तिनें इंग्रज अधिकाऱ्याकडे वेढा उठवून जाण्याविषयीं निरोप धाडला. त्याची त्यांनीं टवाळी केली. यानंतर चार दिवसांनीं नदीच्या दक्षिण तीरावर लढाई झाली. पहिल्या चकमकींत फेंच सैन्याला इंग्रज सैन्यानें उधळून लावलें. पण हे पाहतांच जोन स्वतः पुढें झाली. तिनें आपल्या लोकांना हातांत भाले घेण्याचा हुकूम केला. आणि त्यांनीं एकजुटीनें जोरानें हल्ला करतांच पारडें फिरलें. या वेळीं जोन घोड्यावरून उतरून हातांत भला घेऊन लढत होती. या हल्ल्यांत ती इतकी दमून गेली कीं

परत ऑर्लिन्समध्यें गेल्यावर तो दिवस शुक्रवार उपवासाचा असतां तिनें भोजन केलें. शनवार ता. ७ मे रोजीं सकाळीं ती घोड्यावर बसली. अंगांत चिलखत होतेंच. ईश्वरप्रार्थना करून तिनें घोड्याला टांच दिली. जवळ एक धर्माधिकारी होता. त्याला ती म्हणाली, "आजच्या लढाईंत मला छातीवर डाव्या अंगाला जखम होणार आहे. पण मी सुखरूप परत येईन. मजकरितां बुरजाकडे टेहळणी असूं द्या."

रात्रीच्या युद्धानंतर सैन्य मैदानांत झोंपीं गेलें होतें त्याला तिनें उठविलें. सकाळीं उन्हें पडल्यावर तटाला शिड्या लावून, वर चढून, शत्रुसैन्यांतील लोक आंत उड्या टाकूं लागले. पण प्रत्येक हल्ला मारून काढण्यांत आला. या दंगलींत जोनच्या निशाणाचा नेम धरून एका इंग्रज तिरंदाजानें बाण सोडला. तो जोरानें चिलखतांत घुसून जोनच्या छातीला लागला. त्यामुळें घायाळ होऊन ती घोड्याखालीं पडली. जवळच्या लोकांनीं तिला उचलून नेऊन तिच्या जखमेला तेल व मलम लावलें. तरी फिरून संध्याकाळीं ती युद्धाच्या जागीं आली.

पण त्या दिवशीं युद्धाचा निकाल लागला नाहीं. रात्रीं जोननें शेजारच्या मैदानांत जाऊन प्रार्थना केली. मग हाताखालील शिलेदारांना हुकूम करून फिरून लढण्याला सुरुवात केली. ती स्वतः गर्दींत मिसळली होती. सर्व लोक तिच्या निशाणाकडे दृष्टि देऊन लढत होते. आणि या शेवटल्या हल्ल्यांत तिची सरशी झाली. शत्रुसैन्यांतील इंग्रज कांहीं तुडवले गेले. खंदकावरील फळ्यांचा पूल जळूं लागला त्यांत कांहीं होरपळले. कांहीं नदींत पडून बुडून मेले. ऑर्लिन्सचा वेढा उठला. अंगावर जखम घेऊन जोन तशीच पुलावरून पूर्वी सांगितल्याप्रमाणें शहरांत शिरली. शहरांतील सगळ्या देवळां-तल्या घंटा वाजूं लागल्या. त्यांनीं रात्रभर जयघोष चालू ठेवला होता.

येथें हें सांगितलें पाहिजे कीं, जरी लढणाऱ्या फ्रेंच सैन्याचा पुढाकार जोनकडे आला होता, तरी कांहीं मत्सरी सरदारांनीं असा बेत केला होता कीं, तिला वगळून, आपापसांत खलबतें करून, त्यांत ठरेल त्याप्रमाणेंच लढण्याच्या योजना अमलांत आणाव्या. म्हणजे शेवटीं जय मिळेल तो आपणांला, तिला नव्हे. पण जोन केव्हांहि बेसावध नव्हती. तिला मत्सराची बाधा झालेली नव्हती. पण तिचा उत्साही अंतरात्मा तिला गप्प बसूं देत नव्हता. यामुळें तिचा सर्वत्र संचार सुरूच होता. आणि अखेर युद्धाचा निकाल लागला तो तिच्या योजनेप्रमाणेंच लढाई होऊन.

आतां लॉयर नदीच्या दक्षिणेला एकहि इंग्रज उरला नव्हता. इंग्रज सैन्याधिकारी टॉलबट हा मोठा विख्यात धुरंधर वीर खरा. परंतु त्याचेंहि कांहीं चाललें नाहीं. त्यानें आपलें सैन्य हळूहळू परत नेण्याचा मार्ग स्वीकारला. शत्रूनें लढाई करण्याचें निश्चितपणें सोडून दिलें असें पाहून जोननें त्याचा पाठलाग थांबविला. आणि एकीकडे एक स्थंडिलासारखा कट्टा बांधून त्यावर फुलें घालून सर्व सैन्यासह जोननें ईश्वराची प्रार्थना केली. परत फिरणाऱ्या इंग्रज सैन्याला हा शांततामय धार्मिक विधि पाहून अचंबा वाटला. आणि मग सर्वांचीच, म्हणजे मित्राप्रमाणें शत्रूंचीहि, पक्की खात्री झाली कीं, जोनचा देह मनुष्याचा असला तरी ती मूर्तिमंत ईश्वराची आज्ञा असली पाहिजे. आणि त्याबरोबर लोक हेंहि उघड बोलूं लागले कीं, "अशा स्त्रीनें ज्याचा पक्ष उचलला तो राजपुत्र हाच खरा फ्रान्सचा राजा आहे. मग खुद्द स्वतः त्याची दुष्ट आई कांहीं कां म्हणेना ! राजपुत्राचा पक्ष हाच सत्पक्ष आहे म्हणून तो विजयी झाल्याशिवाय राहणार नाहीं."

इंग्रज अधिकारी टालबट व सफक हे आपापलें सैन्य घेऊन एक नदीच्या खालच्या अंगानें व दुसरा नदीच्या वरच्या अंगानें एक-

मेकांपासून दूर गेले. एक महिनाभर त्यांच्यावर फ्रेंच सैन्याचा हल्ला झाला नाहीं. यामुळें ते तसेच ठाणें देऊन बसले. मग फिरून ऑर्लिन्सवर हल्ला करण्याचा त्यांचा विचार होता कीं काय न कळे! पण त्यांचा बेत कांहींहि असला तरी तो साधला नाहीं हें खरें. पहिले आनंदोत्सव झाल्यावर जोन ता. १३ मे रोजीं ऑर्लिन्सहून निघून तुवर या गांवीं आली. राजा व दरबारी लोक यांचा मुक्काम येथें पडला होता. जोनच्या मनांत, ताबडतोब घाई करून, राजपुत्राला ऱ्हीम्सला नेऊन त्याला राज्याभिषेक करून टाकावा असें होतें. परंतु दरबारी लोकांचें मत वेगळें पडलें. ते म्हणाले कीं, इंग्रज सैन्य अजून लॉयर नदीच्या आसपास घुटमळत आहे म्हणून तें पुरतें पार घालवून दिल्याशिवाय राज्यारोहणाचा विधि करूं नये.

आणि ही गोष्ट खरी कीं, इंग्रज सेनापति आपल्याला कुमक मिळण्याची वाट पाहत होता, व ती मिळाली म्हणजे परत ऑर्लिन्सवर हल्ला करावा असाच त्याचा विचार होता. पण इकडे जोननेंहि ही गोष्ट ओळखून आपलें सैन्य वाढविण्यास सुरुवात केली. लवकरच त्याची संख्या आठ हजारांवर गेली. त्यांतले सुमारें १२०० लोक वरच्या प्रतीचे असून त्यांची भरती मुख्यतः ऑर्लिन्स शहरांतूनच झाली होती. इंग्रज लष्करी अंमलदार सफक हा जार्गो या ठाण्यावर आवळून बसला होता. आणि टॉलबट हा मूंग या ठिकाणीं छावणी देऊन होता. यांच्यावर चालून जाण्यापूर्वी डयूक ऑफ बरगंडी या मातब्बर फ्रेंच सरदाराची मदत मिळविण्याची खटपट करण्याचा प्रयत्न दरबारी लोकांनीं करून पाहिला. परंतु त्यानें मदत तर दिली नाहींच, पण या गडबडींत आपला हात साधतो का याचाच तो विचार करूं लागला. त्याला अशी बुद्धि सुचली कीं, हा इंग्लंडचा

राजा व हा फ्रान्सचा राजा या दोघांनाहि बाजूला सारून आपणच गादी बळकवावी. आणि 'आपण राजघराण्यांतील आहों' एवढा हक्क त्याला या कामीं पुरेसा वाटला. दरबारी लोकांत आपापसांतील वैरें होतीं तीं उगवून घेण्यांत याच वेळीं कांहींचें मन गुंतलें होतें. यामुळें त्यांचाहि पाय एकजुटीनें पुढें पडेना.

या सर्व गोष्टींना जोन अगदीं कंटाळून गेली. राजपुत्राला समक्ष भेटून आग्रह करावा तर त्याची निवांतपणें गांठ पडण्यालाहि अडथळे येऊं लागले. शेवटीं एक दिवस आपला एक सहकारी घेऊन ती थेट राजपुत्राच्या खोलीशीं गेली. आणि तिनें जोरानें दार ठोठावलें. तेव्हां राजपुत्र दार उघडून पुढें आला. त्याचे पाय धरून जोन म्हणाली, " महाराज, आतां विलंब किती करणार? माझी सगळी सिद्धता आहे. उगीच रेंगाळत राहण्यानें मुख्य कार्याची हानि मात्र होईल." तेव्हां राजपुत्राला तें पटून त्यानें आपला मुक्काम हलवून कूच करण्याची आज्ञा दिली. ऑर्लिन्स शहर हस्तगत झाल्यापासून एक महिन्यानंतर ही गोष्ट घडली. यावरून जोननें चालविलेला तगादा किती रास्त होता हें दिसून येईल. इंग्रज सैन्याच्या हातीं असलेलीं ठाणींहि जातां जातां घ्यावीं हा विचार तिला अगदींच नापसंत नव्हता. पण ती इतकेंच म्हणे कीं, "तेंहि वाटल्यास करा, पण कोणीकडून तरी पाय हलूं द्या."

प्रथम जार्गो हें ठाणें घ्यावें असें ठरलें. दोन दिवसांची मजल नदीच्या कडेकडेनें मारल्यावर ता. ११ जून रोजीं जोननें " ठाणें स्वाधीन करा " असा निरोप सफकला पाठविला. तिच्या तोफखानेवाल्यानें तटावर तोफ डागली. तिच्या गोळ्यानें एक बुरुज पडून जवळचा तट कोसळून त्यांत खिंड पडली. तिचा मदतनीस तिला म्हणूं लागला, " छे! अजून हल्ला करण्याची वेळ नाहीं.

कारण तटांत खिंडार पडलें तें लहानसेंच आहे." पण जोननें त्याला बाजूला सारलें व ती स्वतःच धांवून त्या खिंडाराकडे गेली. तटाला शिडी लावून ती वर चढूं लागली. तोंच तिच्या डोक्यावरील चिलखतावर एक दगड कोसळला व ती खालीं पडली. पण लगेच ती उठून उभी राहिली आणि तिनें हल्ला चढविण्याचा हुकूम केला. ठाण्यांतील इंग्रजांचा मोड होऊन ते दुसऱ्या बाजूनें खंदकावरील पुलावरून पळून गेले. पण त्यांतले बरेच मारले गेले. स्वतः सफक हा पकडला गेला.

मग जोन आपलें सैन्य घेऊन ऑर्लिन्सला कांहीं वेळ परत आली. यानंतर बोजेन्सी या नांवाचें आणखी एक ठाणें घेतल्यावर मूंगच्या ठाण्यावर तिनें हल्ला केला. या ठिकाणीं इंग्रज सेनापति टॉलबट झाडीच्या आश्रयानें राहिला होता. हें इंग्रज सैन्य जोनच्या लोकांना प्रथम कोठें दिसेचना! इतकें तें झाडींत लोपून गेलें होतें. पण अशी एक मौज झाली कीं, जोनच्या सैन्याच्या चाहुलीनें एक काळवीट उधळून निघाला तो थेट इंग्रज सैन्यांत शिरला. ही शिकार पाहतांच इंग्रज सैन्यांतील कांहीं लोकांनीं त्या काळवीटावर तीर रोखून पाठलाग करतांना आरोळ्या दिल्या. त्यामुळें ते आयतेच उघडकीस आले! अर्थात् जोनच्या सैन्यानें शत्रुसैन्यावर हल्ला केला. सेनापति टॉलबट तितकासा सावध नव्हता. छावणीच्या संरक्षणाची त्याची नेहमींची तजवीज अमलांत नव्हती. तथापि तो मोठ्या शौर्यानें लढला. कारण ऑर्लिन्स येथें पराभूत झाल्याचा अपमान आधींच त्याच्या वर्मी लागला होता. पण अखेर कांहीं न चालून तो पाडाव झाला.

अशा रीतीनें ता. १८ जून रोजीं या मोठ्या इंग्रज सैन्याचा पराभव मैदानांत उघड सामना देऊन जोनच्या सैन्यानें केला. इंग्रजांकडील तोफा आणि लष्करी सरंजाम, धान्याचे गाडे, सर्वच्या सर्व हस्तगत

झाले! तथापि जोननें टॉलबटला कसलीहि खंडणी न मागतां आदर-बुद्धीनें सोडून दिलें. आणि एवढें मोठें यश मिळवून जोन ऑर्लिन्सला परत आली. तरी अजून राजपुत्र रेंगाळतच होता. राजपुत्रानें तिला शाबासकी देऊन आभार मानले आणि "मुली, तूं फार दमली आहेस. चारदोन दिवस विश्रान्ति घे" असेंहि तो म्हणाला. पण ही सूचना अमान्य करून उलट तिने त्यालाच मुक्काम हलविण्याची घाई केली.

मग एकदाची दरबारी मंडळी हलून निश्चयानें वाट चालूं लागली. नुकत्याच झालेल्या लढाईत इंग्रज सैन्याचा संहार झाल्यामुळें जोनच्या मार्गांत पुढें कांहीं विघ्न नव्हतें. वाटचालीला अडथळा होई तो फक्त सत्काराचा! राजपुत्राला व जोनला पाहण्याकरितां व पाहुणचार करण्याकरितां लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत त्याचाच काय तो अडथळा. वाटेवर गांवोगांव सत्कारसमारंभ तर झालेच. पण जणूं काय र्‍हीम्सची ही एक नवीन यात्राच निघाल्याप्रमाणें, अनेक प्रकारचे लोक राज-पुत्राच्या लष्करांत मिसळून र्‍हीम्सकडे जाऊं लागले. त्यांत कांहीं राजनिष्ठेनें भारावलेले, कांहीं जोनच्या स्फूर्तीनें सतेज झालेले होते. पण कांहीं भट-भिक्षुक भणंगभिकारी हेहि या यात्रेंत मिसळले होते. ज्यांना शिपाइगिरीची हौस होती त्यांनी हातीं लागलें तें म्हणजे धनुष्य-बाण, तिरकमठे, तरवारी, इत्यादि लढाईचीं हत्यारें आपल्या बरोबर घेतलीं.

अशा रीतीनें गांवामागें गांव घेत, म्हणजे सत्कार घेत, किंवा खंडणी-नजराणा घेत, किंवा धान्य-सामग्री घेत, राजपुत्राच्या सैन्यानें शंभर मैलांची मजल मारली. वाटेंत त्यांनीं कांहीं ठाणीं सर केलीं. पण त्या-करितां फारसें लढावें लागलें नाहीं. नाहीं म्हणायला ट्रॉइस या गांवीं थोडी भानगड झाली. तेथेंहि जोनलाच पुढें व्हावें लागलें. ती आपल्या हातांत निशाणाचा भाला घेऊन खंदकापर्यंत गेली. मग लोकांनीं हाताला

मिळेल तें खंदकांत फेंकून देऊन तो जवळजवळ भरूनच काढला. हें पाहून गांवांतील लोक भिऊन गेले. आणि तें शहर हस्तगत झालें.

अखेर ता. १३ जुलै रोजीं ह्या सैन्याला ऱ्हीम्स हें गांव दिसूं लागलें. शहरचे दोन प्रमुख नागरिक प्रतिपक्षाचे अनुयायी होते त्यांनीं गांवच्या लोकांना जमवून जोनला विरोध करण्याचा प्रयत्न केला. पण उलट लोकांनीं त्यांचें म्हणणें अमान्य करून "तुम्ही चालते व्हा. आम्ही आपलें काय तें पाहून घेतां" असें सांगितलें. ता. १७ जुलै रोजीं रविवारीं (सन १४२९) फ्रेंच राजपुत्राचा प्रवेश ऱ्हीम्स शहरांत झाला. गांवांतील प्रार्थनामंदिराकडे त्याची मिरवणूक मोठ्या थाटानें काढण्यांत आली. लहानथोर धर्माधिकारी एकत्र झाले. त्यांनीं पवित्र अभ्यंगस्नान घालून राजपुत्राला हातीं धरून सिंहासनावर बसविलें. अशा रीतीनें आपली प्रतिज्ञा सफल झालेली पाहून जोनला काय वाटलें असेल याची कल्पना करावी! बाहेर लोक जयघोष करीत होते. शिंगें, कर्णे वाजत होते. अशा वेळीं जोन सिंहासनाजवळ जाऊन गुडघे टेकून उभी राहिली. आणि डोळ्यांत अश्रु आणून म्हणाली, "महाराज, आतां मात्र तुम्ही राज्याचे खरे धनी झालां. सर्व अपवाद लयाला गेले. फ्रान्स देशाचे जे कांहीं परगणे शत्रूच्या हातीं आहेत ते आपल्या हातीं येण्याचें हें प्रस्थानच आतां ठेवलें असें समजा."

अजून पॅरिस ही राजधानी शत्रूच्याच हातीं होती. तेव्हां जोननें तिकडे मोर्चा फिरवावा हें स्वाभाविक होतें. पण फिरून दरबारी लोकांची भीति व फाजील सावधपणा तिच्या आड थोडासा आलाच. फिरून बरगंडीच्या ड्यूकला आपल्या बाजूला आणून शांततेचा विजय मिळविण्याचें कारस्थान सुरू झालें. जोनला वगळून दरबारी लोक आपापसांत पुढील बेत करूं लागले. बरगंडी हाहि त्यांना मुद्दाम

खुलवीत घोळवीत होता. "तुमचें आमचें मत एक झाल्यावर पॅरिस हस्तगत करण्याला मुळींच लढावें लागणार नाहीं" असें भासवून त्यानें साखर पेरली. इकडे ता.२५ जुलै रोजीं पॅरिसमध्यें असें उलटें कारस्थान सुरू झालें कीं, इंग्लंडचा राजा ६ वा हेन्री याला पॅरिसमध्यें आणून त्यालाहि राज्याभिषेक करवावा. यामुळें जोनला आपला बेत किंचित् बदलावा लागला. म्हणून वाटेवरचीं दहा-पांच ठाणीं तिच्या सैन्यानें घेतलीं.

ऑगस्टमध्यें पॅरिसवर चढाई करण्याची वेळ आली. परन्तु या सुमारास दैवी चक्रें जणूं कांहीं उलटीं फिरूं लागलीं. कारण असें सांगतात कीं, येथून पुढें जोनला दैवी संदेश मिळेनासे झाले. तिला देवदूत दिसत. त्यांच्याशीं संभाषण झाल्याचा भास तिला होई. काय कारण झालें कोणाला ठाऊक, पण तिचा सहकारी काउंट डुनॉय याला जोनला सहज विचारावेंसें वाटलें. तो म्हणाला, "जोन, तूं आजवर इतकीं भविष्यें केलींस. पण तुझा मृत्यु कोठें व कधीं आहे याचें भविष्य तूं केलें आहेस काय ?" तेव्हां ती म्हणाली, "त्याविषयींहि देवानें मला ज्ञान दिलें असेल. पण त्याविषयीं मी कशाला विचार करूं ! त्याची आज्ञा प्रत्यक्ष झाली तेवढें कार्य माझ्या हातून तडीला गेलें. आतां खरें म्हटलें तर माझी इच्छा अशी कीं, त्यानें मला परत घरीं जाण्याचा आदेश द्यावा. म्हणजे मी आईबापांकडे जाईन. आणि पूर्वींसारखी घरचीं गुरेंढोरें शेळ्यामेंढ्या राखून त्यांच्या कामाला थोडा हातभार लावीन. पण माझी तशी इच्छा असून तरी उपयोग काय ! अखेर ईश्वराची इच्छा असेल तसेंच होईल."

कसेंहि असो, तिनें आपलें हत्यार अजून खालीं ठेवलें नव्हतें. मात्र पॅरिसवर हल्ला करणें ही गोष्ट कांहीं सोपी नव्हती. शहराचा परीघ

एवढा मोठा होता कीं, जोनच्या सैन्याला केव्हांहि पुरा वेढा घालतां आला नसता. तिच्याजवळ तोफा होत्या त्याहि लहान. तटावर हल्ला करून ते ढासळण्यासारखीं उल्हाट यंत्रें नव्हतीं. शहरांतील लोकहि बरेचसे इंग्रजांचे ऋणानुबंधी झाले होते. आणि जोनच्या सैन्यांतील लोक म्हणजे लुटारू पेंढारी अशी त्यांची कीर्ति असल्यामुळें ते यांचा द्वेष करीत. जोनची इतरत्र सरशी होऊ लागल्यानें इंग्रजांनीं ताब्यांत ठेवलेला मुलूख बेडफर्डच्या हातून हळूहळू जाऊं लागला होता. शेवटीं पॅरिसवर हल्ला करण्याचें ठरून राजा चार्लस याची छावणी कॉंपेनीच्या रानांत ठेवण्यांत आली. आणि जोन स्वतः पॅरिसकडे निघाली.

पहिल्या हल्ल्यांत तिच्या सैन्यानें एक तट पाडला. तेव्हां जोन पहिला खंदक ओलांडून पलीकडे गेली. आणि दुसऱ्या खंदकापाशीं गेली तों तेथें खंदकांत बरेंच पाणी साठलें आहे असें तिला आढळलें. पलीकडून तीरांचा भडिमार तिजवर होत होता. ती एकटी ठळक दिसत होती यामुळें बाणाचा रोख तिजवरच धरला जाई. खंदकांतील पाणी किती आहे हें अजमावण्याकरितां तिनें आपला भाला घालून पाहिलें. इतक्यांत तिच्या मांडींत एक तीर घुसून ती जखमी झाली. तथापि तशीच धीरानें उभी राहून, तटावर चढून, पलीकडे उड्या टाकून हल्ला करण्याला आपल्या सैन्याला ती हुकूम करीत होती. तिच्या जखमेंतून सारखें रक्त वाहत होतें. तथापि रात्र पडेपर्यंत तिनें विश्रांतीसाठीं परत छावणींत जाण्याकरितां पाय उचलला नाहीं.

राजाचे दरबारी लोक पॅरिसवर निकरानें हल्ला करण्याला मनांतून तयार नव्हते. पॅरिस आपल्या हातीं नसेल तरी चालेल, पण बरगंडीचा ड्यूक हा आपल्या पक्षाला राहिला म्हणजे त्यांतच हवें तें मुख्य साहाय्य झालें असें त्यांना वाटे. याबाबत त्यांनीं ड्यूकशीं एक नवा

तहच केला. आणि पॅरिसच्या नाक्यावर असलेलें कॉम्पेनी हें गांव तटबंदी करून आपल्या हातीं ठेवण्याला बरगंडीला त्यांनीं संमति दिली. पण कॉम्पेनी येथील लोक या गोष्टीला कबूल नव्हते. बरगंडीच्या सैन्याला आपल्या गांवच्या वेशीच्या आंत घेण्याला ते तयार नव्हते. याचा अर्थ फ्रेंच राजापेक्षांहि या राजनिष्ठ प्रजाजनांना राजाचें खरें हित अधिक कळत होतें ! ड्यूक परिसमध्यें एकटा नसून त्याच्याबरोबर कांहीं इंग्रजहि होते. जोनची इच्छा पॅरिसवर हल्ला करण्याची अति प्रबळ आहे असें पाहून दरबारी लोक वरपांगीं तिला विरोध करीत नसत. तिला आणि तिचा साहाय्यक ॲलेंकॉन यांना त्यांच्या इच्छे-प्रमाणें पॅरिसच्या आसपास क्षुल्लक हल्ले करण्याला उत्तेजन देत. पण, वर सांगितल्याप्रमाणें, आंतून त्यांचे बेत वेगळे चालू होते.

या सुमारास लोकांत अशी एक भुमका दाट पसरली होती कीं, ‘जोनची सगळी सद्दी आतां संपली. तिचे साहाय्यकारी देव वा देवदूत तिला अलीकडे कांहीं संदेश देत नाहींत. ती जें काय करते तें आपल्याच मानवी इच्छेनें.’ कर्मधर्मसंयोगानें याच वेळीं जोनची तरवार मोडली ! लोकांना वाटलें, ‘आपण म्हणतों त्याचा प्रत्ययच आला.’ जोन व ॲलेंकॉन यांना स्वस्थ बसवेना. पण तिच्याबरोबर हल्ला करण्याला उठणारे लोक थोडे असत. तिच्याजवळ तोफा होत्या त्याहि लहान तोंडाच्या. त्यांतील गोळ्यांनीं तटावर फारसा परिणाम होईना. आणि अंगावर जखम झाल्यानें तिच्या मनाप्रमाणें तिला हालचाल करतां येईना.

दरबारी लोकांनीं राजाला सल्ला देऊन त्याजकडून एक जाहीरनामा काढविला. त्यांत असें लिहिलें होतें : “ माझे प्रजाजन हो, बरगंडीचे ड्यूक म्हणजे माझे मातबर सरदार व आप्त यांची व माझी आतां

पुरी दोस्ती झाली आहे. आमच्या हातून इंग्रजांच्या हातीं पूर्वी गेलेला जो मुलूख अजून तसाच आहे, तो आतां आम्हीं लवकरच जिंकून परत घेऊं, असा आम्हांला विश्वास वाटतो." याचा अर्थ चढाईची लढाई अशी संपली. दमानें सगळ्या गोष्टी होणार. मग लोकांचें तरी काय अडलें? त्यांना तरी आपलीं घरेंदारें सोडून लढाईवर जाण्याची हौस कां वाटावी? राजानेंहि पॅरिसजवळून आपला मुक्काम हलविला व तो लॉयर नदीच्या अंगानें दक्षिणेकडे हळूहळू परत फिरला. जोनलाहि त्याच्याबरोबर परत निघावें लागलें. पॅरिसच्या वेशीपर्यंत आणलेलें युद्ध तसेंच पुढें चाललें असतें तर त्यांतून पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी निघण्यासारख्या होत्या. पण खुद्द राजानेंच पाऊल मागें घेतलें मग इतर काय करणार!

जोन मनांतून अत्यंत निराश झाली. तिनें आपल्या अंगावरील पांढरें चिलखत उतरलें. सेंट डेव्हिसच्या प्रार्थनामंदिरांत जाऊन तेथील प्रार्थनापीठावर तिनें तें समर्पण केलें. आणि दुःखी अन्तःकरणानें ती राजाबरोबर लॉयर नदीकडे परत निघाली. मात्र तिची जखम आतां पुरी भरून निघाली होती. रिकाम्या वेळीं कांहीं दरबारी लोकांनीं तिची करमणूक व खुशामत करण्याकरितां आसपासचे किल्ले व गढ्या पाहवीत हिंडावें. सशस्त्र असल्याचा देखावाहि ठेवावा. पण प्रत्यक्ष लढाऊ असा कांहीं कार्यक्रम किंवा योजनाहि ते तिला करूं देत ना. त्यांनीं तिला उंचीं वस्त्रें अंगावर घालण्याला द्यावीं. पण ती त्यांचा कंटाळा करी. ते तिला चांगले घोडे बसावयाला देत. त्यांवर बसणें तिला आवडेहि. पण लढाईचें पुढचें पाऊल नाहीं तर हीं घोडीं घेऊन मला काय करायचें असें वाटून ती मनांत खट्टू होई. एखादी गढी किंवा किल्ला सर करावा असें तिनें सुचविलें तर तिच्या मनाखातर

दरबारी लोक कबूल करीत. एखादी गढी सरहि करण्यांत येई. पण एखादे ठिकाणीं हल्ला फुकट जाई. सर केलेल्या गढीचा राजाच्या कार्याला फारसा उपयोग नसे. मात्र एखाद्या हल्ल्यांत पराभव झाला म्हणजे तितकेंच तिच्या पराक्रमाविषयीं लोकांचें मत प्रतिकूल होई. तात्पर्य, एकंदरींत जोनचें पारडें हळूहळू हलकें होऊं लागलें होतें.

तिला खूप ठेवण्याचे प्रयत्न इतर रीतीनेंहि कांहीं झाले. कारण आतांपर्यंत जें घडलें तें सर्व जोनच्याच स्फूर्तीनें व पुढाकारानें घडलें, ही गोष्ट तो बुद्धिमंद राजा तरी कशी विसरूं शकता! या दृष्टीनें तिचें महत्त्व अजून उरलें होतेंच. म्हणून तिच्यावर कांहीं उलट उपकार करून आपली कृतज्ञताबुद्धि दाखविली, म्हणजे आपल्या मनावरचे तिचे पाश शिथिल होतील. म्हणून तसें करावें असें राजाला वाटे व त्याला सल्लाहि तसाच मिळे. त्याप्रमाणें त्यांनीं एक गोष्ट केली. ती अशी कीं, तिच्या बापाला सरदारकी बक्षीस दिली. त्याला उमराव बनविलें. आणि सरदारीची खूण म्हणून, त्या काळच्या रीतीप्रमाणें, त्याला एक शोभिवंत ढाल बक्षीस दिली. अशाकरितां कीं, तिजवर त्याला आपल्याला मनपसंत असें एखादें सरदारकीचें चिन्ह लावून रंगवून मिरवितां यावें. ऑर्लिन्सचा वेढा उठल्यावर जोनचा बाप आपल्या गांवाहून मुलीला भेटावयाला आला होता व आतां तो आणि त्याचे दोघे मुलगे जोनबरोबर तिच्या परिवारांतच राहत होते. जोनच्या कर्तृत्वानें आपल्या घराण्याला सरदारकी मिळालेली पाहून त्यांना किती आनंद झाला असेल!

पुढें राजानें एक दिवस मोठ्या आर्जवानें जोनला विचारिलें कीं, "हें सर्व वैभव तुला मनापासून आवडत नाहीं, तर मग तुला आवडेल अशी एखादी गोष्ट मी काय करूं ती तरी सांग." तेव्हां ती म्हणाली,

" माझा गांव डूमरेमी व त्याच्या शेजारची एक वाडी यांच्यावर सरकार चालीप्रमाणें गावगन्ना बसतात तसे कर बसलेले आहेत ते त्यांना माफ व्हावे ! " किती उदार हें जोनचें मन आणि किती निःस्वार्थी ! या तिच्या गुणांनीं तिच्या तेजस्वितेला व राजभक्तीला अधिकच शोभा आली. ही करमाफीची बाब लहानशीच होती, व राजानें ती ताबडतोब दिली. मात्र त्या गोष्टीचा लौकिक मोठा झाला.

कारण अशी कराची माफी मिळणें हा अगदीं लोकोत्तर असा सन्मान व हक्क मानला जात असे. यासंबंधीं पुढचीहि एक गोष्ट येथेंच सांगितलेली बरी. ती अशी कीं, जोनच्या जन्मभूमीची ही करमाफी पुढें ४०० वर्षें चालू होती. पण त्यानंतर एका राजाच्या कारकीर्दींत एका फडणविसाला वाटलें कीं, हा जुना हक्क यापुढें चालविण्यांत अर्थ नाहीं. ४०० वर्षें माफी भोगली, पुरे झाली ! म्हणून त्यानें ती बंद करून त्या गांवचा कर फिरून वसूल करण्याचा नवा हुकूम दिला. पण दैवयोग असा कीं, त्याच राजाच्या कारकीर्दींत राज्य-क्रान्ति झाली ! लोकसत्ता प्रस्थापित होऊन राजवंश व राजाची गादी दोनहि बुडालीं. तेव्हां कांहीं धर्मात्मे मनांत म्हणूं लागले कीं, " पहा ! फ्रान्सच्या या वीरकन्येवर खरीच ईश्वराची कृपा असली पाहिजे. कारण तिच्या मरणानंतर ४०० वर्षांनीं, अधिकाऱ्यांनीं तिचा अपमान केला त्याबद्दल देवानें अशी जबर शिक्षा केली ! "

अशा रीतीनें, म्हणजे निष्क्रिय स्थितींत, पुढील हिंवाळा व वसंत ऋतु मिळून सहा महिने जोननें कसे तरी काढले. पण यापुढें तिला गप्प बसवेना. ती राजाची छावणी सोडून निघाली. " मी जातें " असेंहि तिनें राजाला सांगितलें नाहीं किंवा त्याचा रीतसर निरोप घेतला नाहीं. ईस्टरच्या सणांत ती बरोबर अवघे १०-२० लोक घेऊन पॅरिसकडे

निघाली. पॅरिसच्या लगत कॉंपीनी नांवाचें एक ठिकाण होतें. तेथील लोक बरगंडीला न जुमानतां इंग्रज लोकांविरुद्ध लढत होते. त्यांना जाऊन ती मिळाली. नजीकच्या मेलूनच्या गढीवर हल्ला झाला त्यांत तिनें पुढारिपण घेतलें व तटावर चढून जाऊन ती उभी राहिली. येथें तिला फिरून एका दिव्य संदेशाचा भास झाला. त्याचा आशय असा कीं, "तुझ्या कपाळीं यापुढें पराभव, पाडाव व तुरुंगवास देवानें लिहिलेला आहे." ती म्हणे, "मला मरण असो. तें यायचें तेव्हां येवो. पण मला तुरुंगवास न घडावा अशी कांहीं रदबदली मजकरितां देवाजवळ होणार नाहीं काय?" पण या प्रश्नाला अनुकूल उत्तर मिळत नसे.

या सुमारास बरगंडीच्या ड्यूकशीं फ्रेंच राजाचा झालेला तह संपला. पॅरिसच्या नाक्यावरील कॉम्पीनी हें गांव बरगंडीविरुद्ध लोक लढवीत होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तेव्हां प्रथम हेंच ठिकाण सर करावें असें त्यानें ठरविलें. या ठिकाणाचें त्याला फार महत्त्व होतें. कारण त्याच्या परगण्यांतून पॅरिसला जाणारे जलमार्ग व स्थलमार्ग यांचें केंद्र बनून, कॉम्पीनीचें ठाणें त्यांना अडवीत असे. दाणागोटा युद्ध-सामग्री कांहींहि इकडून तिकडे जावयाचें तर एखाद्या जकातीच्या नाक्यासारखें कॉम्पीनीचें ठाणें आड येई. सन १४३० च्या एप्रिलच्या सोळाव्या तारखेस बरगंडीनें कॉम्पीनीवर हल्ला करण्याची तयारी केली. हें पाहून जोन त्या गांवच्या लोकांच्या मदतीला धांवून गेली. तिनें या ठाण्याच्या आसपास चौफेर हिंडून, नद्या ओढे नाले यांच्यावरील अनेक पूल सांभाळून आपल्या हातीं ठेवण्याचें काम पत्करलें होतें. आणि पूर्वीं ऑर्लिन्सला वेढा पडला तसा या ठाण्याला पडूं देऊं

नये अशी तिची खटपट होती. पण बरगंडीचा जोर विशेष झाला. यामुळें त्याच्या सैन्यानें आसपासचा मुलुख उद्ध्वस्त केला.

जोनच्या सैन्याला दाणापाणी मिळण्याची फार पंचाईत पडूं लागली तेव्हां तिनें बऱ्याचशा सैनिकांना रजा दिली. आणि ता. २३ मे रोजीं फक्त एक लहानशी टोळी घेऊन ती परत कॉम्पीनी गांवांत आली. या गांवची रचना ऑर्लिन्ससारखीच होती. गांव नदीकांठाला वसलेला असून नदीकडे तटबंदी होती. त्याच्या मुख्य वेशींतून नदीकडील वाट निघे. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें वेशीबाहेर तटाला लागून खंदक व त्यावर घालता-काढता असा लांकडी पूल होता. वेशीचा सांभाळ करण्याकरितां अणकुचीदार लोखंडी गजाचीं दारें होतीं. बरगंडीचा तळ दूर गांवापलीकडे पडलेला होता. पण ती उंचवट्याची जागा असल्यामुळें तेथून कॉम्पीनीच्या ठाण्यावर व गांवावर मारा करणें सोपें होतें.

त्या दिवशीं संध्याकाळीं, अजून सूर्य-प्रकाश होता अशा वेळीं, जोन आपलें सैन्य घेऊन या नदी-वेशींतून बाहेर पडली. तिनें पूल ओलांडला व त्यापलीकडील गवती रानांतून लहानशी मुरमाड पाय-वाट होती तिजवरुन बरगंडीच्या एका तुकडीवर हल्ला करण्याला ती निघाली. हेतु हा कीं, या सोयीच्या जागीं बरगंडीचे लोक मोर्चे बांधीत होते ते मोडून उधळून लावावे. पण दुर्दैवानें याच वेळीं इंग्रज सैन्याची एक तुकडी बरगंडीच्या मदतीला याच जागीं येऊन पोहोंचली. आणि या जोड सैन्याविरुद्ध आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून जोननें आपल्या सैन्याला तोंड फिरवून परत निघण्याला आज्ञा केली. सैन्याला परत पुढें घालवून त्याची पिछाडी सांभाळीत ती येत होती, व मधून मधून तोंड फिरवून शत्रूचे लोक येत त्यांना पिटाळून

परत घालवीत होती. पण शत्रुसैन्यानें मोठ्या प्रयत्नानें जमावानिशीं धांवत येऊन, जोनचें सैन्य नदीपार होत आहे या सुमारास मोठी गर्दी व दंगल केली.

वेशीशीं इतकी सरमिसळ गर्दी झाली कीं, कोणालाहि शत्रु-मित्र ओळखेना. वेशींतून आंत येऊन कोण निभावला, कोण बाहेर राहिला, हें कळेना. आणि आतां शत्रुसैन्य वेशीचा कबजा घेऊन आंत घुसणार असें पाहून वेशीच्या रखवालदारानें लांकडी पूल साखळदंडानें वर ओढून घेतला आणि लोखंडी गजांचीं दारें लावून घेतलीं. पण या गर्दींत जोन, तिची खास तुकडी, तिचे एकदोन मदतनीस, तिचा भाऊ पीटर हे अद्याप नदीपलीकडेच राहिले होते त्यांना शत्रुसैन्यानें घेरलें. मोठी गर्दी मारामारी झाली. तींत बरगंडीच्या एका तिरंदाजी शिलेदारानें जोनला ओळखलें. कारण तिनें आपल्या चिलखतावर घातलेला झगा उलट्या उन्हांत चांगला दिसून पडत होता. त्यानें जलदी करून त्या झग्याला हात घालून जोनला घोड्यावरून ओढून खालीं पाडलें आणि कैद केलें. इतक्यांत अस्तमान झाला व लढाई थांबली. पण त्या बरोबरच जोनची पराक्रमी कारकीर्दहि संपली !

असली बातमी पसरण्याला वेळ कितीसा लागणार ? चार्लस राजाला ही बातमी कळतांच दुःखानें रडूं आलें. त्याला रागहि आला. आणि पूर्वीं कधीं नव्हे अशा वीरश्रीनें त्याच्या तोंडून प्रतिज्ञा निघाली कीं, "मी याचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं !" पण जोनच्या वाईटावर टपलेले दरबारी जवळच होते. त्यांनीं राजाला धीर व उत्तेजन देण्याऐवजीं त्याचा राग शांत केला. बरगंडी सरदाराचा जय झाला. ड्यूक बेडफर्ड, इंग्रज सेनापति, याला वाटलें कीं, आतां युद्ध संपलें. पॅरिसच्या विद्यापीठाला आनंद झाला. कारण तें विद्यापीठ

चार्ल्स राजाचें शत्रुत्व करी. या पीठांतील एक प्रमुख मठवासी पीटर नांवाचा होता. त्यानें दौरे सुरू केले. आणि अशी मागणीची झोड उठविली कीं, जोनला कैदेंत ठेवून, पुढें तिची चौकशी करून, शिक्षा देण्याचा अधिकार पॅरिसच्या विद्यापीठाचाच आहे. कारण जोन ही सद्धर्मविरोधी, मूर्तिपूजक, आणि चेटकिणीचा धंदा करणारी आहे. म्हणून तिचा न्याय करावयाचा तो या प्रतिष्ठित विद्यापीठांतील धर्माधिकारी पंडितांनींच केला पाहिजे !

पण जोनचा ताबा, इंग्रज पक्षपाती अशा एका म्हणजे लक्सेम्बर्गच्या सरदाराच्या हातीं होता. कारण त्याच्याच एका शिलेदारानें तिला कैद केलें होतें. त्यानें तिला दोन-तीन आठवडे ठिकठिकाणीं हिंडवून शेवटीं आपल्या अमलांतील बोरेहू नांवाच्या किल्ल्यांत आणून ठेवलें. तिच्यावर चौकीपहारा फार कडक होता. पण सुदैवानें या सरदाराची एक आत व बायको यांना जोनची दया येऊन त्यांनीं तिचे फारसे हाल होऊं दिले नाहींत. मग मठवासी पीटर यानें असा पुकारा केला कीं, पॅरिस विद्यापीठाच्या हातीं जोनला न दिली तर निदान तिला इंग्रजांच्या स्वाधीन करण्यांत यावी. कारण इंग्रज सैन्यानें जरी तिला पकडलें नसलें तरी तिचें सगळें चेटुक इंग्रजांचें शत्रुत्व करण्याकडे खर्च होत होतें. बेडफर्डचा ड्यूक, म्हणजे इंग्रज राजाचा वडील आप्त, यानें जोनला सोडवून आपल्या हातीं घेण्याकरितां वीस हजार पौंड देऊं केले. त्याप्रमाणें शेवटीं लक्सेम्बर्ग यानें जोनला इंग्रजांच्या स्वाधीन करण्याचें कबूल केलें.

हें ऐकून जोन मनांतून फारच दुःखी झाली. 'इंग्रजांच्या हातीं आपण पडणार' याचें तर तिला वाईट वाटलेंच, पण आपण शत्रूच्या हातीं पडण्यापूर्वी प्रतिज्ञेप्रमाणें कॉम्पीनीचें ठाणें आपल्याकडून सोडविलें

गेलें नाहीं याचें तिला अधिक दुःख झालें. शेवटीं इंग्रज शिपायांच्या एका तुकडीनें येऊन जोनला स्वाधीन करून घेतलें हें पाहून लक्से-म्बर्गच्या आतेला व बायकोला फार वाईट वाटलें.

इंग्रज अधिकाऱ्यांनीं तिला गांवोगांव हिंडविलें, व शेवटीं रूवॉन या लष्करी ठाण्यावर कडक पाहऱ्यांत बंदिवान करून ठेवलें. कारण या गांवीं तिची चौकशी व्हावी असें ठरलें होतें. येथील तुरुंगांत असतां तिच्या गळ्यांत एक लोखंडी कडें अडकवून, त्याला साखळी लावून, तिला त्यांनीं एका कडीशीं बांधून ठेवलें. असें कीं, तिला हातपाय वावरावयाला फारसे मोकळे राहूं नयेत. तिच्यावर पांच शिपायांचा पाहरा होता. तिनें आपला मर्दानी पोषाक उतरून जनानी पोषाक घालावा अशी आज्ञा तिला झाली. पण तिनें ती जुमानली नाहीं. ती म्हणे, "मी मर्द आहें. अबला स्त्री नव्हें. लष्करी पुरुषी पोषाखच मला योग्य." तिचे पहारेवाले तिला वेडावीत, तिची थट्टा करीत, अपमानास्पद शब्द उच्चारीत. पण पिंजऱ्यांत सांपडलेली ही वाघीण त्यांचा काय प्रतिकार करणार! अशा रीतीनें सुमारें सहा महिनेपर्यंत जोननें कैदेंत काळ काढला.


जोन शत्रूच्या हातीं सांपडली याचें पुष्कळच फ्रेंच लोकांना वाईट वाटलें. पण "झालें तें बरें झालें" असें म्हणणारेहि कांहीं निघाले! आणि जगांत नेहमीं घडतें त्याप्रमाणें, तिचे फ्रेंच शत्रु तिच्या चुका असतील नसतील त्या लोकांपुढें मांडून म्हणूं लागले कीं, "पहा ही पोर अविचारी! साधी सावधगिरी देखील तिला माहीत नाहीं. एका गोष्टींत चुकून यश आलें म्हणजे सगळ्या गोष्टींत तसेंच येतें कीं काय? निघाली मेंढी हुरळून आणि चालली लांडग्याच्या शिकारीला! पॅरिसवरच्या या

हल्ल्यांत स्वतः तिचा पाडाव झालाच, पण तिच्याबरोबर १५०० फ्रेंच लोक जखमी झाले. कांहीं मेले. हें केवळ तिच्या अविचाराचें फळ!" पॅरिसवर झालेला हा हल्ला ता. ८ सप्टेंबर रोजीं घडला. तो दिवस येशू ख्रिस्ताच्या आईचा जन्मदिवस होता. अर्थात् "या दिवशीं लढाई करणें हें अत्यंत अपवित्र काम. केवळ पापच. मग पापाचें फळ पापिणीला मिळालें तें योग्यच झालें," असें जो तो उघडपणें म्हणूं लागला. तात्पर्य काय, कोणाचीहि सद्दी संपली म्हणजे मग त्याच्यावरचे सगळे आक्षेप पुढें यावयाचे!

जोननें उत्पन्न केलेली स्फूर्ति किंचित् मंदावल्याबरोबर पूर्वीं जोनचें जें जें चांगलें वाटलें तेंच आतां वाईट वाटूं लागलें. बरगंडीच्या मध्यस्थीनें इंग्रजांशीं तहाचीं बोलणीं सुरू झालीं. ही संधि साधून त्यानें आपल्या सोयीचीं अशीं कांहीं ठाणीं ताब्यांत घेतलीं. फ्रेंच राजा हा तर भित्रा व बावळटच होता. त्याच्या हातून जोनला सोडविण्याचा प्रयत्न तर कांहीं झालाच नाहीं. पण आपल्या हातून जाणारीं ठाणीं वांचविण्याचाहि कांहीं प्रयत्न त्यानें केला नाहीं. इंग्रजांचेंहि बस्तान चांगलें बसत होतें असें नाहीं. एक जोन त्यांच्या हातीं कैदी होती, पण बरगंडीच्या स्वार्थामुळें त्यांच्या हातीं असलेलीं ठाणींहि तो हळूहळू बळकावीत होता. स्वतंत्र वृत्तीचे फ्रेंच राजाचे साथीदार त्यांना मधून मधून त्रास देत होतेच. र्‍हीम्स येथें चार्लस राजाला जो राज्याभिषेक झाला त्यानें फ्रेंच लोकांना आलेला धीर मावळून जावा म्हणून शत्रुपक्षानें अशी युक्ति काढली कीं, चार्लसचा कायदेशीर प्रतिस्पर्धी इंग्लंडचा बाल राजा ६ वा हेन्री याला आणून त्यालाहि राज्याभिषेक करावा. त्याप्रमाणें २ सप्टेंबर १९३० रोजीं त्यानें पॅरिसमध्यें प्रवेश केला.

ता. ९ जानेवारी १४३१ रोजीं रूवॉन येथें जोनच्या चौकशीला सुरुवात झाली. तिचा न्याय करणारें कोर्ट हें दोन मोठ्या धर्माधिकाऱ्यांचें होतें. या धर्माधिकाऱ्यांनीं तिला चौकशीकरितां आपल्या ताब्यांत घेतल्यावर प्रार्थनामंदिराच्या पवित्र जागेंतच तिला कैदेंत ठेवणें योग्य होतें. पण त्यांनीं तो नियम पाळला नाहीं. तिच्या सोबतीला एखादी स्त्री द्यावी तीहि दिली नाहीं. इंग्रजांनीं आपल्या सगळ्या पराभवांचा सूड तिच्यावर घेण्याचें ठरविलें होतें, आणि या धर्माधिकाऱ्यांना वश करून घेऊन तो सूड ते उगवीत होते. चौकशींत काय निष्पन्न होणार हें ठरलेलेंच होतें. पण इंग्रजांनीं या न्यायकोर्टाला असें सांगून ठेवलें होतें कीं, "तुमच्या चौकशींत जोन निरपराधी ठरली तरी तिची मुक्तता तुम्हीं करूं नये. रूवॉनचा इंग्रज ठाणेदार वॉरविक नांवाचा आहे त्याच्या स्वाधीन तिला करावें."

या न्यायकोर्टानें ठिकठिकाणचे मिळून ४० धर्माधिकारी 'असेसर' (पंच) म्हणून बोलावले होते. पैकीं कांहीं स्वतंत्र विचाराचे होते. त्यांना कांहीं कांहीं सबब सांगून पळ काढावा लागला. ता. ९ जानेवारी रोजीं चौकशीला सुरुवात झाली ती केवळ नांवाची. कारण पुरावा गोळा करण्याचें काम अजून व्हावयाचें होतें. न्यायाधिकारी हे स्वतःच जवळजवळ पुरावा गोळा करण्याचें काम करीत होते. त्यांनीं तिला आपणासमोर बोलावून आणावें, कांहीं प्रश्न विचारावे, आणि तिच्या उत्तरांत नांवें-गांवें निघतील त्या धोरणानें पुरावा मिळविण्याला वेळ हवा म्हणून तिला परत तुरुंगांत पाठविण्यांत यावें. तिच्यावर मुख्य वरपांगीं आरोप चेटकिणीचें कर्म केल्याचा होता. म्हणून त्याला उपयोगी पडेल असा पुरावा तिची जन्मभूमि व अनेक इतर गांवें या ठिकाणीं मिळविण्याचा प्रयत्न झाला. दरम्यानच्या काळांत त्या अंधाऱ्या



आजपासून तीन महिन्यांच्या आंत मी जोन पृथ्वीवरील संकटांतून देवाघरीं जाईन.

तुरुंगांत ती दुःखानें काळ काढीत होती. आणि तिच्या दुःखांत भर पडावी म्हणूनच जणूं काय तिचे पहारेवाले तिला उद्देशून किंवा एरवींहि अशा अभद्र गोष्टी बोलत कीं, त्या ऐकावयाला येऊं नयेत म्हणून ती आपल्या कानांत बोळे घाली!

न्यायाधीशापुढें तिला नेली म्हणजे ते, आपली कुशाग्र व सुशिक्षित बुद्धि चालवून, आडवे-तिडवे प्रश्न विचारून, तिला पेंचांत आणण्याचा प्रयत्न करीत. पण जोनला कपटकारस्थान कांहीं माहित नसल्यानें ती सुचेल आठवेल तें अगदीं सरळ सांगत जाई. कल्पना करा कीं, ही एकटी १९ वर्षांची मुलगी आणि तिला हें असलें भयंकर दिव्य करावें लागलें! असें सांगतात कीं, अशाहि स्थितींत तिला दिव्य संदेश येत व ते आल्याचें ती बोलूनहि दाखवी. त्यांतील एक संदेश असा होता : "अवघ्या ७ वर्षांच्या अवधींत ऑर्लिन्स-पेक्षांहि अधिक मातबर असें एक ठाणें इंग्रजांच्या हातून जाईल. आणि पुढें लवकरच इतर सगळीं ठाणीं जाऊन इंग्लंडचें असें फ्रान्स-मध्यें कांहीं शिल्लक राहणार नाहीं." कदाचित् या संदेशाची उठावणी मागाहूनहि केव्हां झाली असेल. कारण गोष्टी घडलेल्या प्रत्यक्ष पाहिल्या म्हणजे त्यांचीं भविष्यें पूर्वींच झालीं होतीं असा खोटाच पुकारा मागाहून करण्याची संवय जगभर सर्व लोकांना असते. असाच दुसऱ्याहि एका संदेशाचा पुकारा झाला होता. तो असा कीं, "आजपासून तीन महिन्यांच्या आंत मी जोन पृथ्वीवरील संकटांतून देवाघरीं जाईन." हें भविष्य खरें ठरलेंच, पण इंग्रजांविषयीं केलेलें भविष्यहि दिल्या अवधींत खरें ठरलें. कारण अनेक कारणांनीं राजा चार्लस व बरगंडीच्या ड्यूक यांचा सलोखा व समेट होऊन इंग्रजांना फ्रान्समधून हाकून देण्यांत आलें, ही गोष्ट खरीच आहे.

त्या वेळच्या रीतीप्रमाणें छळ करून, शारीरिक दुःख देऊन, जोन-कडून कबुलीजबाब घ्यावा कीं नाहीं, याविषयीं न्यायाधीशांत चर्चा झाली. पण सुदैवानें तो राक्षसी इलाज करण्यांत आला नाहीं. मात्र इतर रीतींनीं तिचा छळ इतका झाला कीं, ती आजारी झाली असें पाहून न्यायाधिकाऱ्यांनीं वैद्य-डॉक्टर आणविले, तिला औषधोपचार सुरू केले, आणि तिला बजाविलें कीं, "खबरदार! तुला शरीररोगानें मरण येण्याची आशा तूं धरूं नये." याचें तात्पर्य असें कीं, तुला अपराधी ठरवून आम्ही जी देहान्त शिक्षा देणार आहों ती भोगण्याला तूं जगलें पाहिजे!

जोनला पकडल्यानंतर एक वर्षानें, आणि रूवॉनच्या तुरुंगांत प्रवेश केल्यापासून चार महिन्यांनीं, एक दिवस पीटर मॉरीस नांवाचा धर्माधिकारी तुरुंगाशीं येऊन तिला सामोपचारानें म्हणूं लागला, "मुली, तूं बऱ्या बोलानें आपला अपराध कबूल कर ना! तसें करशील तरच दयेचा कांहीं मार्ग निघण्याचा संभव." या पीटरला खरेंच असें वाटत होतें कीं, तिला कोणींतरी फसवून या सर्व गोष्टी करावयास लावल्या आहेत. आणि तिनें पश्चात्तापपूर्वक कबुली दिली तर अग्निकाष्ठभक्षणाची तिची शिक्षा चुकेल. इतकें बोलून "रात्रीं या गोष्टीचा शांतपणें विचार कर" असें सांगून तो निघून गेला.

२१ फेब्रुवारीं रोजीं जोन व न्यायाधिकारी यांच्यामध्यें कांहीं प्रश्नोत्तरें झालीं तीं अशीं—

"जोन, तुला मुक्तिमार्ग सांपडला हें खरें आहे काय?"

"सांपडला असेल तर राहील, सांपडला नसेल तर ईश्वर अजून दाखवील."

" माझ्यासारखीं तुम्ही आपलीं निशाणें करा म्हणजे तुम्हांला दैवबळ लाभेल. असें तूं शिपायांना म्हणालीस काय ? "

" नाहीं ! मी शिपायांना इतकेंच म्हणे कीं, चला उठा व इंग्रजांवर हल्ला करा. पण मी कांहीं त्यांच्या मागें राहिलें नाहीं. सर्व ठिकाणीं हल्ल्यांत त्यांच्याबरोबर मीहि होतेंच. "

" तूं आपल्या हातानें कोणी शत्रुपक्षीय मारलास काय ? "

" नाहीं. मी इतकी लढलें पण आपल्या हातानें एकाहि सैनिकाचा वध केला नाहीं. "

" र्‍हीम्स येथें राजाला राज्याभिषेक करण्याच्या वेळीं तूं आपलें एकट्याचें निशाण प्रार्थनामंदिराच्या आंत नेलेंस आणि बाकीच्या शिलेदारांना तूं बाहेर उभें केलेंस, हें खरें आहे काय ? "

" होय. कारण मीं जें निशाण उभारलें त्याच्यामुळेंच जय मिळाला. म्हणून त्या पवित्र जागीं त्यालाच मुख्य मान मिळावा हें न्यायाचें होतें, म्हणून मीं तसें केलें."

" लोक येऊन तुझ्या हातापायांचें कपड्यांचें चुंबन घेत, याचा अर्थ काय ? "

" लोकांचें मजवर प्रेम जडलें याची ती खूण होती. मी गरीब लोकांवर ममता करीं, कोणालाहि कधीं दुःख दिलें नाहीं, त्यांना सर्व प्रकारचें साहाय्य यथाशक्ति केलें, म्हणून त्यांनींहि मजवर ममता केली."

" जोन, तूं घरून निघून गेलीस ती आईबापांच्या परवानगीशिवाय गेलीस हें खरें ना ! "

" होय, तें खरें आहे. पण पुढें त्यांनीं आपण होऊन मला त्या अपराधाची क्षमा केलीच कीं ! मग त्यांत तुमचें काय गेलें ? "

" ते क्षमा करोत. पण मुळांत तें पाप होतें कीं नाहीं ? "

" ईश्वराच्या आज्ञेनें केलेली कोणतीहि गोष्ट पाप होऊं शकत नाहीं. मला जर शंभर आईबाप असते तरी मीं केलें तेंच केलें असतें."

" झाल्या युद्धांत बरगंडीकडील लोक मेले हें चार्लस राजाला तूं पाप घडविल कीं नाहीं ? "

" राजाला साहाय्य करणें योग्य, इतकेंच मी जाणत होतें."

" तुझे देवदूत—मार्गारेट कॅथरीन हे इंग्रजांचा द्वेष करतात काय ? "

" देव ज्याच्यावर प्रेम करतो त्यावर देवदूत प्रेम करतात, देव ज्याचा द्वेष करतो त्याचा द्वेष देवदूत करतात."

" पण तुझा देव इंग्रजांचा द्वेष करतो का ? "

" तें मी काय सांगू ? पण मला इतकें माहित आहे कीं, जे इंग्रज या युद्धांतून वांचतील त्या सर्वांना तो फ्रान्समधून घालवून देणार आहे. "

जोननें लष्करी पुरुषवेष धारण केला ही गोष्ट धर्माविरुद्ध होती म्हणून त्याविषयीं न्यायमूर्तींनीं तिला प्रश्न केला. तेव्हां ती म्हणाली, " तो अधर्म नाहीं, आणि मी अजूनहि हा पुरुषाचा वेष टाकून देणार नाहीं. " याविषयीं तिचें मनांतलें एक कारण असें होतें कीं, तिचा हा पुरुषी लष्करी वेष पाहून लोक भीत. आपल्या कैदेंत आपल्या अब्रूचें रक्षण करण्याचें तेंच एक साधन आहे असें तिला वाटे. पण हें मनांतलें गुपित मात्र तिनें त्यांना उघड सांगितलें नाहीं.

ता. २३ मे गुरुवार रोजीं, न्यायाधिकाऱ्यांनीं एक जाहीर धर्मविधि केला. तो मामुली किंवा सनातनी स्वरूपाचा असून त्याचा हेतु असा असे. धर्माविरुद्ध अपराध करणाऱ्या एखाद्या गुन्हेगारानें जाहीरपणें आपला अपराध कबूल करून पश्चात्ताप प्रगट केला, तर त्याला आगींत

जाळून मारण्याची शिक्षा, न्यायाधीशांच्या मर्जीला आल्यास, माफ करतां येते. न्यायमूर्ति कॉचन याचा डाव असा होता कीं, तिच्याकडून जाहीर कबुली तर घ्यावी, पण मग तिला इंग्रजांच्या स्वाधीन करून जाळूनहि मारावी. रूवॉन गांवाबाहेर एक मोठें प्रार्थनामंदिर होतें. त्यालगत दफनभूमीची विस्तीर्ण जागा होती. तेथें जोनला नेण्यांत आलें. दूर अंतरावर मोठा जमाव जमला होता. जोनला एका उंच जागीं लाकडी फळीवर बसवून सर्वांसमक्ष तिच्या अपराधांचा पाढा वाचण्यांत आला. तो इतका लांब व अशा भाषेंत होता कीं, जोनला त्यांतलें कांहींच कळेना! तेव्हां त्याच अर्थाच्या सातआठ ओळी सोप्या भाषेंत लिहून तिला वाचून दाखवून तोंडीं असें सांगण्यांत आलें कीं, "मी अपराधी आहें किंवा नाहीं यापैकीं जें तुला म्हणावयाचें असेल तें साध्या शब्दांत सांग." तिला असेंहि सांगण्यांत आलें कीं, "तूं अपराधाच्या कबुलीवर सही दिलीस, आणि परत स्त्रीवेषाचा पोषाख घेतलास, तर तुला प्रार्थनामंदिरांतील खाजगी कैदखान्यांत ठेवूं. तुझ्या पायांतील बेड्या काढूं आणि तुझ्या सोबतीला नि दिमतीला एखादी बाई देऊं."

हें ऐकतांच जोनला बरें वाटलें. तिनें सर्व लोकांसमक्ष तिच्या पुढील टेबलावर लिहून ठेवलेल्या कागदावर सही केली. लोकांनाहि हायसें वाटलें. अशाकरितां कीं, ही सही केल्यानें जळून मरण्याची तिची शिक्षा वांचेल. उलट इंग्रज उमराव व सैनिक त्या जमावांत कांहीं होते त्यांना तिनें सही केलेली बरी वाटली नाहीं. कारण जळून मरण्याची शिक्षा तिची वांचेल अशी भीति त्यांना वाटली. ते रागावले व वेड्याप्रमाणें ओरडूं लागले. मग जमावांतून दगड येऊं लागले. गर्दी मारामारी होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां अधिकाऱ्यांनीं तिला

तेथून नेलें. पण त्या दुष्ट कॉचननें तिला देवळाच्या खाजगी तुरुंगांत न ठेवितां परत पूर्वींच्याच तुरुंगांत नेऊन डांबलें, व तिच्या पाहऱ्याला पूर्वींचेच लोक ठेवले. या पाहरेकऱ्यांनीं आतां तिला दरडावून असें सांगितलें कीं, "यापुढें तुला अंगावर पुरुषी पोषाख ठेवण्याची परवानगी मिळणार नाहीं. तूं स्त्रियांचा पोषाखच घातला पाहिजेस."

जोनच्या चौकशीच्या कामीं पॅरिस युनिव्हर्सिटीनें पुढाकार घेतला होता. दोषारोपाचे म्हणून ७० मुद्दे काढण्यांत आले! आरोपी १९ वर्षांची मुलगी ती काय, आणि तिच्यावर ७० आरोप ते काय! ७० मुद्द्यांत काय काय आरोप असतील याची कोणींहि कल्पनाच करावी! शेवटीं पांच-पंचवीस विद्वानांनीं एकत्र बसून त्या ७० मुद्द्यांचे १२ मुद्दे केले. या १२ मुद्द्यांवर शेवटीं निर्णय झाले. त्याचें किंचित् दिग्दर्शन करतों म्हणजे कळेल. उदाहरणार्थ—"आपल्याला दैवी संदेश मिळतात हें जोनचें म्हणणें खोटें आहे. आणि येत असले तरी ते देव देवदूत यांच्याकडून नसून सैतान व त्याची भुतावळ यांच्याकडून येत असले पाहिजेत. खरे देवदूत असे मिथ्या व घातक संदेश, फसवणुकीचे संदेश, कधींच पाठविणार नाहींत. जोन ही स्वतः श्रद्धाळू आहे म्हणून ती वाटेल त्या गोष्टीवर विश्वास ठेवते, आणि तें खरेंच घडलें म्हणून आग्रहानें सांगते. ती वेड्या समजुतीची फाजील अहंकारी बढाईखोर आहे. जोन ही मूर्तिपूजक असावी. तिचे पोषाखहि अपवित्रपणाचे आहेत. ती राजद्रोही आहे, विश्वासघातकी आहे, कपटी आहे, दुष्ट आहे, हिंसावादी आहे. ईश्वराचें नांव बदनाम करणारी आहे. भलतीं वचनें देणारी आहे. अविचारी आत्मघातकीहि आहे. विसंगत बोलणारी आहे. 'शेजाऱ्यांवर प्रीति करा' असें बायबल सांगत असतां त्याच्या उलट वागणारी आहे. खोटी शपथ वाहणारी आहे. धर्मसंस्थेच्या अधिकाऱ्यांविरुद्ध बंड करणारी आहे."

पण हें कोठवर लिहावें ! "स्वतः तिच्या मनापासून ईश्वरापर्यंत सर्व चांगल्या गोष्टींचा द्रोह तिनें केला" असें न्यायाधिकाऱ्यांनीं ठरविलें. तिला दोषी ठरवून मोठी शिक्षा करावी हें आधींच ठरून गेलें होतें. पण शिक्षेची मुदत लांबवून, आपल्याबरोबर चार्लस राजालाहि दोषी ठरविण्यासारखें तिच्या तोंडून कांहीं निघेल तर पाहावें असा त्यांचा विचार होता. त्याकरितां त्यांनीं तिला गोड बोलून पाहिलें, छळाचा धाक घालून पाहिलें. पण राजाविरुद्ध ती कांहीं बोलेना. शेवटीं त्यांनीं अपराधकबुलीचा व पश्चात्तापाचा कागद लिहून तिच्या पुढें टाकला. त्यावर मात्र तिनें डोळे मिटून सही केली. तिला त्यांत एवढेंच साधावयाचें होतें कीं, यामुळें आज लष्करी कैद मागची जाऊन एखाद्या प्रार्थनामंदिरांत धर्मपरिचारिकांच्या नजरेखालीं कैदेंत राहण्याची सवलत मिळाली तर ती मिळवावी. पण तिनें स्त्रीचा वेष टाकून फिरून पुरुषाचा घेतला, यामुळें तिनें आपली कबुली परत घेतली असा कांगावा करण्यांत आला. याचा अर्थ तिला देवळांतून काढून इंग्रज अधिकाऱ्यांच्या हातीं देण्यांत यावी ! तिला ताब्यांत घेऊन जाळण्याविषयीं सैनिकापासून सेनापतीपर्यंत सर्व इंग्रज उतावळे झाले होते.

तिची जाळून मारण्याची शिक्षा टळून जन्मठेपेचीच शिक्षा दिली जाणार अशी बातमी उठतांच न्यायमंडळाभोंवतीं त्यांनीं गर्दी केली. दगड फेंकले. कांहींनीं नागव्या तरवारी उचलून त्या न्यायमंडळाच्या गळ्याशीं नेऊन भिडविल्या. मात्र खुपसल्या नाहींत. आणि कांहीं असें म्हणाले कीं, "जोन जाते कुठें ? तिला अशी ना तशी पकडून शेवटीं जाळूंच." कांहीं असो. तिनें पुरुषी पोषाख करणें यांतील खरें मर्म न समजल्यामुळें सर्वांचेंच मन तिच्याविरुद्ध एक प्रकारें बिथरलें. सर्व स्त्रियांना तिच्या पोषाखाचें गुप्त मर्म कळलें. पण त्याहि नाराज

झाल्या. शेवटीं तिचे पुरुषी कपडे जुलुमानें काढून घेण्यांत आले. ती विनयभंगाला कबूल होईना, म्हणून तिला मार खावा लागला. ती तुरुंगांत जिवंत राहिली तर तेवढ्यांतच आपला इंग्रजांचा काय घात-पात करील कोण जाणे, अशा समजुतीनें सर्व इंग्रज भेदरून गेले होते. म्हणून तिला प्रत्यक्ष मरणाची शिक्षा देऊन ती अंमलांत आणणें यांतच आपली सुरक्षितता आहे असें त्यांच्या मनानें घेतलें होतें.

अखेरीस तिचे असेसर्स गोळा झाले. त्यांत वकील, वैद्य, भटभिक्षुक सर्व प्रकारचे लोक होते. त्या सर्वांनीं मिळून मृत्यूची शिक्षा ठरविली. ती ऐकून जोन दुःखानें कोसळून पडली. ती म्हणाली, " माझा एका घावानें शिरच्छेद कां करीत नाहीं ? जळून मरण्याचें दुःख देण्याचा दुष्टपणा कां करितां ? " नंतर तिला स्त्रीचा पोषाख देऊन एका रण-गाड्यावर चढविलें. आपण ज्यांचें कल्याण केलें ते फ्रेंच लोक, किंवा तो राजा, कांहींतरी उद्योग, हुल्लड, दंगा करून आपणाला सोडवितील अशी तिला थोडी आशा वाटत होती. पण जिथें देव व देवदूत यांनींच तिला प्रतिकूल होऊन तोंडें फिरविलीं तिथें मनुष्याला कृतज्ञता कोठून सुचणार ? पण तिच्या मनांत आपल्या राजाविषयीं निराशा झाली तरी तसा एक शब्दहि तिनें तोंडांतून काढला नाहीं.

तिच्या रणगाड्याभोंवतीं भाले व तरवारी घेतलेले ८०० सैनिक चालत होते. रणगाड्याला गर्दीतून वाट काढावी लागत होती शेवटीं रूवॉन गांवच्या मच्छी-बाजाराजवळ हा गाडा येऊन थांबला. मैदा-नांत तीन लांकडी उच्चासनें मांडलीं होतीं. एक राजधर्माधिकाऱ्या-करितां, दुसरें न्यायमंडळाकरितां, व तिसरें स्वतः जोनकरितां. कांहीं अंतरावर चिखलमातीचा दगडाचा एक मोठा कट्टा रचण्यांत आला होता. त्यावर जळाऊ लांकडांचा एवढा मोठा ढीग रचला होता कीं,

तो पाहूनच भीति वाटावी! या ढिगाच्या डोक्यावर जोनला आधीं बसवून मग खालून आग पेटवावी म्हणजे हळूहळू भाजून होरपळून तडफडत जोन मरत आहे असें सर्व लोकांना दिसण्याची ही योजना होती. जोनला या चितेवर चढविण्यापूर्वी मुख्य धर्माध्यक्षानें यथाविधि प्रार्थना म्हणून धर्मोपदेश केला. "समाजाच्या धार्मिक शरिराचा एखादा अवयव कुजला तर तो कापून काढावा लागतो. म्हणून आज या अपराधी जोनला ही शिक्षा देण्यांत येत आहे" अशी घोषणा त्यांनीं केली. आणि तो शेवटीं जोनला उद्देशून म्हणाला, "मुली, तूं आतां शान्त मनानें मृत्यूच्या स्वाधीन हो. यापुढें धर्ममंडळ तुझें रक्षण करूं शकणार नाहीं."

पण इकडे लक्ष न देतां जोननें स्वतःच प्रार्थनेला सुरुवात केली. आपणावर अन्याय व छळ करणाऱ्या सर्वांना तिनें क्षमा केली, व "आतां सर्वांनीं मिळून मजकरितां प्रार्थना करावी" अशी तिनें विनंति केली. तिचें या वेळचें वर्तन इतकें शान्त, गंभीर व उदात्त होतें कीं प्रेक्षक लोक रडूं लागले. त्यांत कांहीं धर्माधिकारीहि होते व शेवटीं कांहीं इंग्रजहि होते इतकें म्हटलें म्हणजे पुरे. एका प्रमुख बिशपनें डोळे पुसत पुसत तिच्या शिक्षेचा कागद वाचला. तेव्हां जोन म्हणाली, "मला एक क्रूस आणून द्या. तो उराशीं ठेवून मी मरणार." एका भल्या माणसानें एक लांकडी क्रूस तिला दिला. तो घेऊन तिनें भक्तिभावनेनें ओठांशीं नेला व नंतर आपल्या वस्त्रांत छातीशीं ठेवला. या सर्वाला कांहीं वेळ लागला.

तेव्हां इंग्रज उतावळे झाले व म्हणाले, "हे चेंगट लोक आमच्या जेवणाची वेळ टळेपर्यंत हें चालविणार कीं काय?" शेवटीं दोन लष्करी

सार्जन्ट आले. त्यांनीं जोनला धर्माधिकाऱ्यांच्या मेळ्यांतून काढून नेलें आणि चितेजवळच्या शिपायांच्या स्वाधीन केलें. तेव्हां कांहीं हळव्या मनाच्या लोकांनीं हें पाहवेना म्हणून तोंडें फिरविलीं. तिला चितेच्या टोंकावर नेऊन बसविलें तेव्हां चहूं बाजूंकडे दृष्टि फेंकून ती रूवॉन गांवाला उद्देशून म्हणाली, " मी तर मरतेंच. पण बिचाऱ्या शहरा, तुलाहि अनेक दुःखें सोसावीं लागतील. " जोनचे हातपाय बांधण्यांत आले होते. आतां तिच्या डोक्यावर, तिला बदनामीकारक असा, एक कागद लिहून लावण्यांत आला. मग तळाशीं आग लावण्यांत आली. आणि आग वर पसरूं लागली तेव्हां चितेला चिकटून असणाऱ्या धर्माधिकाऱ्याला ती म्हणाली, " भटजीमहाराज, तुमच्या अंगाला झळ लागेल, दूर व्हा ना." मग तिनें शेवटचें वाक्य उच्चारलें तें हें. " सर्व लोकहो, ऐका. मीं जें कांहीं बरेंवाईट केलें असेल त्याबद्दल मी एकटीच जबाबदार आहें. राजानें मला शिकवून कांहींच करविलें नाहीं. उलट मींच त्याला सर्वतोपरी भरीला घातलें, व यथाविधि राज्याभिषेक करविला." शेवटीं येशू ख्रिस्ताच्या नांवानें एक मोठी हांक मारून ती निश्चेष्ट पडली. दहा हजार श्रोते रडूं लागले. पण कांहीं हंसण्याइतके द्वेषानें वेडावले होते. लोक परत फिरल्यावर फिरून तिच्याविषयीं चमत्काराच्या गोष्टी बोलूं लागलेच. कोणी म्हणाले, " अगदीं शेवटच्या क्षणीं येशू ख्रिस्ताला आवडता असा कबूतर पक्षी तिच्या तोंडांतून निघून उडून जातांना आम्हीं पाहिला." दुसरे म्हणाले, " त्या पेटलेल्या ज्वालांनीं येशू ख्रिस्ताच्या नांवाच्या अक्षरांचा आकार घेतला होता कीं हो ! " कांहीं लोकांची मजल यापलीकडे गेली. ते म्हणत, "जोन ही खरी मेलीच नाहीं. तिनें सदेह स्वर्गारोहण केलें."

कांहीं वर्षांनीं जोनच्या या पुण्याईला फळ आलें. तिच्या इच्छे-प्रमाणें व भविष्याप्रमाणें इंग्रजांचीं फ्रान्समधील सगळीं ठाणीं फ्रेंच सैन्याच्या हातीं आलीं. फ्रान्सच्या भूमीवर एकहि इंग्रज शिलक उरला नाहीं! पुढें सन १४५० या सालीं चार्लस राजानें विजय संपादून रुवॉनमध्यें प्रवेश केला. तेव्हां जोनच्या आप्तांकडून अर्ज घेऊन "तिच्या अपराधांची फेर चौकशी व्हावी" असा हुकूम देण्यांत आला. रोमचा पोप कॅलिक्टस यानें तीन न्यायाधीश नेमले. र्‍हीम्सचा आर्चबिशप हा त्या न्यायमंडळाचा अध्यक्ष होता. त्यांनीं पूर्वीच्या प्रकरणांतील जे जे साक्षीदार या वेळीं जिवंत होते त्यांच्या साक्षी घेतल्या आणि शेवटीं न्यायमंडळानें १०१ कारणें देऊन जोनवरील सर्व आरोप नाशाबित ठरविले. ही गोष्ट १४५६ सालीं घडली.

या नव्या निकालांत पूर्वीच्या निकालाला "बेकायदेशीर, कपटी, दुष्ट, पक्षपाती" हीं विशेषणें लावलीं होतीं. जोनच्या शत्रूंनीं तिचा न्याय केला म्हणून पूर्वीं असें घडलें असें त्यांनीं लिहिलें. मुद्द्यांना म्हणजे कारणांना तोटा काय? पूर्वींचीं ७०! तर आतांचीं १०१! फेर चौकशीचा हा निकाल लिहून काढून त्याच्या प्रती फ्रान्सच्या सर्व शहरांतील चावड्यांवर लावण्यांत आल्या. ऑर्लिन्सच्या नागरि-कांनीं लॉयर नदीवर पूर्वीचा वेढा उठविणाऱ्या जोनचा एक पुतळा उभा केला. आणि अन्यायानें मृत्युमुखीं पडलेल्या जोनबद्दल सार्व-जनिक राष्ट्रीय पश्चात्ताप व्यक्त करण्याकरितां मोठी मिरवणूक काढण्यांत आली.

आतां या सर्वांविषयीं पुढील पिढीच्या इंग्रज लोकांचा अभिप्राय काय झाला हें पाहूं. हा अभिप्राय अर्थात् ऐतिहासिक चिकित्सक

बुद्धीनें पाहणारांचा समजावा. हा अभिप्राय असा आहे कीं, जोनच्या चरित्राला दैवी स्वरूप दिल्यानें तिच्या माणुसकीला म्हणजे खऱ्या चारित्र्याला, शीलाला, ध्येयाला अन्याय केल्यासारखें होतें. जोन ही मुळांत देशाभिमानी स्त्री. तिच्यासंबंधीं पुढें पसरलेल्या दंतकथा तिच्या चरित्रांत खऱ्या घडल्या असतीलच असें नाहीं. ती भावनावश व धार्मिक प्रवृत्तीची होती यांत शंका नाहीं. पण तिनें केलें तें सर्व राजभक्तीच्या प्रेरणेनें केलें असण्याचा फार संभव आहे. कालान्तरानें जुन्या काळीं श्रद्धाळू लोक कोणच्याहि इतिहासाचें पुराण बनवीत, तसेंच जोनचें झालें. जोनच्या चरित्राचा हा प्रसंग वगळला तर एरवींच्या सर्व इतिहासकाळांत फ्रेंच लोक स्वभावानें शीलानें कसे असतील? त्यांची सर्व भिस्त केव्हांहि अवतारावरच असेल काय? त्यांना राष्ट्राभिमान नव्हता काय? त्यांच्या अंगीं शौर्य वीर्य नव्हतें काय? एकट्या जोननेंच त्यांचा सर्व इतिहास बनविला काय? आणि समजा, ऑर्लिन्सचा वेढा उठला नसता, तें एक ठाणें इंग्रजांच्या हातीं लागलें असतें तरी काय झालें! फ्रेंच लोकांच्या राष्ट्राभिमानाला व कर्तृत्वाला व त्याबरोबर इंग्रजांच्या जयाला कलाटणी मिळून इतर सर्व ठाणीं व शहरें इंग्रजांच्या हातून सोडविलीं गेलीं तसें ऑर्लिन्स हेंहि पुढेंमागें सोडविलें गेलें असतें! इंग्लंडचा ५ वा हेन्री हा अलौकिक शूर वीर निघाला म्हणून त्यानें फ्रान्समध्यें इतक्या लढाया जिंकल्या व मुलूख मिळविला. पण याच्या उलट असणारे गुण ड्यूक ऑफ बेडफर्ड याच्या अंगीं असल्यानें हेन्रीनें संपादिलेलें बेडफर्डला टिकवितां आलें नाहीं. इंग्रज सेनापति फ्रान्समध्यें लढत ते पुष्कळसें पगारी फ्रेंच सैन्यच पदरीं ठेवून लढत. या वेळीं फ्रेंच नागरिक हातांत तरवार धरण्याला शिकला नव्हता.

पुढें तोच तरवार घेऊन उठला तेव्हां सगळें गाडें फिरलें. जोन ऑफ आर्कनें केलें असेल तें इतकेंच कीं, बाजूला बसणाऱ्या या लोकांच्या मनांत राष्ट्रभक्ति राजभक्ति यांची चेतवणी केली. पूर्वी फ्रेंच सरदारांनीं गमावलें तें फ्रेंच जनतेनें परत मिळविलें. हाच काय तो खरा चमत्कार! हीच कायती खरी क्रान्ति! जोनचा पराक्रम व तिची स्फूर्ति अलौकिक ठरली हाच खरा चमत्कार. कोणत्याहि राष्ट्रांत पराक्रम घडतात ते माणसांचीं मनेंच करितात. त्याला ईश्वरी कृपेचें स्वरूप देणें यानें कांहीं कमीपणा येत नाहीं. पण वस्तुस्थितीपेक्षां तो इतिहासावर भावनेच्या कलेनें चढविलेला अलंकारच समजावा.

# जोन ऑफ आर्कची पुरवणी

जोन ऑफ आर्कचें विक्रम चरित्र १४२९–३० या सालीं घडलें. पण त्यापूर्वीं जवळजवळ शंभर वर्षें म्हणजे सन १३४२ च्या सुमारास जोन या नांवाचीच दुसरी एक वीर स्त्री उदयाला आली होती. हा चमत्कारिक योग नव्हे काय? या वेळीं इंग्लंड व फ्रान्स यांच्या दरम्यान असेंच युद्ध सुरू होतें. क्रमानें फ्रान्सच्या उत्तर अंगच्या युद्धांत किंचित् विराम होऊन तें दक्षिणेकडे सुरू झालें होतें. प्रसंग असा होता–ब्रिटनी नांवाच्या परगण्याचा ड्यूक तिसरा जॉन मरण पावला. त्याला संतति नव्हती. तेव्हां त्याची सरदारी म्हणजे लहानसें राज्य हें कोणाकडे जावें हा प्रश्न उत्पन्न झाला. पैकीं एक हक्कदार जॉनची पुतणी जोन डी पेंथिवर नांवाची होती, व दुसरा हक्कदार जॉनचा धाकटा भाऊ जॉन डी मॉंटफर्ड हा होता. फ्रान्समध्यें या वेळीं असा एक कायदा जारी होता कीं, कोणचेंहि राजपद किंवा सरदारकीची गादी स्त्री वारसाकडे जाऊं नये, पुरुष वारसाकडेच जावी. पण याच्या उलट रोमन लॉचा आधार दाखविण्यांत आला. यामुळें कायद्यानें हें भांडण तुटेना!

पुतणी जोन इचा नवरा चार्लस ब्लॉय हा, फ्रेंच राजा ६ वा फिलिप याचा जवळचा आप्त होता. अर्थात् फिलिपनें चार्लसचा हक्क उचलून धरला. तेव्हां प्रतिपक्षी हक्कदार जॉन डी मॉन्टफर्ड हा इंग्लंडला गेला. आणि इंग्लंडचा राजा ३ रा एडवर्ड याच्याशीं त्यानें असें बोलणें लावलें कीं, “तुम्ही माझ्या मदतीला याल तर आपण दोघे मिळून फ्रान्सच्या राजाविरुद्ध लढूं. आणि मग फ्रान्सचें राजपद तुम्हीं घ्यावें आणि ब्रिटनीची सरदारी मला कायमची द्यावी.” यापूर्वीं इंग्रज राजानें आपण होऊनच फ्रान्सच्या

गादीवर हक्क सांगितला होता. आणि त्यामुळें १३२८ पासून या दोन देशांत युद्ध सुरूच होतें. या १२ वर्षांच्या अवधींत युद्ध सतत सुरू असून उभय पक्षीं नांवाजण्यासारखे मोठमोठे पराक्रम झाले. पण फ्रान्स देश अगदीं धुळीला मिळावयाला आला होता. इंग्रज राजाच्या बाजूला जर्मन व बेल्जम या देशांतील भाडोत्री सैन्य लढत होतें. उलट फ्रान्सचा राजा केवळ फ्रेंच सैन्य हातीं घेऊन लढत होता. युद्ध सुरू झाल्यावर एक हक्कदार चार्लस ब्लॉय यानें जॉन मॉटफर्ड याला नॅन्टीस या शहरांत कोंडून वेढा घातला. प्रतिपक्षाची पुष्कळ कत्तल केली. तेव्हां नॅन्टीस शहर शरण आलें व जॉन मॉन्टफर्ड हा पकडला जाऊन त्याला पॅरिसमधील एका किल्ल्यांत पक्क्या कैदेंत ठेवलें. या वेळीं त्याची स्त्री जोन ही हें ऐकून दुःखी झाली. पण तिनेंच उलट आपल्या सर्व लोकांचें सान्त्वन केलें. आपला मुलगा त्यांना दाखवून ती म्हणाली, "माझे पति शत्रूच्या हातीं सांपडून कैद झाले तर झाले. मी व माझा मुलगा हे तरी मागें मोकळे आहोंत ना? तुम्ही काळजी करूं नका. ही पहा मी शत्रूचा सूड घेण्याला निघतें."

त्याप्रमाणें ती मुलाला बरोबर घेऊन निघाली. तिनें आपल्या ताब्यांत असलेल्या सर्व ठाण्यांना जातीनें भेट दिली व धीर दिला. आणि हिवाळ्यांत संरक्षणाकरितां तिन स्वतः हेनेबन नांवाच्या एका ठाण्यांत आश्रय घेतला. हें ठाणें इंग्लंडच्या किनाऱ्याला जवळ होतें. म्हणून येथें इंग्रज सैन्याची कुमक मिळण्याची ती वाट पाहत बसली. प्रतिपक्षी चार्लस ब्लॉय यानें नॅन्टीस शहर तर घेतलेंच, पण तो आणखी सैन्य घेऊन या हेनेबन ठाण्यावर आला आणि येतांच त्यावर त्यानें दगड खडक वगैरेंचा मारा सुरू केला.

हें पाहतांच जोन मॉन्टफर्ड हिनें अंगांत चिलखत चढविलें. ती एका लढाऊ घोड्यावर स्वार झाली. गांवच्या सर्व रस्त्यांतून हिंडून तिनें पुरुषांना धीर दिला आणि बायकांना कामगिरी सांगितली कीं, त्यांनीं रस्त्याची फरसबंदी उखडून दगड जमवून द्यावेत. जोननें हे सर्व दगड आणि चुन्याचीं पोतीं गांवच्या तटावर जमविलीं व तेथून त्यांचा मारा सुरू केला. तटाच्या एका उंच बुरुजावर उभी असतां तिला असें आढळलें कीं, शत्रुपक्षाकडील छावणींतील सर्व तंबू या वेळीं रिकामे आहेत. म्हणजे त्यांतले लोक तंबू सोडून वेढ्याचें काम चालविण्याला निघून गेले आहेत. तेव्हां ती खालीं आली. घोड्यावर स्वार झाली. तिनें हत्यारबंद स्वार ३०० जमविले. आणि ज्या एका वेशीवर शत्रूची राखण नव्हती तींतून बाहेर पडून, थेट छावणींत शिरून, दोऱ्या कापून सगळे तंबू पाडले आणि त्यांना तिनें आग लावून दिली. हें पाहतांच वेढा घालणारे लोक भ्याले आणि वेढ्याचें काम टाकून देऊन परत निघाले. या वेळीं परत हेनेबन गांवांत प्रवेश करणें धोक्याचें आहे असें पाहून ती वाट बदलून जवळच्या ब्रेस्ट नामक एका किल्ल्याकडे निघाली. शत्रुपक्षांतील लुई नांवाच्या एका सरदारानें हें पाहून, बरेच लोक घेऊन, जोनचा पाठलाग करून अगदीं लगट केली. आणि जोनचे पुष्कळ स्वार शिपाई त्यानें मारले. पण उरलेले कांहीं लोक घेऊन जोन ब्रेस्टच्या किल्ल्यांत जाऊन पोहोंचली व तिनें मागोमाग वेशीचे दरवाजे लावून घेतले.

इकडे हेनेबन गांवच्या लोकांना कळेना कीं आपल्या जोनचें काय झालें ! पांच दिवसपर्यंत त्यांना तिची कांहींच खबर लागेना. पण या अवधींत जोननें चांगले हत्यारबंद असे ६०० शिपाई जमविले. त्यांच्या अघाडीला राहून ती मध्यरात्रीं ब्रेस्टहून निघाली व सूर्यो-

दयाच्या सुमारास हेनेबनला पोंचली. आणि परत आल्या वाटेनें त्याच वेशींतून तिनें गांवांत प्रवेश केला. लोक हर्षभरित झाले आणि मोठ्या उत्साहानें वाद्यें वाजवीत गांव लढविण्याकरितां तटावर चढले. फिरून दोन प्रहरपर्यंत मोठी लढाई झाली. तेव्हां वेढा देणारें सैन्य मागें हटलें. आणि त्यांनीं विचार करून असें ठरविलें कीं, सैन्याच्या एका भागानें वेढा टिकवून धरावा व चार्लसनें दुसऱ्या एका गांवाला वेढा देण्याला निघून जावें. त्याप्रमाणें त्यानें ऑरे या गांवाला वेढा घातला.

इकडे जोन मॉन्टफर्ड हेनेबन किल्ल्यांतच होती. बाहेरून लुई यानें वेढ्याचें काम चालू ठेवलें होतें. मोठीं मोठीं उल्हाट यंत्रें आणून त्यानें तटावर मोठमोठ्या दगडांचा मारा केला. गांवांतील एका धर्माधिकाऱ्यानें खाजगी रीतीनें शत्रुपक्षाशीं तहाचें बोलणें सुरू केलें. पण जोननें या लुडबुडीचा निषेध केला. इतक्यांत एका बुरुजावरून जोनला असें दिसलें कीं, एक इंग्रज आरमार जलदीनें आपल्या साहाय्याला नदींतून वर येत आहे. तें येतांच वेढा घालणारांना भीति वाटून वेढा उठवून ते निघून गेले.

या जोनची हकीकत येथेंच संपली, म्हणून या युद्धाची हकीकत यापुढें देण्याचें कारण नाहीं. तें चालूच होतें. पण सांगण्याची गोष्ट ही कीं, याच युद्धाच्या शेवटीं जोन ऑफ आर्क ही उदयाला आली. आणि तिनें या चरित्रांत वर्णन केलेले पराक्रम करून, फ्रेंच राजपुत्राला राजपद मिळवून देऊन, इंग्रजांना फ्रान्समधून हाकून देण्याला शुभ मुहूर्त केला.

---

# चरित्र-चिकित्सा

कवि नाटककार श्री. कृ. कोल्हटकर एका पद्यांत म्हणतात—

‘जो भेद विधीनें स्त्री-पुरुषीं केला।
देहींच मात्र तो संततिकार्याला॥’

याचा आशय उघड आहे. ‘स्त्री-पुरुषांत ईश्वरानें भेद ठेवला आहे. पण तो बुद्धि, भावना, उपजत गुणधर्म, अर्जित गुणधर्म यांत नाहीं. तर फक्त शरीररचनेंत. आणि तोहि एका विशेष कार्याकरितां. म्हणजे स्वतःच्या देहांतून मुलाला जन्म देण्याकरितां. पण त्याचपुरता.’

कोल्हटकरांचें हें विधान काव्यसत्य आहे, पण शास्त्रीय सत्य नाहीं. शिवाय तेवढ्या एका भेदानेंहि या दोघांच्या सगळ्याच जीवनांत भेद झाला कीं! तो असा.

मुलांना जन्म देण्याची पात्रता प्राप्त होण्यांत स्त्रियांचें बालपण जातें. त्या पात्रतेचा प्रत्यक्ष उपयोग होऊन मुलें प्रसविण्यांत, आणि त्यांचें लालनपालन, संरक्षण, पोषण करण्यांत, त्यांचें तारुण्य जातें. आणि वार्धक्याच्या स्थितींत या कर्तव्यांतून स्त्रिया मुक्त होत असल्या तरी, ती जीवनावस्था, नुसता स्वतःचा जीव जगवून संभाळून राहण्यापुरतीच, कार्यक्षम असते.

वरील कारणामुळें, प्रारंभापासून अंतापर्यंत, प्रमुख जीवनकार्यांच्या खात्यांची जी वांटणी स्त्रीपुरुषांमध्यें होऊन राहते, ती आखीव रेखीव आणि कायमची असते. एवढेंच नव्हे, तर कदाचित् या कार्यविभागणीला अनुकूल म्हणूनच निसर्गानें त्यांच्या देहांच्या व मनाच्या गुणधर्मांना सर्वसाधारणपणें वेगळेपणा ठेवला असावा.

स्त्रियांचा शरीरपिंड आणि पुरुषांचा शरीरपिंड यांतील सूक्ष्म भेद प्राणिजीवनशास्त्रांत वाचावयास सांपडतात. याविषयीं अगदीं लहान मुलांनाहि दिसून येणारी निश्चित गोष्ट म्हणजे पुरुषांना मिशा येतात. स्त्रियांना त्या येत नाहींत. उलटपक्षीं माथ्यावरील केशकलापाचा वांटा स्त्रियांना मोठा मिळतो. पुरुषांचा हा वांटा लहान असतो.

स्त्रियांची उंची पुरुषापेक्षां सामान्यतः कमी. स्त्रियांचें हाडपेर पुरुषांच्या हाडपेरांइतकें बळकट नाहीं. तथापि पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें 'श्रमपात्रता' कमी असलीच तर ती विशिष्ट प्रकारांतच असते. कारण, पुरुषांप्रमाणें फार परिश्रमांचीं जड अवजड कामें स्त्रिया करूं शकत नाहींत, पण गृहकृत्यांत त्या राबतात तशा चिकाटीनें व अखंड रीतीनें पुरुषांनाहि राबतां येणार नाहीं. कोणतेंहि कार्य करतांना पुरुष स्त्रियांपेक्षां अधिक परिश्रम करीत, पण त्यांना त्या प्रमाणानेंच विश्रांतीचीहि गरज भासते. पुरुषांपेक्षां स्त्रिया थोडा वेळ विश्रांति घेतात. पुरुषांच्या मानानें स्त्रियांचा आहार थोडा असतो. तसेंच उपोषणाच्या कामांत स्त्रिया पुरुषांहून अधिक सोशिक ठरतात. तथापि स्त्रिया अधिक कोमल तर पुरुष अधिक टणक, स्त्रिया अधिक नाजुक तर पुरुष अधिक दणकट, असा भेद गुणविशेष म्हणून सांगतां येतो. हाच भेद इतर प्राणिजातींतील स्त्री व पुरुष–मादी व नर–यांच्याहि देहाच्या पिंडरचनेंत व गुणधर्मांत आहे असें म्हणतां येतें.

स्त्रीपुरुषांच्या पिंडरचनेनुसार त्यांचीं कामें वांटलीं जावीं हें स्वाभाविक आहे. पण या मर्यादेंत स्त्रिया मेहनतीला कांहीं कमी करीत नाहींत. दिवसांतले पुरुषांच्या कामाचे तास केव्हांहि स्त्रियांच्या कामाच्या तासांपेक्षां कमीच भरतील. स्त्रियांचा ऐदीपणा जर कोठें दिसून येत असेल तर तो फक्त श्रीमंत लोकांच्या घरीं. पण समाजांत

जितके खालखालच्या थरांत अधिकाधिक जावें तितकें उलट असें आढळेल कीं, आपलें गृहकृत्य करून शिवाय पुरुषांच्या कांहीं कृत्यांतहि स्त्रिया भाग घेतात.

अलीकडे स्त्रीदाक्षिण्य कमी होत चाललें आहे. पूर्वी मध्ययुगांत स्त्रीदाक्षिण्याला भर आला होता. रणांगणावर लढण्याच्या बरोबरीनें स्त्रियांच्या अब्रूचें संरक्षण करणें हें सरदार व शिपाई, म्हणजे लष्करी पेशाचे लोक, यांचें एक मुख्य कर्तव्य मानलें जात असे. या स्त्रीदाक्षिण्याच्या अतिशयोक्तीमुळें स्त्रियांनीं वावरण्याच्या क्षेत्राचा संकोच झाला. त्यांनीं घरांतून बाहेर पडणें किंवा लोकांना दिसणें ही गोष्ट त्यांच्या मर्यादाभंगाची समजली जाई. आणि हिंदी मुसलमान स्त्रियांचा सुप्रसिद्ध ' पडदा ' हा अशाच विचारांतून निघाला असला पाहिजे.

हिंदुस्थानांत प्राचीन काळीं स्त्रिया शिक्षण घेत. घराबाहेर पडून उघडपणें वावरत. त्यांचीं लग्नें प्रौढपणीं होत. त्यांनीं पडदा पाळल्याचा कोठें उल्लेख नाहीं.

हल्लीं मात्र जगभर स्त्रिया आपलें संकुचित जीवन सोडून हळूहळू अधिकाधिक बाहेर पडत आहेत. त्यांना कोठेंहि, कशांतहि, बंदी अशी उरलेली नाहीं. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनीं काय करावें ? काय करूं नये ? याविषयीं पात्रतेची कोणतीहि सीमा सर्वमान्य नाहीं. त्यांना करतां येईल तें, पण त्यांना वाटेल तें, त्यांनीं करावें असें मत स्वीकारलें जात आहे. युरोप-अमेरिकेंत कारकुनी, चिटणिशी, इत्यादि कामें ( बिनसरकारी व सरकारीहि ) त्या करतात. आणि पुरुषांच्या बरोबरीनें त्यांना राजकीय हक्क दिले जात असल्यामुळें त्यांना राष्ट्रीय विधिमंडळाचे सभासदहि होतां येतें. १९२४ सालीं डॅनिश पार्लमेंटमध्यें निना बांग नांवाची स्त्री प्रधानमंडळांत घेतली गेली. आज ब्रिटिश

पार्लमेंटमध्यें लेडी ॲस्टॉर सारख्या कांहीं स्त्रिया सभासद आहेत. आपल्या इकडेहि संयुक्तप्रांतांत सौ. विजयालक्ष्मी पंडित यांना प्रधानपद मिळालें होतें. सौ. अनुसूयाबाई काळे व मिसेस सोब्रायन यांची निवडणूक विधिमंडळांतील सभासद म्हणून झाली.

पण हें सर्व अगदीं नवीन असल्यानें कौतुकास्पद व केवळ वानगी-दाखल—नमुन्यादाखल—दिसून येतें. आणि असेंहि म्हणतां येतें कीं, कायद्यानें स्त्रिया व पुरुष यांच्यांतील भेद काढून टाकला तरी, पुरुषांच्या जागा स्त्रियांनीं घेतल्याचीं उदाहरणें फार थोडीं आढळतात. यापुढें कितीहि काळ गेला तरी पुरुष ५० टक्के व स्त्रिया ५० टक्के अशी समान वांटणी सार्वजनिक जीवनांत कधींहि होणार नाहीं असें अनुमान करतां येतें. उदाहरणार्थ—सर्व इंग्लंड देश सॉलिसिटर, बॅरिस्टरांनीं भरलेला आहे. तथापि त्यांपैकीं अवघ्या १७ स्त्रिया सॉलिसिटर आहेत. आणि अवघ्या २० बॅरिस्टर आहेत. कॅनडांत हें प्रमाण इंग्लंडहून अधिक. तरीपण तेथें एकंदर ६६ च स्त्रिया सॉलिसिटर किंवा बॅरिस्टर आहेत. हें प्रमाण सर्व देशांपैकीं अमेरिकेंत अधिक आहे. तरीहि दोन्ही मिळून तेथील संख्या १५–१७ शेंच आहे असें म्हणतात.

ट्रेड युनियन्स घेतलीं तर साधारणपणें सातांस एक याप्रमाणें पुरुष व स्त्रीसभासद या संघांत असतात. युद्ध नसेल तेव्हां युद्धोपयोगी खात्यांत स्त्रियांची भरती मुळींच नसते. पण युद्ध उपस्थित झालें असतां, पुरुषांना लष्करभरतींत जावें लागत असल्यामुळें, लष्करी खात्यांतील आनुषंगिक, म्हणजे आजूबाजूचीं, कामें स्त्रियांना देण्यांत येतात. मागच्या महायुद्धांत बिनलढाऊ अशा वैमानिक कार्यांत सुमारें २५ हजार इंग्रज स्त्रिया गुंतल्या होत्या,

आणि वायुरक्षक मुखवटे तयार करण्याकडे सुमारें एक लाख स्त्रिया काम करीत होत्या. चालू युद्धांत ती संख्या अधिक वाढली असेल. शिवाय औषधोपचार, देखरेख, जुळवणी, साधी रखवाली, साधी शिलाई इत्यादि कामांत स्त्रियांचा पुष्कळच उपयोग होत असला पाहिजे.

हा सर्व तपशील सांगण्याचा हेतु असा कीं, इतकें सर्व झालें तरी जगांतील कोणत्याहि देशांत अजून स्त्रियांवर लढाऊ लष्करांत दाखल होण्याची सक्ति तर नाहींच, परंतु त्या अपखुषीनें दाखल होऊं म्हणतील तरी त्यांना घेतलें जाणार नाहीं. इंग्लंडांत बायकांचें एक ' ऑग्झिलियरी आर्मी कोअर ' म्हणून आहे. यांतील स्त्रियांचा पोषाख फार तर अर्ध लढाऊ असेल. पण त्यांच्या हातांत हत्यारें कितपत असतील माहीत नाहीं.

स्त्रियांना सर्वसामान्य रीतीचें शारीरिक शिक्षण देण्याचें कार्य मात्र युरोपांत बऱ्याच संघटित रीतीनें सुरू आहे. १९२१ सालीं फ्रान्समध्यें स्त्रियांना मर्दानी शारीरिक खेळ शिकविण्याच्या संस्था प्रथम निघाल्या. १९२२ सालच्या ऑलिंपिक सामन्यांत स्त्रियांनीं भाग घेतल्याचें नमूद आहे. अमेरिकेंत १८ विद्यापीठांनीं स्त्रियांच्या शारीरिक शिक्षणाला, खेळांना व सामन्यांना स्वतःची मान्यता दिली आहे. तरी तेथेंहि स्त्रियांना लढाऊ पलटणींत घेत नाहींत.

मात्र फार प्राचीन काळापासून, जणूं काय आपला हक्क कायदेशीर रीतीनें चालू वहिवाटीनें तरता राहावा म्हणूनच कीं काय, स्त्रियांनीं हातांत हत्यार घेतल्याचीं व युद्धं केल्याचीं उदाहरणें तुरळक तुरळक आढळतात. सर्व देशांच्या पुराणांत, विशेषेंकरून ग्रीस व हिंदुस्थान या देशांच्या पुराणांत, कांहीं देवता या लढाऊ म्हणून प्रसिद्धच आहेत.

त्या हातांत हत्यार घेत आणि रणहिंसा बेधडक करीत. ग्रीक पुराणांतील अथिना ही देवता लढाऊ आहे. पण आमच्या भवानी देवीची सर कुणालाच येईल असें वाटत नाहीं! 'शक्ति हें ईश्वराचें अर्धें अंग' असें मानण्यांत आलें आहे. यामुळें तिला देवतेचें रूप देऊन तिच्या राक्षस-वधाच्या कथा अनेक पुराणांत वर्णिलेल्या आहेत. शाक्त उपासक हे तर पुरुषदैवत मानीतच नाहींत. लढाऊ स्त्री हीच त्यांची देवता. आणि शक्ति, भवानी, दुर्गा, चामुंडा, काली, यांचीं चित्रें पाहिलीं तर त्यांच्या अनेक हातांत मुख्य आभरणें शस्त्रांचींच असतात. आणि त्यांच्या शस्त्रांनीं वध केलेल्या राक्षसांचीं शरीरें लोळताहेत, पायाशीं रक्तमांसाचा खच झाला आहे, अशीं वर्णनें आढळतात!

देवतेच्या खालोखाल राज्ञीपद. एखादी स्त्री राणी होऊन राज्याच्या गादीवर बसली म्हणजे तिजकडे पुरुष राजाप्रमाणें राज्याचें काम ओघानेंच येतें. यामुळें राणीपद प्राप्त झालेल्या स्त्रीनें आपल्या कंबरबंदांत तरवार लटकविली तर ती गोष्ट अमर्यादेची अशी कोण मानील? स्त्रीच्या नुसत्या राणीपणाची कल्पना स्त्रीराज्याच्या कल्पने-पर्यंत वर जाऊं शकते. तेथें राजपदावर तर स्त्री असतेच; परंतु तिच्या हाताखालचे सर्व अधिकारी स्त्रियाच असतात. अशा राज्यांत पुरुष असले तर त्यांना श्रेष्ठ राजकीय अधिकार नसतात. अगदीं अलीकडच्या काळापूर्वी सर्व देशांत राजकीय हक्कासंबंधानें स्त्रियांना जी अपात्रता होती तीच जुन्या स्त्रीराज्यांत पुरुषांना असावी हें स्वाभाविक आहे.

आपल्या पुराणांतील प्रमिलेचें स्त्रीराज्य प्रख्यात आहे. बंगाल्यांत पूर्वी एके ठिकाणीं स्त्रीराज्य होतें अशी कथा आहे. गोपीचंद राजाची आई जी मैनावती, तिचा गुरुबंधु मत्स्येंद्रनाथ हा एका स्त्रीच्या प्रेम-पाशांत बद्ध होऊन राहिला होता अशी कथा आहे. ती या बंगाली

स्त्रीराज्यासंबंधींच. प्रमिला ही अशा स्त्रीराज्यांतली राणी, व तिनें वीर अर्जुनाचा पराभव युद्धांत केला. अर्थात् अशीं स्त्रीराज्यें फारच थोडीं. पण स्त्रीपुरुष अशी मिश्र प्रजा असलेल्या राज्यांचें राजपद हातीं असतां, ज्यांनीं आपलें नांव अजरामर केलें अशा राण्या अनेक होऊन गेल्या. दिग्विजयी अलेक्झांडर याच्या वेळीं म्हणजे ऐतिहासिक काळांत एक स्त्रीराज्य होतें म्हणतात. ग्रीक पुराणांत स्त्रीराज्याचा उल्लेख आहे. ग्रीक इतिहासकार हिरोडोटस यानें असें लिहिलें आहे कीं, "थर्मोडॉन नांवाच्या नदीच्या कांठीं फेविसिरा नांवाच्या नगरांत एक स्त्रीराज्य होतें." स्त्रियांनीं युद्धांत भाग घेणें ही गोष्ट स्त्रीराज्याच्या कल्पनेंत अंगभूतच ठरते. अलीकडे स्त्रीराज्य नसतांहि रशिया व तुर्कस्थान या दोन देशांत लढाऊ स्त्रियांच्या पलटणी असल्याचें कोठें वाचल्याचें स्मरतें. पण पक्कें लक्षांत नाहीं.

आतां नियमाला अपवाद इतक्या प्रमाणांतच 'वीर स्त्री' ही चीज समजावी. पण वीर स्त्री दुर्मिळ असली तरी अनैसर्गिक म्हणतां येत नाहीं ! विशेष अलौकिक परिस्थितींतच एखादी स्त्री हातांत हत्यार घेऊन लढते. आणि त्या कारणानेंच तिची कीर्ति होते. पण स्त्रीनें हत्यार घेऊन प्रत्यक्ष युद्ध केलें म्हणजे ती युद्धाच्या कर्मकौशल्यांत पुरुष सैनिकापेक्षां अधिक श्रेष्ठ किंवा सरस होतीच होती असा या कीर्तीचा अर्थ नाहीं. तिच्याकडे या दृष्टीनें पाहावयाचें नाहीं. तर तिनें स्त्रीवर्गाचा नित्य गुणधर्म टाकून देऊन पुरुषाचा गुणधर्म प्रासंगिक म्हणून तरी अंगीकारला या दृष्टीनें.

आमच्या मराठी इतिहासांत लढाऊ स्त्रियांचीं कांहीं उदाहरणें आहेत. अहिल्याबाई होळकरणीनें हातांत जपाची माळच ठेविली होती खरी. पण राघोबादादा जर इंदूरावर स्वारी करता तर तिनें

हातांत हत्यारहि घेतलें असतें अशी कल्पना करतां येते. बखरकार म्हणतोच कीं, तिनें राघोबाला सामन्याला पाचारणच केलें होतें, व निरोप पाठविला होता कीं, "मी स्त्री म्हणून हातांत बांगड्या भरल्या असल्या तरी वेळ पडल्यास हातीं हत्यार धरण्याला त्या आड येणार नाहींत." राजमाता जिजाबाई इच्यावर प्रसंग येता तर तीहि कदाचित् लढली असती. वासुदेवशास्त्री खरे यांच्या एका नाटकांत जिजाबाई प्रत्यक्ष लढल्याचें दाखविलें आहे. माझ्या वीरविडंबन नाटकांत द्रौपदीनें तरवार घेऊन विराट नगरीचें रक्षण केलें असें कथानक घातलें आहे. शिवाजीच्या एका स्वारींत रायबागीण नांवाच्या एका स्त्रीनें एक-दोन दिवस लढाई केली, व शिवाजीच्या सैन्याला अडविलें, असें लिहिलें आहे. वासोटा किल्ला लढविणाऱ्या ताई तेलणीचें नांव प्रसिद्धच आहे. आणि जगप्रसिद्ध राणी लक्ष्मीबाई झांशीवाली इच्या चरित्राला तर शंभर वर्षेंहि अजून झालीं नाहींत. म्हणून तेंच नांव या चरित्राला दिलें आहे.

वीरमाता, वीरपत्नी, वीरदुहिता, वीरभगिनी, अशा निरनिराळ्या नात्यांनीं 'वीर' हा शब्द घातलेलीं विशेषणें ज्या स्त्रियांना लाभतात त्या भाग्यवानच म्हणावयाच्या. परन्तु स्वतःच्या पराक्रमानें 'वीरा सुवीरा' म्हणवून घेण्याचें भाग्य कोणाहि स्त्रीला अधिक स्पृहणीय नव्हे काय? झांशीवाल्या लक्ष्मीबाईप्रमाणें हें भाग्य लाभणारी स्त्री जोन ऑफ आर्क ही अशीच एक होऊन गेली. पण तिचें भाग्य लक्ष्मीबाईहून अधिक थोर. कारण तिला धर्मपीठांत सेंट म्हणजे साधु ही पदवी प्राप्त झाली. १९२० सालीं रोम येथील पोपनें जोनची स्थापना अधिकृत साधुमंडळांत यथाविधि केली. पण लौकिक स्वरूपाच्या लष्करी व्यवहारांतली तिची कीर्ति पंधराव्या शतकापासून आजवर अखंड राहिली आहे.

आणि तिचा सर्वांत ताजा पुरावा हा कीं, हलीं इंग्लंडमध्यें फ्रेंच सेनापति डी गॉल यानें, पराभव पावलेल्या फ्रेंच सैन्याच्या सेनापतीविरुद्ध, बंड उभारलें असून, आपल्या मताचे फ्रेंच शिपाई व सरदार मिळतील तितके मिळवून तो जें स्वतंत्र सैन्य जर्मनीशीं लढण्याकरितां उभारीत आहे, त्यानें जोन ऑफ आर्क इचेंच निशाण उभारलें आहे! १६ सप्टेंबर १९४० च्या 'टाइम्स' पत्रांत एक फ्रेंच लेखक लिहितो, "डी गॉलनें उभारलेल्या या निशाणावर लोरेनचा क्रूस आहे. तो दुहेरी असून त्याच्यावर जोनचें चित्र रेशमी दोऱ्यानें काढलें आहे." जुन्यानव्यांत फरक इतकाच आहे कीं, पूर्वी जोन ऑफ आर्क हिनें फ्रान्स देशांतून इंग्रजांना हाकून देणें हें आपलें जीविताचें ध्येय म्हणून हृदयांत धरलें होतें. आज त्याच इंग्रजांचें राष्ट्र, या जोन ऑफ आर्कला आपण जाळून मारली हें स्वतः विसरून व जगानेंहि विसरावें असें सांगून, तिचें साधुत्व म्हणजे दैवी कला मान्य करीत आहे, आणि जोनच्या या निशाणाला यश चिंतीत आहे!

जोन ऑफ आर्कसारख्या अलौकिक स्त्रीच्या चरित्राची संगति कशी लावावी हा एक बिकट प्रश्न होऊन राहतो. यांत तीन पक्ष उत्पन्न होतात. एक धर्मश्रद्धाळू पक्ष, एक निसर्गवादी पक्ष, व एक ऐतिहासिक पक्ष.

पैकीं श्रद्धाळू पक्षाचें म्हणणें असें आहे: "जोनचें स्वर्गलोकाशीं कांहींतरी सूत जडलेलें होतें यांत शंकाच नाहीं. त्या दोहोंत तारायंत्र सुरू होतें. परन्तु हें तारायंत्र एकतर्फी, एकांगानें चालणारें, असें म्हणावें लागतें. नेहमींच्या तारायंत्रानें दोन्ही टोंकांच्या लोकांना परस्परांशीं बोलून एकमेकांना आपलें मनोगत कळवितां येतें. पण जोनच्या बाजूला फक्त ऐकण्याचें यंत्र असून बोलण्याचें नव्हतें! तिला

संदेश आदेश येत ते केव्हां येतील, केव्हां येणार नाहींत, हें तिला आधीं ठाऊक होत नसे; व जे येत ते सांगून येत नसत. आभाळांत वीज चमकली म्हणजे तेवढी दिसते. पण ती पुन्हां केव्हां कोठें चमकेल, याचें अनुमान करून तिजकरितां वाट पाहत बसतां येत नाहीं. बरें, संदेश येत ते इतक्या त्वरित व घाईनें कीं ते आकलन करतां करतां जोनला पुरेवाट होई. तिला संदेश आणून पोंचविणारे देवदूत हे फक्त एकतर्फी निरोपे होते. म्हणजे ते ईश्वराचा संदेश जोनला सांगत. पण जोननें त्यांना उलट एखादा प्रश्न विचारला तर त्याचें उत्तर ते देत नसत. मग न पढविलेलें बोलण्याइतकी मानवी भाषा देवदूतांना येत नसेल, किंवा हातीं दिलेल्या निरोपापेक्षां अधिक बोलण्याची त्यांना परवानगी नसेल.

"पण तसें घडतें तर जोनला किती आनंद झाला असता ! ईश्वराचे आदेश जसे तिनें अंमलांत आणले, त्याप्रमाणें उलट तिला आपल्या अडचणी वेळोवेळीं या देवदूतांच्या द्वारें ईश्वराच्या कानांवर घालून त्यांच्या परिहाराची विनंति करितां आली असती. पण तें केव्हांहि घडलें नाहीं."

या श्रद्धाळू समजुतीला कांहीं प्रश्नांनीं अडवितां येतें. जोननें अंगीकारलेलें कार्य जर ईश्वराला पसंत होतें, व त्यांत तिला ईश्वरानें कांहीं निम्मेंशिम्में यशहि मिळवून दिलें, तर तिचें कार्य निम्मेंच पार पडावें व निम्में दुसऱ्याकरितां उरावें, असें कां झालें? ऑर्लिन्सचा वेढा उठवून राजपुत्र चार्लस याला ऱ्हीम्स येथें राज्याभिषेक करविणें एवढेंच काम तिच्या हातून ईश्वरानें कां करविलें? व इंग्रजांना फ्रान्समधून घालवून देण्याचें उरलेलें काम ईश्वरानें लोकांकरितां कां राखून ठेवलें!

जोनचें खरें चरित्र अवघ्या दोन वर्षांत घडलें. आणि तिला मृत्यु आला त्या वेळीं ती अवघी वीस वर्षांचीहि नव्हती. ईश्वराचा हेतु काय असावा हें कोण सांगणार ? पण जिला आपला कृपेंतला प्रेषित म्हणून ईश्वरानें नेमलें, व जिच्या हातून त्यानें ईश्वरी कार्य घडवून आणलें, तिला आगींत जळून मरण्याची आपत्ति कां यावी ? ती काय ईश्वराला वांचवितां आली नसती ?

या प्रश्नांना उत्तर मिळणें कठीण आहे. आधीं ईश्वरावर मानवी मानसशास्त्र कोणीं लादूं नये. आणि जर तें लादलें तर निदान सर्व बाजूंनीं सारखेंच लावून पुरें करावें अशी अपेक्षा सहजच असते. पण ती कधीं सफळ होत नाहीं. जें घडलें तेवढेंच ईश्वराला अभिप्रेत होतें इतकाच अपुरा खुलासा नेहमीं केला जातो. पण तो बुद्धीला पटत नाहीं. कसा पटेल ? तात्पर्य, जोनच्या नेमणुकीचें 'स्पेशल फर्मान' ईश्वरानें काढलें होतें ही गोष्ट शुद्ध बुद्धीच्या तर्कवादाला पटणारी नाहीं. मग धर्मश्रद्धाळू लोक त्यावर खुशाल विश्वास ठेवोत. पंधराव्या शतकांत या धर्मश्रद्धाळूपणाची पकड सर्व जगाप्रमाणें युरोपावर, व सर्व युरोपाप्रमाणें फ्रान्सवर, होती. यामुळें कांहीं अलौकिक दिसल्याबरोबर त्याला दैवी ठरविण्यांत आलें. आधिदैविक मनःसंस्कृतीचा हा एक उत्तम नमुना होय.

पण त्यांतहि मौज ही आहे कीं, जोननें ज्याला दैवी म्हटलें तें तसें तत्कालीन सर्वच फ्रेंच लोकांना वाटलें किंवा पटलें नाहीं. कारण धर्मश्रद्धा ही मनुष्यस्वार्थावर प्रभावी होत नाहीं ! स्वार्थ व धर्म यांचा विरोध आला तर स्वार्थ प्रभावी ठरतो. जोनविषयीं तसेंच घडलें. फ्रेंच राजपुत्राच्या बाजूचे जे होते त्यांनीं जोनला जें दिसलें, ऐकूं आलें, तो दैवी साक्षात्कार मानला ! पण इंग्रज राजाचे पक्षपाती

होते त्यांनीं त्या साक्षात्कारांना खरे अस्सल दैवी साक्षात्कार असें मानलें नाहीं. त्या साक्षात्कारांना 'आभास' म्हणून त्यांची उपेक्षा करून त्यांना भागवितां आलें असतें. कारण युद्धाच्या सोंगट्याच्या खेळांत फाशाचें दान एकदां असें पडेल तर एकदां तसें पडेल. आणि ही गोष्ट कोणच्या युद्धांत होत नाहीं? वेळप्रसंगीं एखाद्या भित्र्या माणसाच्या हातीं तरवार पडून त्याचेकडून पराक्रम घडतो. उलट एखादे वेळीं जन्मभर युद्धें केलेल्या शूर सराईत वीरालाहि हार खावी लागते. अशा तऱ्हेचें तत्त्वज्ञान लढवून जोनच्या साक्षात्कारांना केवळ 'आभास' ठरवून, इंग्रज पक्षपाती लोकांना तिची उपेक्षा करतां आली असती. पण तसें करून त्यांचें कसें भागेल? म्हणून त्यांनीं ठरविलें कीं, जोन ही दुष्ट बुद्धीची चेटकीण आहे. आणि तिच्या साक्षात्काराच्या कबुल्या हाच त्याचा पुरावा!

तात्पर्य काय कीं, ऐहिक सद्यःस्वार्थी हेतूप्रमाणें आधिदैविक संस्कृतिहि सुलट उलट वळण घेऊं शकते. आणि प्रामाणिक मनांची जर ही गोष्ट तर अप्रामाणिक मनुष्यांचीं मनें या आधिदैविक संस्कृतीच्या सामाजिक स्थितीचा उपयोग स्वार्थाकरितां किती करून घेत असतील? कसेंहि असो, त्या वेळच्या कांहीं लोकांनीं तरी जोनला ईश्वरप्रेषित मानिलें यांत शंका नाहीं. आणि वर सांगितल्याप्रमाणें, अवघ्या वीस वर्षांपूर्वीं, या विसाव्या शतकांत, रोमच्या पोपमहाराजांनीं जोनचें नांव साधूंच्या यादींत कायमचें घातलें. यावरून धार्मिक श्रद्धाळूपणाची लाट अजून पुरी ओसरली नाहीं असें म्हणावें लागतें.

बरें, जोन ही ईश्वरप्रेषित नव्हती तर तिच्या म्हणण्याप्रमाणें तिला ऐकूं आलेल्या संदेशा-आदेशांचा अर्थ कसा लावावयाचा? तो लाव-

ण्यांतहि दोन पक्ष आहेत. एक पक्ष म्हणतो कीं, जोनला संदेश-आदेश ऐकूं येत असें वाटे ते तिला खरेंच वाटे. मनुष्य पुष्कळसे आभास खरे मानतो, तें केवळ अप्रामाणिकपणानें म्हणजे लोकांना फसविण्याकरतां नव्हे ! मानवी इंद्रियांची फसवणूक होणें फारसें कठीण नाहीं. आणि याला दुसरें कोणी कारणीभूत न होतां, आपल्या इंद्रियांच्या कारणानेंच ती फसवणूक होत असते. पण ती फसवणूक आपणाला कळत नसल्यानें, आणि आपलीं इंद्रियें कमकुवत किंवा दूषित आहेत असें मानण्याची मनुष्याची प्रवृत्ति नसल्यानें, तो आभासांना सत्य सृष्टि मानतो.

जोनचे आभास हे पंधराव्या शतकांतले व तो काळ धर्मवेड्या माणसांचा म्हणा ! पण हें वेड किंवा काय तें विसाव्या शतकांतहि नाहींसें झालेलें नाहीं. ता. ७ नोव्हेंबर १९४० रोजीं प्रसिद्ध झालेल्या एका मराठी दैनिक पत्रांत छापलेली आदल्या दिवसाची लंडनची ही खालील तार पहा—

“ ख्रिस्ताचा दृष्टान्त दक्षिण इंग्लंडमधील एका खेड्यांत भर दिवसां झाल्याची आश्चर्यकारक हकीकत नुकतीच उघडकीस आली आहे. ससेक्स खोऱ्यांतील किर्लें खेड्यांत एका शेतकऱ्याला हा दृष्टान्त झाला. तो शेतकरी सांगतो, ‘ मी टेकडीवर मेंढ्या चारीत असतां मला आकाशांत एक पांढरी रेषा उमटूं लागलेली दिसूं लागली.’ क्रॉसवर मारलेली येशू ख्रिस्ताची मूर्ति त्याला दिसली. नंतर त्याला सहा पांढरे पंख असलेले यक्ष दिसले. त्यांपैकीं एक तंतुवाद्य वाजवीत होता. हा दृष्टान्त दोन मिनिटें दिसत होता व नंतर तो आकाशांत अदृश्य झाला.

"तो जेव्हां हा दृष्टान्त आपल्या गांवकऱ्यांना सांगण्यासाठीं खेड्यांत आला त्या वेळीं त्यांनींहि तोच देखावा पाहिल्याचें सांगितलें. न्यू हॅवन ह्या गांवांतून येथें आलेली बाई व तिची बहीण म्हणाली, 'आम्हांला ख्रिस्ताच्या पायांवरील व क्रॉसवरील खिळे स्पष्ट दिसत होते. यक्षांपैकीं एक सशस्त्र यक्ष आपले बाहू उभारून प्रार्थना करीत होता.' ब्रिटनच्या विजयाचीं हीं प्रसादचिन्हें आहेत असें त्या गांवकऱ्यांना वाटत आहे.

"गेल्या युद्धांतहि कांहीं शिपायांना मॉन्सचा यक्ष दिसला होता ह्याची, ह्या आश्चर्यकारक दृश्यामुळें, आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं."

खेडवळ भोळ्या शेतकऱ्यांना असे देखावे संकटकाळीं दिसावे यांत आश्चर्य नाहीं. पण युद्धकाळीं जनतेच्या मनांत आत्मरक्षणाविषयीं उत्साह टिकून राहावा म्हणून अधिकारी लोक व संपादकमहाशय असल्या बातम्या हेतुपुरःसर छापूं देतात !

असो. अगदीं सुदृढ प्रकृतीच्या बुद्धिवंत माणसालाहि असे आभास एखादे वेळीं होत नाहींत काय ? उदाहरणार्थ, आपल्या डोळ्यांसमोरून एखादी आकृति निघून गेल्यासारखी वाटते, किंवा दूर कोठें उभी आहे असें वाटतें. आणि तो केवळ छाया-प्रकाशाचा खेळ आहे हें सहसा आपल्या लक्षांत येत नाहीं. कोणीं हांक मारली नसतां हांक मारलीशी वाटावी ही सर्वांच्या अनुभवाची गोष्ट होय. आपण वाचीत असतां, डोळ्यांपुढें अगदीं छापील शब्द असतां, कांहीं कारणानें मनांत आलेलेच शब्द छापील शब्दांच्या ठिकाणीं आपणाला दिसतात व आपण ते तसे वाचतोंहि ! 'डोळ्यापुढें काजवे चमकले' ही म्हण आहे. पण खरोखरीच डोळे मिटलेले असतां आपणापुढून प्रत्यक्ष काजवे चमकून गेल्याचा आभास दाखविण्याचा खेळ ज्ञानतंतु करतात.

हीं जिवंतपणचीं स्वप्नें म्हणतां येतील. आणि झोंपेंतील स्वप्नें हीं देखील यांचींच भावंडें होत. पण या एक प्रकारच्या आत्मवंचनेच्या साक्षात्कारांना आपण दैवी स्वरूप देत नाहीं. जोनलाहि ‘ मनीं वसे तें स्वप्नीं दिसे ’ या न्यायानें जागतेपणीं स्वप्नें पडत असावीं. पण जोन ही ज्या काळांत होऊन गेली त्या काळांतील एकंदर समाजा-प्रमाणेंच ती धर्मश्रद्धाळू असेल, व तिलाहि हे संदेश-आदेश खरे दैवी नसतांना तसे वाटले असतील. आणि याचें कारण तिच्या प्रकृतीची विशेष स्थिति हें असेल.

जोनच्या चरित्राशीं इतर कोणतेंहि साम्य नसलेल्या साध्या तरुण स्त्रियांना हिस्टेरिया नांवाचा एक चमत्कारिक रोग होऊं शकतो. आणि शारीरचिकित्सकांनीं ‘ जोनला हा हिस्टेरियाचा रोग असावा ’ असें आपलें मत दिलें आहे. ती वयांत आली असतां तिला रजोदर्शन प्राप्त झालें नाहीं, हीच तिच्या शरीरविकृतीची ढोबळ खूण म्हणून सांगण्यांत येतें. दुसरे कांहीं म्हणतात कीं, जोनला आवाज ऐकूं येत व देखावे दिसत ते नेहमीं एका उजव्या बाजूलाच असत. यावरूनहि डॉक्टरलोकांनीं तिच्या शरीरविकृतीचेंच अनुमान केलें आहे. उजव्या कुशीवर आपण निजलों असतां पडणाऱ्या स्वप्नांची जात, व डाव्या कुशीवर निजलों असतां पडणाऱ्या स्वप्नांची जात, या परस्परांहून भिन्न असल्याचा अनुभव आमच्या वाचकांपैकीं कांहींना येत असेल.

जोन ऑफ आर्कचें चरित्र आनातोल फ्रान्स या प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथ-कारानें जितकें साधार सविस्तर लिहिलें आहे तितकें दुसऱ्या कोणींहि लिहिलेलें नाहीं. त्याच्या सुमारें नऊशें पानांच्या ग्रंथाच्या शेवटीं त्यानें डॉ. जी. ड्यूमा नांवाच्या एका वैद्यक आचार्यांचें पत्र छापलें आहे ( खंड दोन, पान ४०१ ). चरित्रांत आनातोलनें लिहिलेल्या

पुराव्यांची छाननी वैद्यकदृष्ट्या करून त्यानें अभिप्राय दिला. तो लक्षांत घेण्यासारखा आहे.

तो म्हणतो, "जोनला आभास होत ते सर्व एका ठराविक पद्धतीनेंच होत. हिस्टेरियांत होणारे आभास अगदीं तंतोतंत खरोखरीच्या अनुभवासारखेच असतात. उलट कसून प्रयत्न करूनहि ते आभास असे वाटत नाहींत. आणि याचा पुरावा हाच कीं, खऱ्या अनुभवाच्या वेळीं तीं माणसें व्यवहारांत जशीं वागतात थेट तशींच या आभासांच्या वेळींहि वागतात. जोनची फसवणूक होत असेल तर ती पांचहि इंद्रियांकडून एकसारखी होत असावी. यामुळें आभासांवर अविश्वास धरणें तिला अशक्य होतें." या पत्राच्या शेवटीं हा वैद्यक आचार्य म्हणतो, "जोनच्याहून वरच्या प्रतीचे जे कोणी साधु योगी असतात तेहि पुष्कळसे न कळत अशाच शरीरविकृतीला बळी पडलेले असतात. पण पुढें पुढें असें होतें कीं, या आभासांना हळूहळू साक्षात्काराचें स्वरूप ते देतात. आणि ज्या विकारांचा ताबा आपल्यावरून निघत नाहीं त्यांचा उपयोग आपल्या कार्याकडे म्हणजे ईश्वराशीं तादात्म्य होण्याच्या कार्याकडे ते करतात. हिस्टेरियाचा रोग एका दृष्टीनें स्त्रीला निर्बल करणारा. पण प्रसंगविशेषीं तोच तिला प्रबळ करतो. उन्माद ही स्थिति जितकी शरीरविकृतीची तितकीच मानसिक सामर्थ्याचीहि असते. कसेंहि म्हणा, पण जोन अप्रामाणिक किंवा फसवी नव्हती. तिला बहुधा कांहींतरी शरीरविकृति होती. त्यामुळेंच तिला आभास होत व ते ती खरे मानी."

हा झाला दुसरा पंथ. आतां तिसरा पंथ असा कीं, जोन ही मुख्यतः देशभक्त माना. मग हिस्टेरियाचा रोग होता म्हणून संदेश-आदेशांच्या बाबतींत तिनें स्वतःला फसविलें म्हणा, किंवा जाणून-

बुजून इतरांना आपल्या कार्याकरितां खोटें सांगून फसविलें म्हणा ! इतिहासांतील शिवाजीमहाराजांच्या अलौकिक यशाचा व पराक्रमाचा खुलासा साध्या लौकिक पद्धतीनें करणें कठीण जातें, म्हणून आपल्याकडेहि बखरकारांनीं शिवाजीच्या अंगांत भवानी येत असे, किंवा निदान ती त्याला दर्शन देऊन वरदान करीत असे, असा खुलासा केला आहेच कीं नाहीं !

तें कांहींहि असो. जोनच्या चरित्राचें खरें स्वारस्य समजून घेण्याला अशा अवांतर चिकित्सेंत पडण्याचें कारण नाहीं. ज्यांना ती चिकित्सा करावीशी वाटली त्यांच्या म्हणण्याचा व निष्कर्षांचा उल्लेख वर थोडा केला आहे इतकेंच. या चरित्राकडे अगदीं निरनिराळ्या दृष्टींनीं पाहणाऱ्या दोघां फ्रेंच वाङ्मयपंडितांचे शेरे याखालीं देतों. ला मार्टिन हा फ्रेंच कवि म्हणतो, “ जोनच्या अंगीं शिपाईबाण्याचे सर्व गुण व सर्व दोष होते. म्हणून लष्करी सैन्यांत निशाणावर लावण्याला तिच्यासारखें ध्वजचिन्ह दुसरें मिळणार नाहीं.” दुसरा म्हणतो “ छे ! जोन ही भोळी बापडी, स्फूर्ति होईल तसें आंधळेपणानें वागणारी, स्त्री नव्हती. ती चांगली पक्की वस्ताद स्त्री होती. ”

कोणी कसेंहि म्हणा, तिनें उज्ज्वल देशभक्ति प्रगट केली, व स्त्रीजातीला कायमचे भूषणभूत होण्यासारखे गुण जगाला दाखवून स्त्रीचारित्र्याचा एक उत्तम आदर्श निर्माण करुन ठेवून दिला, यांत कोणाचहि दुमत होणार नाहीं.

जोनचें चरित्र सर्वच बाजूंनीं अद्‌भुत किंवा अलौकिक ठरतें. कसें तें पाहा—सगळा अवतार २० वर्षांच्या आंत संपला ! आणि एवढ्या वयांत एका साध्या खेडवळ कुमारिकेनें, राजकीय दृष्ट्या मोठमोठ्या लोकांच्या हातून न होणारी अशी, कामगिरी केली. म्हणजे आपल्या

राष्ट्राचा राजा अनाथ होता तो सनाथ केला. त्याला राज्याभिषेक केला. त्याला त्याचें राज्य व प्रजा परत मिळवून दिलीं. आणि राष्ट्राला परकीयांच्या सत्तेंतून मुक्त करून स्वातंत्र्यदान देण्याची स्फूर्तिदायक कल्पना राष्ट्रप्रेमी फ्रेंच लोकांच्या मनांत कायमची रुजविली.

तसेंच धार्मिक दृष्ट्या ती एक वेळ 'चेटकीण', 'दुराचारी', 'धर्मद्रोही' अशी प्रथम मानली गेली होती. पण तो तिजवरचा सर्व दोष जाऊन शेवटीं ती सच्छील, सत्प्रवृत्त, पुण्यशील अशी एक संत स्त्री होती असा निर्णय धार्मिक न्यायपीठानेंच दिला.

एका दृष्टीनें जोनच्या आयुष्यांत घडलें त्यापेक्षां तिच्या मृत्यूनंतर घडलें तेंच मनावर अधिक परिणाम करतें. कारण न्यायपीठाच्या हातून वर सांगितल्याप्रमाणें झालेली तिची प्रतिष्ठापना तिच्या मृत्यूनंतरच झाली. तसेंच रोमन कॅथॉलिक धर्माच्या राज्यांत ज्या एकाहून एक वरच्या दर्जाच्या पदव्या होत्या व आहेत, त्या सर्व तिला क्रमाक्रमानें तिच्या मृत्यूनंतरच मिळाल्या. सन १४३१ सालीं मृत्यु पावलेली ही मुलगी १९०४ सालीं 'व्हेनरेबल' या पदवीला पोंचली. १९०८ सालीं ती 'ब्लेसेड' या पदवीला पोहोंचली. आणि १९२० सालीं तिला अधिकारी संतमंडळांत कायमचें स्थान लाभलें. ख्रिस्ती धर्माच्या रक्षणाकरितां पूर्वी शेंकडों वर्षें अनेक एकांडे वीर व लष्करी सरदार युरोपांतून पॅलेस्टाइनकडे गेले, त्या सर्वांपेक्षां जोनला धार्मिक व राजकीय अशी दुहेरी कीर्ति अधिक मिळाली. त्या सर्वांचीं नांवें आज विसरलीं गेलीं आहेत, तरी पण जोनचें नांव मात्र अजून जगाच्या स्मरणांत असून तिच्या कीर्तीला नवे नवे अंकुर फुटत आहेत.

जोनच्या वेळीं सुधारक प्रॉटेस्टंट धर्मपंथ उदयाला आला नव्हता. तथापि धर्मपीठाच्या अधिकाऱ्यांना विरोध करणें, व त्यांना न जुमानणें,

या दृष्टीनें सुप्रसिद्ध धर्मसुधारक ल्यूथर याचें पूर्वदर्शन जोननें घडविलें. कारण तिच्या काळीं रोमचा पोप हाच जगावरील ईश्वराचा खास सर्वाधिकारी अशी समजूत असतां, तो अधिकार ' फ्रान्सच्या भवितव्यतेपुरता मला आहे ' असा आग्रह जोननें धरला. फ्रान्सच्या राजाला एखाद्या मूर्ख खोडकर मुलाप्रमाणें संभाळून खेळवून 'लहानाचा मोठा' केला. आणि इंग्लंडच्या बलाढ्य राजालाहि तिनें तुच्छतादर्शक हुकूम पाठविले. कोणीहि अधिकारी हा तिच्या खिजगणतींत नव्हता. आणि हें सर्व संभाळलें गेलें तें कशाच्या जोरावर? तर केवळ तिचा निःस्वार्थ, आणि शारीरिक मानसिक व नैतिक धैर्य, यांच्या आधारावर.

इतकें करून ती पूर्णपणें विनयशील होती. बर्नार्ड शॉ यानें तिची तुलना, कांहीं बाबतींत, स्वतःला अज्ञानी म्हणणारा शहाणा ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटिस याच्याशीं केली आहे. ती आपल्या तेजस्वी गुणांनीं दुस्सह ठरली हाच तिचा खरा दोष. तिच्या पराक्रमांत शरीरसौंदर्याची कांहींहि मदत नव्हती. तिच्या सौंदर्यानें मोहित होऊन तिचा सहकारी बनला अशा एकाचेंहि नांव नमूद नाहीं. ती कुरूप भेसूर नव्हती, एवढेंच तिचें वर्णन करितां येईल. तसेंच तिच्या पुरुषी लष्करी वृत्तीनें तिच्यांतलें स्त्रीमार्दव बहुतेक सर्व काढून घेतलें होतें. जोन ही या दुसऱ्या (लष्करी) मार्गांत न पडती तर तिनें लग्न करून एखादा संसारहि थाटला असता ! आजच्या काळांत ती असती, तर तिचें चित्र विलासी बादशाहीण किंवा सिनेमा नटी अशा थाटानें रंगविलें गेलें नसतें. आणि तें चित्र मर्द स्त्री या कल्पनेनें रंगविलें गेलें असतें तर त्याच दृष्टीनें तें अधिक लोकप्रिय झालें असतें.

कोणच्याहि कल्पनेला विरोधानें उठाव देण्याची एक ठरीव रीत आहे. उदाहरणार्थ, कांहीं संत प्रथम खुनी व दरोडेखोर होते असें

वर्णन आढळतें. ‘ सेंटस् हॅव ए पास्ट ’ अशी इंग्रजींत एक म्हणच आहे. पुढच्या काळीं वैभवशाली राव नरेन्द्र म्हणून ठरला तो प्रारंभीं भणंग भिकारी होता असें सिद्ध करण्याकडे चरित्रकारांचा कल झुकतो. त्याच पद्धतीनें, जोन ही पुढें एवढी मोठी झाली त्या अर्थी, ती मुळांत सामान्य दरिद्री अशा खेडवळाची मुलगी होती असें मानण्याकडे व सांगण्याकडे प्रवृत्ति असते. पण तशी गोष्ट खरी नाहीं. कारण जोनचा बाप हा शेतकरी असला तरी, गांवच्या चावडीवर बसून अधिकारीपणानें कारभार करणारा असा ग्रामप्रतिष्ठित होता. त्याच्या गांवांत एक लहानशी गढी होती ती जोनच्या बापाच्या ताब्यांत असल्यामुळें, एखादी पाटलाची मुलगी जशी चावडींत थाटानें वावरते तशीच जोनहि या गढींत वावरत असे. पण त्याचबरोबर या गढीच्या संसर्गानें लहानसहान दंगे-धोपे, मारपीट, शिपाईगिरी, इत्यादिकांशीं तिचा परिचय घडत असे. मात्र तत्कालीन स्थितीप्रमाणें ही पाटलाची मुलगी असली तरी निरक्षर असावी यांत आश्चर्य नाहीं. असें सांगतात कीं, फ्रेंच राज्यक्रान्तीच्या वेळीं, म्हणजे १८व्या शतकाच्या अखेरीस फ्रान्सच्या गादीवर असलेल्या राजाची मुत्सद्दी राणी ही देखील निरक्षर होती. मग १५व्या शतकांतील जोन निरक्षर असली तर त्यांत काय नवल ! पण ती निरक्षर असली तरी तिच्या अंगीं ज्ञान व शहाणपण होतें. यामुळें ती तोंडानें मजकूर सांगून चांगलीं पत्रें लिहवी. आपल्या पेशवाईंतील किंवा मराठेशाहींतील स्त्रिया कोण किती साक्षर होत्या हें माहीत नाहीं. पण त्यांनीं आपल्या नांवांनीं लिहिलेलीं पत्रें पुष्कळ उपलब्ध आहेत. कित्येकांच्या मतें आधुनिक काळांतील सामान्य सुशिक्षित फ्रेंच स्त्रीपेक्षांहि जोनला फ्रान्सची त्या वेळची राजकीय स्थिति अधिक चांगली माहिती होती. मात्र

याचें कारण हें कीं, हल्लींप्रमाणें तत्कालीन राजकारण हें विशेष गुंतागुंतीचें नसे.

जोनचें व्यावहारिक ज्ञान व सारासार विचारशक्ति अशा उच्च प्रकारची असतां ती आपणाला ईश्वरी संदेश येत असें मानीत असे किंवा म्हणत असे याची संगति कशी लावावी? तर त्याचें उत्तर हेंच कीं, तिच्या बुद्धीप्रमाणेंच तिची कल्पनाशक्तिहि फार तीव्र होती. आणि तीव्र कल्पनाशक्तीनें भासविलेल्या गोष्टी जवळजवळ खऱ्या मानणारीं मनुष्यें खरोखर वेडींच असलीं पाहिजेत असें नाहीं. कल्पनाशक्ति तीव्र असली म्हणजे शरिराचे चाळेहि त्या वळणानें होतात असें म्हणतात. सुप्रसिद्ध धर्मसुधारक ल्यूथर याची एक गोष्ट अशी सांगतात कीं, सैतानाचें शत्रुत्व त्याच्या मनांत पूर्ण बिंबलेलें! म्हणून एके दिवशीं तो खुर्चीवर बसून टेबलावर कांहीं लिहीत असतां, त्याला समोर सैतान उभा राहिल्याचा भास झाला. आणि त्या भावनेच्या भरांत त्यानें टेबलावरची दौत उचलून सैतानावर रोखून मारली. अर्थात् सैतान तेथें मूर्तिमंत नसल्यानें त्याला कांहींच इजा झाली नाहीं, पण समोरचा सुंदर रंगीत पडदा मात्र त्या दौतींतील शाईनें चिताडला गेला!

आपल्या इकडील साधुसन्तांच्या चरित्रांतहि अशाच गोष्टी आढळतात. ‘ विठोबा आपल्याशीं बोलतो ’ असें म्हणणारे साधु वेड्याच्या इस्पितळांत नेण्याच्या योग्यतेचे खचित नव्हते. बादशाहाच्या शिक्षेंतून आपणाला वांचविणारा विठोबा हाच महाराचें सोंग घेऊन अवतीर्ण झाला असें वाटणारा दामाजीपंत पागल नव्हता. तीच गोष्ट, विठोबा आपल्याला दळणाच्या कामीं मदत करतो असें समजणाऱ्या संत जनाईचीहि नव्हे काय? अपरोक्षानुभूति म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरदर्शन

न घडो. तथापि या नाहीं त्या रीतीनें ईश्वरकृपेचा प्रत्यक्ष लाभ घडणें याला आधुनिक तत्त्वज्ञानी देखील धार्मिक अनुभव (Religious Experiences) असें विनयशील, पण अपरोक्षानुभूति गृहीत धरणारें, नांव देतातच कीं नाहीं?

आणि अगदीं ताजें उदाहरण घ्यावयाचें तर मधूनमधून आपल्या 'आंतल्या आवाजा'चा भाविकपणें उल्लेख करणाऱ्या महात्मा गांधींचेंच देतां येईल कीं नाहीं? हा त्यांचा आंतला आवाज म्हणजे, ते ओटीवर बसले असतां माजवरांतून आलेला पत्नीचा नव्हे किंवा पडद्यापलीकडून कोणी बोलल्याचा ऐकलेला नव्हे. तर अर्थात् 'माझ्या हृदयांतून निघणारा' असाच गांधींचा अर्थ असतो. पण त्याबरोबरच ते हें ध्वनित करतात कीं, "माझ्या तोंडून बाहेर पडणारे सगळेच शब्द हृदयांतूनच निघणारे असले तरी, हा जो 'आंतला आवाज' तो तेवढा मात्र नेहमीं निघणारा नव्हे! त्याची ही उत्पत्ति माझ्या हृदयांतून असली तरी त्याचें खरें मूळ त्याहीपलीकडे कांहीं आहे." याचाच अर्थ तो ईश्वरी आदेश होय. म. गांधी हे पुष्कळ वेळां, इतर सामान्य भाविक लोकांप्रमाणें, ईश्वराचें नांव व्यवहारांत मधून मधून आणीत असले तरी, तें कित्येक वेळां तरी निव्वळ औपचारिकच नसतें असें मानण्यास जागा आहे. विभूतिमत्त्वाचे चाळे व खेळ असेच असतात!

याविषयीं बर्नार्ड शॉ यानें एक फार सुंदर वाक्य लिहिलें आहे. तो म्हणतो, "The test of sanity is not the normality of the method but the reasonableness of the discovery." हें वाक्य न्यूटनला लावून तो म्हणतो, "न्यूटननें हुडकून काढलेला सिद्धांत सयुक्तिक आहे कीं नाहीं एवढेंच पाहा. त्यानें तो हुडकून काढल्याची रीति किंवा पद्धति अलौकिक असाधारण (किंवा भलतीच

म्हणा ) असेना. त्याशीं तुम्हांला काय कर्तव्य? गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त जर सत्याच्या कसोटीला उतरला, तर न्यूटननें तो अन्तः-स्फूर्तीनें किंवा दिव्य संदेशानें हुडकून काढला असो वा नसो, त्याच्याशीं तुम्हांला काय कर्तव्य? अर्थात् लोकांना कधीं कांहीं सुचलें नाहीं असें एखादें तत्त्व हुडकून काढणें किंवा प्रकट करणें हा कांहीं वेडेपणाचा पुरावा ठरत नाहीं."

जोनची पुरुषी पोषाखाची आवड हेंहि तिच्या वेडेपणाचें एक लक्षण असें दर्शविण्यांत येतें. पण त्याचाहि खुलासा सोपा आहे. प्रथम आधीं, मनांत खरी वीरवृत्ति प्रगट होणाऱ्या स्त्रीला बायकी पोषाखाची नावड वाटावी हें सहजच आहे. आणि प्रत्यक्ष रणांगणावर ती अवतरल्यानंतर तर तिला मर्दानी पोषाखच अधिक सोयीचा असा अनुभवाला आला तर त्यांत काय नवल? या पोषाखाच्या तिच्या आग्रहाला आणखी एक कारण होतें. कामुक भावनेला जनानी पोषाख हा अधिक अनुकूल ठरतो. उलट मर्दानी पोषाख घालणारी स्त्री पाहिली म्हणजे त्या कामुकतेला परस्पर धक्का बसून ती हटते. हल्लीं आपण पाहतोंच कीं, अनेक खेळाडू स्त्रिया मर्दानी खेळांत सामील होतात. तेव्हां त्या प्रायः मर्दानी पोषाख घालतात. याचें कारण क्रीडांगणावर खरोखरच त्या आपली स्त्रीसहज कामुक भावना विसर-तात. आणि आपणाबरोबर खेळणाऱ्या पुरुष गड्यांनींहि ती भावना त्या वेळीं विसरावी अशी त्यांची अपेक्षा असते.

जोनचें तर आणखी एक कारण असें कीं, ती कांहीं स्त्रियांच्या एखाद्या पलटणींतील सैनिक नव्हती. ती एकटी एकच स्त्री-सैनिक असून असभ्य अशा शिपाई लोकांत तिला वावरावें लागे. यामुळें अशा अविचारी आडदांड लोकांना आपल्या पुरुषी पोषाखानें दूर

ठेवण्याचें जें सहज साधन होऊं शकतें तें तिनें इष्ट कां मानूं नये? आणि खरोखर असें वर्णन आढळतें कीं, रात्रीं अपरात्रीं एखाद्या रणांगणावर शिपायांचा तळ पडलेला असतां त्यांतच त्या गर्दींत जोनला झोंपावें लागे. पुढें ती तुरुंगांत असहाय स्थितींत असतां, त्या एकांतवासांत, पुरुष रखवालदारापासून आपलें रक्षण थोडेंबहुत तरी करण्यासाठीं हा पुरुषी पोषाखच उपयोगी पडेल ही तिची समजूत अगदीं तर्कशुद्ध होती.

तात्पर्य, जोनच्या पुरुषी पोषाखाची आवड ही तिच्या वेडेपणाची खूण मानतां येत नाहीं. तीच गोष्ट तिच्या वरील वेडेपणाच्या आरोपांतील संदेशांआदेशावरील तिच्या विश्वासाचीहि समजावी. कारण एखाद-दुसरा संदेश-आदेश खोटा-विफल ठरला असें तिच्या प्रत्ययाला उघड आल्यावर, त्यानंतर त्या संदेशा-आदेशांचें स्तोम तिनें कमी माजवावें कीं नाहीं? पण प्रथम तिची तीव्र कल्पनाशक्ति जशी तिला प्रवर्तक ठरली, त्याप्रमाणें, संदेश-आदेश हे खरे ठरतातच असें नाहीं हें तिच्या अनुभवाला आल्यावर तिचा आशावाद हाहि तिला तितकाच प्रवर्तक ठरला. एखादा संदेश एकदां खोटा पडेल, पण दुसरा तरी तसाच पडणार नाहीं ही आशा! मात्र हें सर्व अविचाराचें लक्षण असतें. आशा हीच अविवेकाला कारणीभूत होते. तसें जोनचें झालें. न्यायासनापुढें तिची चौकशी सुरू असतां तिला आपल्या प्रार्थनेच्या तारायंत्राला उलट जबाब मिळण्याची खात्री नव्हती. तरी पण याच वेळेस तिचा लष्करी सहकारी–ला हिरे नांवाचा–कांहीं सैन्यानिशीं जवळच तळ देऊन बसला होता. तो आयत्या वेळीं पुढें येऊन आपणाला सोडवील अशी आशा तिला वाटत होती. आणि या तिच्या लष्करी मित्रानें ती गोष्ट मनावर घेतली असती तर साधलीहि असती. ही आशा वाटत होती तोंवर

ईश्वरी संदेशाचाहि आभास तिला होत असेल. पण ती कल्पना फसली असें कळून आल्यावर तिनें ईश्वरी संदेशाचा नाद सोडला. आणि तेथपासून पश्चात्तापाची कबुली देणें, ती कबुली परत घेणें, इत्यादि गोष्टी तिनें केवळ आपल्या तारतम्यानें केल्या.

जोनला वेडी ठरविण्याची आणखी एक खूण म्हणून अशी सांगतात कीं, एकदां बोरेव्हो नांवाच्या किल्ल्यांत ती कैदेंत असतां, अटकेंतून पळून जाण्याकरितां एका बुरुजावरून खालीं साठ फूट उडी टाकण्याचें धाडस तिनें केलें. पण अशीं कृत्यें वेडेपणामुळेंच होतात असें नाहीं. अशीं धाडसें रणांगणावर घडतातच, पण रणांगणाशीं संबंध नसलेल्या अशा कैदखान्यांतहि तीं नेहमीं घडून येतात. येथेंहि माणसाचें आशावादीत्व हेंच या धाडसाचें कारण असतें. अशा कामीं लोक शरिराला तुरुंगवास दुस्सह होतो म्हणून अशीं धाडसें करीत नाहींत, किंवा प्राण द्यावाच या इच्छेनेंहि तीं करीत नाहींत. तर न जाणों एखादें धाडसी कर्महि यशस्वी होऊं शकतें, आणि थोडीशी जोखीम पत्करल्यानें जर स्वातंत्र्य मिळण्यासारखें वाटलें तर तें मिळविण्याचा मोह सहजच होतो. आणि इतिहासकार तर असेंहि म्हणतो कीं, जोननें बुरुजावरून उडी मारण्याचें हें जें धाडस केलें त्यांत, आपलें शरीरस्वातंत्र्य मिळविणें हा तिचा मुख्य हेतु नसून दुसरेंहि एक कारण होतें. तिनें तुरुंगांत असें ऐकिलें होतें कीं, कॉंपेर्नीचें ठिकाण लौकरच शत्रूच्या हातीं जाण्याचा संभव आहे. आणि आपण तुरुंगांतून सुटून त्या ठाण्यांतल्या सैन्याला जाऊन मिळूं तर सैन्याला उत्साह येईल व तें अपयश टळेल. हें धाडस तिनें करूं नये असा आदेश तिला मिळाल्याची एक गप्प होती. पण असें सांगतात कीं, जोननें तें सगळें थट्टेवारी नेलें. आणि म्हणाली, " होय, मीं हें धाडस करूं नये असा मला आदेश

मिळाला होता खरा. आणि मी तो जुमानला नाहीं हेंहि खरें. पण मी त्या धाडसांतून वांचलें यावरून माझ्या देवदूतांनीं, मीं त्यांची आज्ञा मोडल्याबद्दल, मला क्षमा केली हेंच सिद्ध होत नाहीं काय ?"

जोन ऑफ आर्कच्या चरित्रावर, कोणाला कल्पना होणार नाहीं इतकें, वाङ्मय फ्रेंच व इतर भाषांतून निर्माण झालें आहे. कालक्रम घेतला तर प्रथम इंग्रज कवि शेक्सपिअर येतो. त्यानें रचलेल्या 'सहावा हेन्री' या नाटकांत जोन ऑफ आर्कचें पात्र महत्त्वाचें दाखविलें आहे. पण कवि स्वदेशाचा अभिमानी असल्यामुळें त्यानें जोनचें चित्र अतिशय विकृत तऱ्हेनें रंगविलें आहे. असें सांगतात कीं, शेक्सपिअरनें ही भूमिका प्रथम अत्यंत उदात्त अशी रंगविली होती, पण आपल्या शत्रूचें असें उदात्त चित्र पाहण्याचें इंग्रज प्रेक्षकांना आवडणार नाहीं, व नाटक रंगभूमीवर येणार नाहीं, असा तज्ज्ञांचा सल्ला मिळाल्यानें त्यानें ती भूमिका वेगळी रंगविली. यानंतर दोन शतकांनीं जर्मन कवि नाटककार शिलर यानें तिचें चित्र रंगविलें. पण त्यांत तिच्या अद्भुतपणाचा इतका कहर करून सोडला कीं, त्याचाच विषाद वाचकांना वाटावा. शिलरचें नाटक इतिहासाला धरूनहि नाहीं. यानंतर व्हाल्टेअर हा वास्तविक फ्रेंच ग्रंथकार. पण तो मनांतून इंग्रजांचा चाहता. शिवाय अत्यंत धर्मद्वेष्टा. यामुळें 'ला पुसेल' या नांवाच्या नाटकांत त्यानें जोनचें वर्णन अगदींच असभ्यतेनें केलें आहे. त्यांत जोनविषयीं तुच्छता नाहीं, पण तिच्या धर्मवेडाची विदुषकी चेष्टा आहे. "जोन ही एका गाढवावर बसली आहे, त्याला पंख आहेत, त्यावरून जोन आकाशभ्रमण करीत आहे," असेंहि त्यानें वर्णिलें आहे.

पण १८४० च्या सुमारास जोनच्या न्यायासनापुढील चौकशीचे कागदपत्र इतिहासचिकित्सकाच्या बुद्धीनें प्रथम पुढें आले. तेव्हांपासून

मात्र जोनविषयीं सर्व प्रकारच्या पौराणिक कल्पना नाहींशा होऊन तिची इतिहासांतील भूमिका लोकांना दिसली. आणि तें वाचून अमेरिका व इंग्लंड दोन्ही देशांत जोनचें संशोधन व वर्णन सुरू झालें. अमेरिकन ग्रंथकार मार्क ट्वेन यानें क्षणभर आपला थट्टेखोर स्वभाव बाजूला ठेवून जोनविषयीं अत्यंत आदरबुद्धीनें लिहिलें आहे. यानंतर आनातोल फ्रान्स या फ्रेंच ग्रंथकारानें तिचें आठ-नऊशें पानांचें चरित्र लिहिलें आहे. त्यांत भूमिका इतिहासाच्या चिकित्सकाची ठेवली आहे. परन्तु तोहि व्हॉलटेअरप्रमाणें धर्मशत्रु असल्यामुळें तिच्या कर्तृत्वाला त्यानें कमीपणा आणला आहे. यावर प्रतिक्रिया म्हणून ॲन्ड्र्यू लँग या प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकारानें अनातोल फ्रान्सचे सगळे मुद्दे खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. जोन ही सत्य इतिहासनिष्ठ भूमिकेवर आधारलेली असून तिच्या सर्व पराक्रमांचा ग्रंथ शुद्ध तर्कानु-मानानें लावतां येतो असें लँग यानें प्रतिपादिलें आहे. आणि स्वतः आमचेंहि मत तसेंच आहे.

मौज ही कीं, अलीकडील इंग्रज ग्रंथकारांनीं जोनविषयीं जितकें अनुकूल लिहिलें इतकें आधुनिक फ्रेंचांनींहि लिहिलें नाहीं. बर्नार्ड शॉ यानें ' सेंट जोन ' या नांवाचें नाटक लिहिलें असून नाटकाहून मोठी अशी एक प्रस्तावना त्याला जोडली आहे. त्याचें थोडक्यांत म्हणणें असें आहे–" जोनला धर्मवेड्या लोकांनीं जाळून मारली यांत त्यांचाहि फारसा दोष नाहीं. कारण तो काळच तसा धर्मवेडाचा होता. म्हणून आतां त्याची चिकित्सा करणें योग्य नाहीं. पण त्यामुळें जोनच्या खऱ्या मानवी गुणांना बाध येत नाहीं. " शेवटीं शॉने ज्या शब्दांत जोनची तर्कचिकित्सा म्हणून केली आहे ते देतों. तो म्हणतो—"जोन ही पागल नव्हती. समंजस धोरणी होती. शरिरानें अत्यंत सुदृढ

आणि मनानें इच्छाशक्तीनें अत्यंत खंबीर. कोणचीहि गोष्ट ती मनांत हिशेब करूनच करी. मात्र तिचा हिशेब इतरांपेक्षां फारच थोड्या वेळांत होई. शाळेंत मुलांना गणित घातलें म्हणजे चलाख बुद्धीचे व मंद बुद्धीचे विद्यार्थी यांत जो फरक दिसून येतो तो जोन व तिचे सहकारी यांच्यामध्यें दिसून आला. ती पूर्णपणें धोरणीच होती. आंधळेपणानें उडी घेणारी नव्हती. नेपोलियनप्रमाणें ती युद्ध-रचनेंत मुद्द्याशीं गांठ घाली. वस्तुस्थितीची बरोबर परीक्षा करी. नेपोलियनप्रमाणेंच तोफखान्याचें महत्त्व ती ओळखीत असे. तिची चिकाटीहि विलक्षण. या चिकाटीमुळेंच तिनें ऑर्लिन्सचा वेढा उठविला. कारण शेवटच्या दिवशीं, तिचा लष्करी सहकारी हा "आज शत्रूपुढें टिकाव धरवत नाहीं" असें म्हणून मोठ्या नाउमेदीनें परत फिरला असतां, जोननेंच त्याला धीर देऊन फिरून युद्ध करावयाला लावलें. खेड्यांतील जीवनानें जे शारीरिक गुण अंगीं येतात ते सर्व तिजमध्यें होते. शिवाय तिच्या अंगीं सभ्यता कितीतरी होती. आणि याविषयीं तर असें सांगतात कीं, तिला आपल्यासमोर कोणी ग्राम्य अश्लील बोललेलें खपत नसे. धर्मविधींची अवहेलना तिला मानवत नसे. आणि आपल्या सैनिक शिपायांच्या लगत्यांत बाजारी स्त्रिया तर ती फिरकूंहि देत नसे. ती शेतकऱ्यांपासून राजापर्यंत सहज सफाईनें उचित तेंच बोले. तिचें बोलणें जसें भित्रेपणाचें नसे तसेंच तोंडदेखलेंहि नसे. प्रसंग पडेल त्याप्रमाणें मऊ तर मऊ, कठोर तर कठोर, कसें बोलावें हें तिला चांगलें येई. तात्पर्य, व्यवहारचतुरता, अद्‌भुतता, आणि उदात्तता हे तीनहि गुण तिनें आपल्या ठिकाणीं एकत्रित केले होते."

जोनच्या कर्तृत्वाचें महत्त्व लक्षांत येण्याला तिची पार्श्वभूमीहि लक्षांत घ्यावी लागते. त्या वेळचें राजमंडळ अगदीं दुबळें व हीन

होतें. फ्रेंच सरदारांच्या अन्तस्थ कलहांनीं फ्रान्समध्यें बेबंदशाही माजली होती. आणि त्याच वेळीं इंग्लंडच्या ५ व्या हेन्रीसारखा शूर, तरणाबांड वीर महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन फ्रान्सचे नवे नवे परगणे जिंकून बसला होता. फ्रेंच राजपुत्र हा अगदीं भेषपात्र, बावळट, वेडसर असा होता. त्याचा चेहरा पाहूनच लोक नाक मुरडीत. पोषाख गबाळया, बोलणें अजागळपणाचें, स्वभाव भित्रा व अनिश्चयी. राजमंडळाजवळ पैसा नसल्यानें त्याची कर्जदारी इतकी वाढली होती कीं, राजपुत्राला भेटण्याला कोणी आलें म्हणजे तो आपला तगादेदार सावकार ठरण्याच्या भीतीनें, प्रथम तरी राजपुत्र त्याचें तोंड चुकवी. सैन्य पाहावें तर विस्कळीत. व्यक्तिशः एखादा शिपाई शिलेदार शूर व राष्ट्राभिमानीहि. पण भाडोत्री शिपाईच पुष्कळ. आपला शत्रु जो इंग्रज त्याला घालवून देण्याऐवजीं एकमेकां पक्षांचे सरदार कोणीकडून तरी कैद करावे, आणि त्यांजकडून मोठमोठ्या खंडण्या घेऊन त्यांना सोडून द्यावें या खेळांत सर्व लढाऊ लोकांचें मन रमलेलें. या भूमिकेवर तर जोनचें चरित्र फारच उठावदार दिसतें.

[आज हिंदुस्थानवर परकी अंमल असल्यामुळें खरी वीरवृत्ति चेतविणारें, स्वदेशस्वातंत्र्याला पोषक असें वाङ्मय लिहितां येत नाहीं. ही गोष्ट पुष्कळशी खरी आहे. लेखणीला कायदा पदोपदीं मागें ओढतो. अशा स्थितींत स्वतः इंग्रज लोक आज ज्या स्त्रीचे गुण घेतात त्या जोनचें चरित्र आमच्या तरुण मुलांमुलींना वाचावयास हातीं दिलें तर तें, कायद्याचा काच टाळून, देशप्रेमाची स्फूर्ति त्यांच्या मनांत उत्पन्न करूं शकेल अशी अपेक्षा आहे व ती सफल होवो अशी प्रार्थना आहे.]

# मराठी भाषेंतील अद्वितीय ग्रंथ

## १. मराठी भाषा–उद्गम व विकास

ले. प्रो. कृ. पां. कुलकर्णी, एम्.ए., बी.टी., किं. रु. ४

साहित्याचार्य न. चिं. केळकर—"मराठी भाषेंतील शब्दांचा इतिहास, त्यांची उत्पत्ति, त्यांची प्रकृति, त्यांची लकब, त्यांची व्यवहारक्षमता इत्यादींसंबंधानें इतकी सूक्ष्म व सविस्तर माहिती देणारा हा पहिला ग्रंथ होय.

लोकशिक्षणः—"आतांपर्यंत मराठी भाषेवर मराठी भाषेंत इतका विस्तृत ग्रंथ प्रसिद्ध झालेला नाहीं."

**The Times of India** :—"This work is without doubt a valuable addition to the Indian Philological Literature."

---

## २. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास

ले. प्रो. डॉ. शं. दा. पेंडसे, एम्.ए., एम्.ओ.एल.,
पीएच्. डी., द्वितीयावृत्ति, किं. रु. १–८–०

लोकनायक मा. श्री. अणे—"महाराष्ट्रीय संस्कृतीचा गेल्या दोन हजार वर्षांत कसा विकास झाला व त्या कामीं वैदिक ऋषी, सूत्रकार, स्मृतिकार, इतिहासकार, संत, कवि इत्यादिकांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें व धर्मपरायण वृत्तीनें कसें वरचेवर चालन दिलें हा इतिहास डोळ्यांसमोर उभा राहतो."

## ३. ग्रंथालयशास्त्राचा ओनामा

ले. र. शं. पारखी, लायब्रेरिअन, फर्ग्युसन कॉलेज, बाई जेरबाई वाडिया लायब्ररी

उपोद्घात-लेखक—एस्. आर. रंगनाथन्, ग्रंथालयाधिकारी, मद्रास युनिव्हर्सिटी. किं. रु. ३

खाजगी–निमसरकारी–शालेय–विश्वविद्यालयीन इत्यादि

**सर्व प्रकारच्या लहानमोठ्या ग्रंथालयांच्या व्यवस्थापकांस व ग्रंथालयांवर देखरेख करणाऱ्या व्यवस्थापकांना सर्व** प्रकारची हरघडी लागणारी उपयुक्त माहिती मुद्देसूदपणें स्पष्ट आणि तपशीलवार देणारा मराठी भाषेंतील अद्वितीय ग्रंथ.

---

**A Model Text-book for High School Students**

**TENNYSON : ENOCH ARDEN**

Edited by Prof. R. K. LAGU, M.A.

**With Introduction, Notes and Questions.**

**Re. 1/-**

*Some remarkable features of this edition are :—*

1. The Text of the poem is the most authoritative and interpretation of the text lucid and convincing.
2. A list of books for further reading.
3. Subjects for Composition.
4. Probable Questions with Solutions.
5. Special note on how to answer a question and essentials of a good answer.

प्रकाशक

**दि इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणें**